सोलापूर तरुण भारत

# आसमंत



रामाने पुत्र, पिता, पती, बंधू म्हणून आदर्श प्रस्थापित केलेच. पण, माझ्या वर्तमनाला गरज आहे, वनवासी रामाच्या ध्येयनिष्ठ जीवनाची. आजही मारीच, शूर्पणखा, सुबाहू, त्राटिका डोकावल्या की गरज भासते ती रामाची. म्हणूनच राम आमची राष्ट्रीय अस्मिता आहे. 'स्वर्णमयी लंका न मिले माँ,अवधपुरीकी धूल मिले, सोने मे काटे चुभते हैं, मिट्टी मे हैं फूल खिले,' सांगणारा राम या राष्ट्राची कायम गरज राहणार आहे. २६ मार्च रोजी असणाऱ्या राम नवमी निमीत्त...

**प्रासंगिक**

**शिवराय कुळकर्णी**

मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम. धर्मरक्षक श्रीराम. त्राटिका, मारीच, सुबाहू ते कुंभकर्ण, रावण या अधमांपासून जनसामान्यांना मुक्त करणारा श्रीराम. वंचित अहल्येच्या जीवनात नवचैतन्य संचारून तिला समाजमान्य नवजीवन देणारा श्रीराम. ज्याच्या केवळ नामस्मरणाने पश्चात्तापदग्ध महापातकापासून मनाला मुक्ती मिळते. श्रीराम ही एक सभ्यता आहे, संस्कृती आहे. गदिमा लिहितात, राम चालले तो तर सत्पथ. म्हणूनच रामाचे मार्गक्रमण ते एका सभ्यतेचे मार्गक्रमण आहे. रामाची पावलं म्हणजे सुसंस्कृत विचारांचा तो ठसा आहे. काळ कोणताही असो, युग कोणतेही असो, सत्ता सत्तेसारखीच असते. सत्ता या शब्दातच गुणांसोबत दोषही सामावले आहेत. सत्तेचा स्वतःचा असा एक स्वभाव आहे. पराक्रमी राजा दशरथाची सत्तादेखील याला अपवाद नव्हती. अनेक युद्धांमध्ये विजय संपादन केलेला, मात्र वार्धक्यात केवळ राण्या, पुत्र व संसारात रममाण झालेला दशरथ अगतिक होता.

वारसाहक्काने रामाला सत्ता मिळणारच होती. भरत, लक्ष्मणादी भावंडांनी आपापली जबाबदारी स्वाभाविकपणे पारदेखील पाडलीच असती. परंतु, समाजात अत्यंत जागरूकतेने वावरणारा समूह केवळ चिंतित नव्हता, तर तो परिवर्तनाच्या दिशेने प्रयत्नशील होता. नव्या संघर्षाचा सारिपाट मांडला गेला होता. असुरी शक्तींवर मानवतेचा विजय, अधर्मावर धर्माचा विजय बघण्यासाठी साऱ्या भरतवर्षात एका योजनेला आकार दिला जात होता. याची कल्पना न रामाला होती न चक्रवर्ती सम्राट दशरथाला. राण्या, पुत्रांच्या कौतुकात दंग होत्या. अयोध्या आपल्याच सुखात मग्न होती. वंचितांचे अश्रू कोणी पुसायचे? अधमांकडून भरडल्या जाणाऱ्या सज्जन शक्तीचा वाली कोण? अयोध्येतील कथित लोककल्याणकारी राज्यात सर्व समाजघटक समाधानी आहेत का? दशरथासारख्या चक्रवर्ती सम्राटाने केवळ अयोध्येत गुरफटले राहायचे का? अवतीभोवती अमानवीय शक्तींनी उच्छाद मांडला असताना दशरथाला स्वतःच्या क्षात्र तेजाचे विस्मरण कसे काय होऊ शकते... अशा असंख्य प्रश्नांवर एका व्रतस्थ समूहाचे चिंतन सुरू होते. योजना आखली जात होती. कारण समग्र मानव समाजाची तशी आर्त हाक होती. मदांध असुरांचा कहर सर्वत्र माजला होता. दैत्यांच्या टाचेखाली जनता भरडली जात होती. छोटी राज्ये आपापले अस्तित्व टिकवण्याच्या नादात असुरांना शरण जात होती. प्रतिकाराची भावना क्षीण होती. विविध वर्णसमूह कोणी एकत्र करायचे? समुद्रापल्याड असलेल्या असुरी महाशक्तीचा प्रतिकार कसा करायचा, असे सारेच प्रश्न अनाकलनीय होते. एका पहाटे महर्षी विश्वामित्र अयोध्येच्या राजदरबारात धडकले आणि त्यांनी दशरथाजवळ थेट मागणी केली रामाची. वार्धक्याकडे झुकलेला दशरथ हळवा झाला होता. कोवळे पोर अचानक दुसऱ्याच्या हाती द्यायचे तरी कसे! ''ऋषिवर, आपला माझ्या पराक्रमावर विश्वास नाही का? आपण आज्ञा करा, वाटेल तो संघर्ष करण्यास हा दशरथ सिद्ध आहे.''

दशरथाने विश्वामित्रांची मनधरणी केली. मात्र, ते ठाम होते. त्यांना रामच हवा होता. दशरथाला आपल्या जीवनातला राम गेल्यासारखे वाटू लागले, पण नाइलाज होता. कारण समोर विश्वामित्र होते. अखेर विश्वामित्र रामाला घेऊनच अयोध्येच्या बाहेर पडले. राम कधी एकाकी नसतोच. राम आहे म्हणजे सोबत लक्ष्मण आहेच. उलट जेव्हा रामसोबत लक्ष्मण नसतो किंवा लक्ष्मणासोबत राम नसतो, तो क्षण त्यांच्या आयुष्यातील खडतर क्षण असतो. राम-लक्ष्मण, राम-सीता, राम-हनुमान अशा असंख्य अद्वैतातच संपूर्ण राम सामावला असतो. विश्वामित्रांसह राम-लक्ष्मणांचा प्रवास सुरू होतो. हा कंटकाकीर्ण मार्ग आहे. विश्वामित्र हा साधनेचा मार्ग आहे. खडतर तपस्येचा मार्ग आहे. ही साधना स्वतःसाठी नाही. वैयक्तिक मोक्षाचा मार्ग त्यात नाही. जगातील प्राणिमात्रांच्या कल्याणाचा ध्यास त्या साधनेत आहे. रामाला सहप्रवासी करण्याची या मुनिवरांची क्षमता आपण ओळखली पाहिजे.

विश्वामित्रांचा दुर्दम्य विश्वास आहे. त्यांची निवड अचूक ठरणार! प्रयोग करण्याची वेळ नाही. कारण पुढचे पाऊल हे समुद्रापलीकडे असलेल्या महाशक्तीला आव्हान देणार आहे. पुढच्या या पावलासोबतच उमटणाऱ्या प्रतिध्वनींचा चीत्कार समग्र राष्ट्राच्या कानठळ्या बसवणार आहे. एका निर्णायक युद्धाच्या दिशेने पडलेले हे पाऊल आहे. कदाचित याची कल्पना दशरथाला असती, तर त्याने वेळप्रसंगी विश्वामित्रांचाही कोप ओढवून घेतला असता. मात्र, विश्वामित्रांचे येणे आणि रामाला घेऊन जाणे हा केवळ नियतीचा खेळ नव्हता. यामागे खूप काही दडले होते. तपश्चर्येतून लाभलेल्या दिव्यदृष्टीतून आकाराला आलेली ती योजना होती. राम-लक्ष्मण पायी निघाले. विश्वामित्रांनी त्यांना समाजाचे वास्तव दाखवले. यज्ञशाळा बेचिराख झालेल्या. ऋषी-मुनींच्या हाडांचे सांगाडे पडलेले. राक्षसी अत्याचारांना बळी पडलेली भयभीत जनता. ओसाड पडलेल्या वस्त्या अयोध्येच्या अवतीभोवती अनाचार, अत्याचार माजलेला. पण, दशरथाला त्याचा मागमूसही नव्हता. कारण प्रशासकीय यंत्रणा मस्तवाल झालेली. सामान्यजन नागवले जातात, पण कुणालाच फिकीर नाही. राजदरबारात मखमली गादीवर रामाला हे कळले नसते. त्याची बोच त्याला जाणवली नसती. जनकल्याणासाठी सिद्ध राजा घडवायचा असेल तर त्याला जाणीव हवी. गवतावर झोपण्याची सवय असावी. कंदमुळांवर त्याचे पोट भरावे. दगडधोंड्यांतून त्याला चालता आले पाहिजे. भविष्यातील महासंग्राम बिकट आहे. वर्षानुवर्षे सतत संघर्षाला सामोरे जावे लागणार. त्याला पीडितांची कणव असावी. संघटकाचे गुण परिपूर्ण असावे. अजून राम पूर्ण तयार नाही. या प्रवासात विश्वामित्र रामाला विविध दिव्यास्त्रे प्रदान करतात. शस्त्र, शास्त्र, अस्त्र, अनेक विद्यांचा अभ्यास करवून घेतात. राम एकाग्रतेने सर्व ग्रहण करतो आहे. आता तो संघर्षाला सिद्ध झाला आहे. त्राटिका, मारीच, सुबाहू यांचा त्याने सहज वध केला. हे सोपे काम नव्हते.

जनमानसात विश्वास निर्माण झाला. होय, श्रीराम पराक्रमी आहे. आमच्या जीवनात आता राम आला आहे! समाजाने वाळीत टाकलेल्या अहल्येच्या उद्धारासाठी राम पुढे पाऊल टाकतो. वर्षानुवर्षे वंचितांचे जीवन जगणारी अहल्या समाजजीवनात परतवण्याचे महत्कार्य राम करतो. तो वनवासींमध्ये रमतो. लोकांच्या सुखदुःखाशी समरस होतो. शबरी भिल्लीणची उष्टी बोरं खातो. त्याला वर्णाची बंधने आड येत नाहीत. जनकाने वाढवलेल्या भूमिकन्येच्या गोत्राचा, मुळाचा विचार न करता राम सीतेला अर्धांगिनी करतो. म्हणूनच राम हा शब्द विश्वास, आशा, मंगळाचे जे मंगळ यासाठी पर्यायवाचक शब्द बनतो. चौदा वर्षांचा वनवास ही रामाच्या जीवनात शिक्षा नाही. कारण रामाने या शिक्षेला व्रतात परिवर्तित केले. संकटाचे संधीत रूपांतर करण्याचे याहून अधिक समर्पक व देखणे उदाहरण जगाच्या इतिहासात नाही! दिव्य ध्येयाच्या प्राप्तीसाठी अविश्रांत व अविचल प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. श्रीरामाला वनवासात सोडायला आलेल्या अयोध्याजनांची समजूत घालून त्यांना परत पाठवल्याच्या क्षणापासून रामाच्या धेयप्राप्तीच्या कार्याला प्रारंभ होतो. या चौदा वर्षांच्या वनवासात कुठे जावे, काय करावे, कुणाकडे पाहावे, असा एकही प्रश्न रामासमोर उद्भवत नाही. पुत्र म्हणून, युवराज म्हणून, शिष्य म्हणून, बंधू म्हणून रामाने आतापर्यंत आदर्श प्रस्थापित करून टाकले आहेत. आता रामाचे जीवन कुणासाठी आहे? वल्कले परिधान केलेला राम कुणासाठी जगणार? त्याचे लक्ष्य काय?... भयमुक्त समाज, सुखी समाज, दहशतमुक्त समाज हेच कार्य. असुरी शक्तींचा नायनाट म्हणजेच खलनिर्दालन हेच लक्ष्य. जन मनगटात शक्ती आहे. मात्र, मनगटाला प्रवृत्त करणारे मन दुर्बल झालेले.

(पान ४ वर)




---

# आखाती समृद्धीचे भवितव्य अवलंबून असलेले युद्ध

**इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका युद्धाला पंधरवडा उलटला तरी कोणताही ठोस तोडगा अद्याप दृष्टिपथात नाही. तसेच अन्य आखाती देशांवरही युद्धाचे ढग अजूनही घोंगावत आहेत. त्यामुळे या युद्धाचे सर्वांगीण परिणाम अल्पकालीन नसून साहजिकच दीर्घकालीनही असतील. कारण, हे युद्ध नेमके कधी आणि कसे संपते, यावर आखातातील समृद्धीचे भवितव्य अवलंबून आहे.**

**वेधक**

**अनय जोगळेकर**

अमेरिकेसाठी इराणमधील युद्ध एका दलदलीसारखे झाले आहे. अवघ्या दोन आठवड्यांमध्ये इराणमधील सात हजार लष्करी आणि पोलीस ठाणी, क्षेपणास्त्रांचे तळ, उत्पादन केंद्रे आणि लॉन्चर आणि इराणच्या इस्लामिक 'रिव्हॉल्युशनरी गार्ड'ची केंद्रे उद्ध्वस्त करण्यात आली आहेत. इराणची हवाई हल्ले थांबवण्याची यंत्रणा पूर्णपणे निकामी करण्यात आली असल्यामुळे अमेरिका आणि इस्रायलची विमाने इराणवर मुक्तपणे विहार करत, हव्या त्या ठिकाणी हल्ले करत आहेत.

गेल्या वर्षी जून महिन्यात झालेल्या युद्धानंतर इराणला आपल्या मर्यादा लक्षात आल्या होत्या. त्यामुळे त्यांनी असमान युद्ध लढण्याची आपली शक्ती आणखी वाढवायला सुरुवात केली. अमेरिकेने या युद्धामध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या वापराने भविष्यातील युद्धे कशी असतील, याची चुणूक दाखवली आहे.

इराणच्या डोक्यावरील उपग्रह, घिरट्या घालणारे ड्रोन आणि विमाने, हॅक केलेले रस्त्यांवरील कॅमेरे, यांतून दररोज मिळणाऱ्या हजारो तासांच्या व्हिडिओ फुटेजची काही मिनिटांमध्ये सांगड घालून त्यावर आधारित लक्ष्य निर्धारित करणे आणि ती उद्ध्वस्त करणे, मानवी बुद्धीसाठी अशक्य आहे. पण, यांत्रिक बुद्धिमत्तेमुळे अमेरिका आणि इस्रायलच्या विमानांना हवेत उड्डाण केल्यानंतर कुठे हल्ला करायचा आहे, याची माहिती पुरवणे शक्य झाले आहे. त्यांच्यापुढे इराण पार खुजा ठरला आहे. पण, इराणची ताकद वेगळीच आहे. पर्शियाचे आखात आणि त्याचे तोंड असलेली चिंचोळी होर्मुझची सामुद्रधुनी इराणला हजारो वर्षांपासून परिचित आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये मोठ्या तेलवाहू जहाजांना ये-जा करण्यासाठी तीन किमी इतका मार्ग उपलब्ध आहे. त्यातून दररोज ८० ते १०० जहाजे प्रवास करतात. इराणने या वाहतुकीवर नियंत्रण मिळवले आहे. आज इराणच्या परवानगीशिवाय या मार्गिकेतून प्रवास करण्याचे धाडस केल्यास जहाजांवर हल्ले होण्याची भीती आहे.

अमेरिका जहाजांना आश्वस्त करत असली, तरी आपल्या जहाजावरील कर्मचाऱ्याचे जीव धोक्यात घालून असे धाडस करण्याची कोणत्याही कंपनीची इच्छा नाही. आखातातून वाहतुकीसाठी विम्याच्या हप्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आखातातून बाहेर येणाऱ्या खनिज तेल आणि वायूवर मुख्यतः चीन, भारत, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया आणि आसियान देश अवलंबून असले, तरी त्याचे संपूर्ण जगावर परिणाम होत आहेत. याचे कारण या भागात वापरण्यात येणारी जवळपास ५० टक्के खते आखातातून येणाऱ्या कच्च्या मालापासून बनतात.

येत्या खरीप हंगामापूर्वी हे युद्ध संपले नाही, तर खतांच्या किमती प्रचंड वाढतील. याशिवाय, विविध प्रकारची रसायने, प्लास्टिक, औषधे, पॅकेजिंग पदार्थांच्या किमतीत वाढ होणार आहे. आखात बंद राहिल्यास अनेक देशांची अरब आणि युरोपीय देशांना होणारी निर्यात ठप्प होणार आहे. उद्या हे युद्ध थांबले, तरी हे परिणाम त्यापुढील काही महिने जाणवणार आहेत. हे परिणाम नोव्हेंबर २०२६ पर्यंत राहिले, तर ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचा सिनेट, तसेच प्रतिनिधीगृहातील निवडणुकांमध्ये पराभव होऊ शकेल. अनेक विकसनशील देशांमध्ये महागाई वाढल्यामुळे उठाव किंवा लष्करी बंड होऊ शकेल.

सध्या आखाती देशांचा व्यापार जवळपास ठप्प असला, तरी इराणकडून तेलाचा व्यापार जोमाने सुरू आहे. इराणचे तेल मुख्यतः चीन विकत घेतो. इराणचे ९० टक्के तेल त्याच्या समुद्रकिनाऱ्याजवळ असलेल्या खार्ग बेटावर साठवले जाते आणि तेथून निर्यात केले जाते. अमेरिकेत एक विचारप्रवाह असा आहे की, खार्ग बेट बेचिराख केले, तर इराणची अर्थव्यवस्था कोसळेल आणि अर्थव्यवस्था कोसळली की, तेथील राजवटीला शरण यावे लागेल. या विचाराचे विरोधक म्हणतात की, इराणची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली, तर त्याची अवस्था सोमालिया किंवा येमेनसारखी होईल. तिथे यादवी पेटल्यास इराण बेचिराख होईल. पण, पर्शियन आखाताच्या समोर असलेल्या आखाती अरब देशांच्या स्थैर्य आणि सुरक्षेवरही विपरीत परिणाम होईल.

एक- दोन दहशतवादीही वेगवान बोटींवर आरूढ होऊन एखाद्या मोठ्या जहाजावर आत्मघाती हल्ला करून त्याला आग लावू शकतात. इराणकडे खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचे भांडार असल्यामुळे तेथे सत्तांतर झाल्यास, हेच तेल इराणच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनणार आहे.

अमेरिकेने इराणला इशारा देण्यासाठी खार्ग बेटावरील लष्करी तळ उद्ध्वस्त केले असले, तरी तेल टाक्या आणि पाईपलाईनला हात लावला नाही. इराणने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले आहे. अमेरिका आणि इराणमधील युद्ध एका अशा जुगाराप्रमाणे आहे की, जिथे एक प्रतिस्पर्धी आपले सर्वस्व पणाला लावत आहे. दुसरा प्रतिस्पर्धी जिंकत असला, तरी एक डाव उलटा पडला; तरी सगळा खेळ बदलू शकतो.



या पार्श्वभूमीवर भारताने थेट इराणशी बोलणी करून नैसर्गिक वायूने भरलेली आपली दोन जहाजे 'शिवालिक' आणि 'नंदादेवी' यशस्वीपणे होर्मुझच्या आखातातून सोडवली. हे युद्ध सुरू होण्याच्या दोन दिवसापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी इस्रायलच्या संसदेत भाषण करत होते. हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विजय असला, तरी तो तात्कालिक आहे. कारण, भारताची द्रवरूप पेट्रोलियम गॅसची वार्षिक गरज तीन कोटी टनांपेक्षा जास्त आहे. त्यातील सुमारे ६० टक्के आयात केला जातो.

नुकत्याच आलेल्या दोन जहाजांतून ८५ हजार टन नैसर्गिक वायू भारतात आला असला, तरी परिस्थिती पूर्ववत होण्यासाठी पर्शियन आखात वाहतुकीसाठी खुले असणे आवश्यक आहे. ते होईपर्यंत भारताला संकटाच्या परिस्थितीतून मार्ग काढत पुढे जावे लागणार आहे. भारताचा कल अमेरिका, युरोपीय महासंघ, इस्रायल आणि आखाती देशांकडे असला, तरी भारताचे परराष्ट्र धोरण स्वायत्त आहे. भारत 'ब्रिस' गटाचा संस्थापक सदस्य असून, या गटात आता इराणचाही समावेश झालेला आहे. भारतामध्ये शिया मुसलमानांची संख्या इराणच्या खालोखाल आहे. इराण असे दाखवण्याचा प्रयत्न करत आहे की, तो आखाताचा नवीन द्वारपाल आहे. होर्मुझची सामुद्रधुनी फक्त अमेरिका आणि तिच्या मित्रराष्ट्रांसाठी बंद आहे. अरब देशांना मालाची वाहतूक करायची असेल, तर त्यांनी भूमीवरून अमेरिकेचे तळ हलवावेत, अशी भूमिका घेऊन इराणची राजवट मानसिक युद्धामध्ये गुंतवत आहे.

(पान ४ वर)

# सीरियातला नवा उद्योग: 'डार्क' पर्यटन

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

**पर्यटन म्हटले की, डोळ्यासमोर आपसुकच चित्र उभे राहते ते निळेशार अथांग समुद्रकिनारे, उंच पर्वतशिखरे, घनदाट वृक्षराजी, पुरातन मंदिरे वगैरे. कारण, पर्यटन म्हणजे हवापालट आणि एकंदरच सुखावणारा अनुभव. पण, जगात असेही काही पर्यटक आहेत, जे मृत्यू, शोकांतिका, विनाश, युद्ध किंवा ऐतिहासिक आपत्तींशी संबंधित स्थळांना भेट देणे पसंत करतात. यालाच 'डार्क' अथवा 'ब्लॅक टुरिझम' म्हणून ओळखले जाते. अशाच सीरियामधील 'डार्क' पर्यटनाच्या एका नवोद्योगाविषयी...**



सीरिया हा देश इस्रायलच्या शेजारीच आहे. २०११ मध्ये इजिप्त आणि लिबिया या अरबी देशांमध्ये क्रांती होऊन अनुक्रमे मुबारक आणि गद्दाफी यांच्या राजवटी उलथून टाकण्यात आल्या. या क्रांतीला 'अरबी वसंतऋतू' 'अरब स्प्रिंग' असे म्हटले गेले. सीरियातही त्याच वेळी उठाव झाला होता. पण, सीरियन हुकूमशहा बशर असद हा मुबारक आणि गद्दाफी यांच्याप्रमाणे सत्ता भोगून-भोगून सुस्तावलेला नव्हता. त्याने सीरियन बंडखोरांना सरळ ठार मारायला सुरुवात केली. तो बंडखोरांना किंवा अन्य विरोधकांना गोळ्याबिळ्या घालून मारत नसे. तो बंडखोरांच्या वस्त्यांवर बुलडोझर घालून त्यांना बायकापोरांसह सरळ चिरडूनच टाकत असे. हो, उगीच एकेकाला गोळ्या घालून मारत बसणे म्हणजे वेळ आणि दारुगोळ्याचा अपव्ययच नव्हे का? त्यापेक्षा चिरडून टाकणे सोपे! २०११ पासून २०२४च्या डिसेंबरपर्यंत सीरियात अनेक ठिकाणी असे चिरडण्याचे प्रकार किती घडले असतील, याची गणतीच नाही.

बंडखोरांना असे चिरडून टाकण्याच्या असदच्या या प्रयत्नांना रशिया आणि इराण यांचा सक्रिय पाठिंबा होता. म्हणजे, त्या दोघांनी आपल्या निवडक सैनिकी तुकड्या असदच्या साहाय्यार्थ पाठवल्या होत्या. असे अनेकदा घडले आहे की, परदेशी वार्ताहर एखाद्या सीरियन शहरात फिरत असायचे. त्यांच्यासोबत ते विशिष्ट शहर ज्यांच्या ताब्यात असेल, त्या पक्षाचे सैनिक असायचे. म्हणजे सत्तारूढ आसदचे अधिकृत सीरियन सैनिक किंवा बंडखोर गनीम. एखाद्या वार्ताहराला आधीच्या भेटीतल्या एखाद्या विशिष्ट भागाची आठवण व्हायची. तो त्या सैनिकांना तिथे चलायला सांगायचा. तिथे पोहोचल्यावर दिसायचे की, संपूर्ण वस्ती गायब झालेली असून, तिथे एक सपाट मैदान फक्त आहे. तो वार्ताहर आश्चर्य व्यक्त करायचा. त्यावर ते सैनिक त्याला मैदानाजवळ जाऊन नीट बघायला सांगायचे. मग दिसायचे की, ती संपूर्ण वस्ती, तिथल्या वास्तू, इमारती, टपऱ्या, माणसे यांच्यासकट बुलडोझरखाली तुडवून, चेपून ते मैदान बनले आहे. हे सगळे बंडखोर मुसलमानच होते. फरक असलाच, तर तो फक्त पंथाचा होता. तरीही, इतया भीषण क्रूरपणे त्यांना ठार करण्यात आले. २०१५ मध्ये या संघर्षात 'इसिस' ही संघटना पण उतरली. सीरियाच्या वाळवंटात पालमायरा नामक प्राचीन शहर आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकात त्या परिसरात 'मेसोपोटेमियन' या नावाची सभ्यता नांदत होती. त्या काळात त्या लोकांनी त्यांच्या 'बेल' नामक देवाचे देऊळ बांधले होते. किमान दोन हजार वर्षांपूर्वीचे ते 'टेम्पल ऑफ बेल' अजून बर्या अवस्थेत होते. ते बघायला लांबून-लांबून पर्यटक यायचे. सीरियन अरब हे मुसलमान झाल्यावरही, कसे कोण जाणे; पण अजूनही ते मंदिर शाबूत होते. पण, 'इसिस'वाल्यांनी विचार केला की, 'तालिबान'वाल्यांनी बामियाँमधल्या विशाल बुद्धमूर्ती उद्ध्वस्त करून केवढे महान कृत्य केले. मग आम्ही का मागे रहावे? मग २०१५ साली त्यांनी पालमायराचे 'टेम्पल ऑफ बेल' सुरुंग लावून उडवून दिले.

अखेर २०२४च्या डिसेंबरमध्ये बशर असदची घटका भरली. हयात 'तहरीर अल् शाम' किंवा 'एचटीएस' या बंडखोर गटाने असदच्या लष्कराचा पराभव करून सत्ता हडपली. सध्यातरी 'एचटीएस'चा प्रमुख अहमद अल् शारा हा सीरियाचा सर्वेसर्वा आहे. बशर असद सहकुटुंब मॉस्कोला पळाला. तो नेत्रविशारद डॉक्टर आहे. त्यामुळे रशियाचा राजकीय आश्रित म्हणून तो मॉस्कोत मजेत राहात असून, उच्च राजकीय वर्तुळातल्या लोकांचे डोळे तपासण्याचे काम छंद म्हणून करतो, असे सांगतात. परवा दि. २८ फेब्रुवारी २०२६ला सुरू झालेल्या अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण या युद्धात सीरिया अद्याप बाजूलाच आहे.

साधारण जगात सर्वत्र नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यांमध्ये पर्यटन व्यवसायाला बरे दिवस असतात. कारण, युरोपीय आणि विशेषतः अमेरिकन पर्यटक या काळात फिरायला निघतात. त्यांच्या खिशात भरपूर माल असतो. तो हलका करण्याचे सुखद कार्य जगभरच्या पर्यटनसेवा देणार्या कंपन्या करत असतात, तर यंदाच्या या मोसमात सीरियात भरपूर पर्यटक आले. तसा सीरिया हा पर्यटकांचा आवडता देश. दमास्कस, अलेप्पो इत्यादी प्राचीन शहरे, तिथले ऐतिहासिक किल्ले वगैरे बघायला लोकांना आवडते. 'दमास्कस स्टील' म्हणजे दमास्कसमध्ये विशिष्ट रीतीने बनवले जाणारे पोलाद हे एकेकाळी जगभर प्रसिद्ध होते. 'दमास्कस स्टील'पासून बनवल्या जाणार्या तलवारी, भाले, बाणांचे फाळ हे फारच मौल्यवान मानले जात असत. दमास्कसच्या संग्रहालयात हे सगळे बघायला मिळते. पोलाद बनवण्याची ती विशिष्ट प्रक्रियासुद्धा आजच्या शास्त्रीय परिभाषेत समजावून दिली जाते. अलेप्पो या प्राचीन शहरातला १२व्या शतकातला किल्ला आणि उमायद मशीद; तसेच तिथले अत्यंत चविष्ट खाद्यपदार्थ यासाठी पर्यटक जीव टाकतात. परंतु, या मोसमात पर्यटन कंपन्यांच्या चालकांना किंवा अन्य वैयक्तिक व्यावसायिकांना जरा वेगळाच अनुभव आला. रीटा बादरन ही खरे म्हणजे दंतवैद्यक महाविद्यालयात शिकणारी एक विद्यार्थिनी आहे. तिने आपल्या 'इन्स्टाग्राम' अकाऊंटवरून दमास्कस आणि अन्य सीरियन शहरांमधल्या विविध पर्यटन स्थळांची स्वतः काढलेली भरपूर चित्रे आणि अन्य माहिती दिली. तिला भरपूर 'फॉलोअर्स' मिळाले आणि त्यांनी तिला असा आग्रह केला की, तू आम्हाला प्रत्यक्ष अशा ठिकाणी घेऊन चल की, जिथे नुकत्याच संपलेल्या यादवी युद्धात भयंकर घटना घडल्या आहेत. पर्यटकांना कशात स्वारस्य आहे, हे लक्षात आल्याबरोबर रीटा बादरन आणि तिच्यासारख्या अनेकांनी धडाधड तशा सहली आयोजित केल्या. पालमायरा शहरातले उद्ध्वस्त 'टेम्पल ऑफ बेल' बघायला भरपूर पर्यटक आले. पूर्वीही यायचेच. पण, पूर्वी येणारे पर्यटक हे ते विशाल मंदिर, ते विशाल स्तंभ, त्यांची अप्रतिम रचना हे सगळे अनुभवायला, ते पाहून थक्क व्हायला यायचे. आताचे पर्यटक ते मंदिर उद्ध्वस्त कसे केले आहे, हे बघायला आले, येत आहेत. सैदनाया नावाचे शहर दमास्कसच्या उत्तरेला २७ किमी अंतरावर डोंगरात आहे. इथल्या तुरुंगात असदच्या सैनिकांनी अगणित नागरिकांना, ते बंडखोर असल्याच्या नुसत्या शंकेवरून कोंडून ठेवले आणि अक्षरशः शेळ्यामेंढ्यांची कत्तल उडवावी, तसे त्यांना ठार मारले. वार्ताहरांनी सैदनायाच्या या तुरुंगाला 'मानवी खाटिकखाना' असेच नाव दिले होते. नव्या पर्यटकांना हा तुरुंग बघण्यात भलतेच स्वारस्य आहे, असे रीटा बादरनला आढळले. मग तिने मस्त धंद्याची लाईन पकडली.

दुसऱ्या महायुद्धात नाझींनी ऑशवित्झ, स्पान्डाऊ इत्यादी तुरुंगांमध्ये लक्षावधी ज्यू लोकांना विषारी वायूचा प्रयोग करून ठार मारले होते. आज ही ठिकाणे त्या ज्यूंची स्मारके म्हणून जतन करण्यात आलेली आहेत. शेकडो इस्रायली आणि अन्यही पर्यटक तिथे मुद्दाम जातात. ते तुरुंग, तिथले गॅस चेंबर्स पाहतात. त्या निरपराध बळींना श्रद्धांजली अर्पण करतात. सैदनाया तुरुंग अजून चालू स्थितीत असल्यामुळे तिथे आत जायला परवानगी नाही. पण, रीटा बादरन आणि अन्य चतुर पर्यटन व्यावसायिकांनी तिथल्या रक्षकांना पटवले. एका विशिष्ट टप्प्यापर्यंत तुरुंगाच्या आत यायला त्यांनी परवानगी दिली. लगेच या लोकांनी जाहिरात झळकवली- 'सैदनायाचा मानवी खाटिकखाना बघायला चला. शुल्क अमुक डॉलर्स आणि फक्त १०० डॉलर्स आणखी दिलेत, तर तो तुरुंग आतूनसुद्धा बघायला मिळेल'. याला म्हणतात धंद्याची लाईन! मात्र, ऑशवित्झची 'नाझी छळछावणी' आणि सैदनायाचा 'मानवी खाटिकखाना' बघायला जाणार्या लोकांच्या मनोवृत्तीत खूप फरक आहे, असे या सगळ्या व्यावसायिकांच्या लक्षात आले. ऑशवित्झला जाणारे लोक मानवी क्रौर्याची परिसीमा बघायला जातात. ती पाहून, अनुभवून हळहळतात, गंभीर होतात. सैदनायाचा तुरुंग बघणारे पर्यटक मस्त मजेत, हसतखेळत असतात. सेल्फी तर सगळेच काढत असतात. पण, याठिकाणी आपल्यासारखीच माणसे नाहक मेली, त्यांचा काहीही अपराध नसताना त्यांना क्रूरपणे ठार मारण्यात आले, याबद्दल त्यांना काहीही अनुकंपा वाटलेली दिसत नाही, हे चांगले लक्षण नव्हे. रोमन साम्राज्य वैभवाच्या अत्युच्च शिखरावर असताना राजधानी रोमच्या 'कलोसियम' नामक प्रेक्षागृहात वाघ-सिंहांसारखे क्रूर पशू विरुद्ध हत्यारे घेतलेले 'ग्लॅडिएटर्स' यांचे सामने व्हायचे. कोणाच्याही आघाताने कोणीही ठार झाले, तरी रक्ताची कारंजी उसळायचीच. ती पाहून ते रोमन प्रेक्षक मिटक्या मारत जल्लोष करायचे.

केव्हातरी 'रूचिपालट' म्हणून युद्धात पकडलेल्या कैद्यांना, गुन्हा केलेल्या गुलामांना मैदानात निःशस्त्र सोडून त्यांच्या अंगावर भुकेले वाघ-सिंह सोडले जात. ते क्रूर पशू त्या असाहय्य माणसांच्या अंगाचे लचके तोडून खाताना पाहून रोमन प्रेक्षक भलतेच खूश होत असत. सीरियातला विध्वंस बघायला डॉलर्सच्या थप्प्या घेऊन जाणारे पर्यटक असेच आंबटशौकीन असावेत. मुंबईच्या फोर्ट भागात जुन्या हॉर्नबी रोडवर म्हणजे आताच्या दादाभाई नौरोजी मार्गावर खादी ग्रामोद्योग मंडळाची एक भलीमोठी शोरूम आहे. ही इमारत फोर्ट भागातल्या संरक्षित ऐतिहासिक वारसा वास्तूंपैकी एक आहे. पूर्वी 'व्हाईटअवे लेडलॉ' नावाचे भव्य डिपार्टमेंटल स्टोअर होते. फोर्टमधली 'आर्मी ॲण्ड नेव्ही स्टोअर्स', 'इव्हान्स फ्रेझर' इत्यादी दुकाने इंग्रज आणि श्रीमंत स्थानिक लोकांमध्ये फार प्रसिद्ध होती. त्यातलेच 'व्हाईटअवे लेडलॉ' हे एक. त्याची प्रसिद्धी कपड्यांसाठी जास्त होती.

(पान ६ वर)

---

# समुपदेशन... काळाची गरज!

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

माझ्या एका मित्राचे त्याच्या पत्नीशी अजिबात पटत नव्हते. अत्यंत छोट्या छोट्या बाबतीत ते दोघेही नेहमीच टोकाची भूमिका घ्यायचे. वाद सुरू होताना त्याचे कारण फारच क्षुल्लक असायचे; त्यानंतर वादावादी वाढून त्याचे रूपांतर टोकाच्या भांडणात व्हायचे. या सारख्या सारख्या भांडणांमुळे त्याच्या घराची सुख-शांती पार हरवून गेली होती. केवळ तीन वर्षांत त्यांच्या आयुष्यातील संपूर्ण आनंद संपून गेला होता.

भांडणे तर इतकी विकोपाला गेली होती की, एकदा दोघांनीही जवळपास आपले आयुष्य संपविण्याचा प्रयत्न केला होता. सुरुवातीला त्यांची भांडणे चार भिंतींच्या आड होत असल्याने कळायचे नाही. परंतु पुढे पुढे त्यांना भेटताना त्यांच्यातील वाद आम्हाला जाणवायला लागले. सारेच अवघड होऊन बसले होते. दोघांच्या परिवाराच्या मंडळींनी त्यांना समजावून सांगितले होते. काही दिवस संसाराचा गाडा ताळ्यावर राहून परत 'ये रे माझ्या मागल्या' असे त्यांचे व्हायचे. त्यांच्या संसाराचा झालेला खेळखंडोबा मला बघवत नव्हता. शेवटी मी एकदा मनाशी पक्के ठरवून त्यांच्याकडे गेलो. दोघेही तणावातच होते. कदाचित त्यांचे काहीतरी परत बिनसले होते. तरीदेखील निग्रहाने मी त्या दोघांनाही माझ्यासमोर बसविले आणि त्यांना एक सल्ला दिला. त्यांना मी वैवाहिक समस्यांवर मार्गदर्शन करीत असलेल्या एका समुपदेशकाकडे जाण्यास सांगितले. मी समुपदेशक म्हटल्यावर मला अपेक्षित तीच प्रतिक्रिया मिळाली... आता एवढेच शिल्लक राहिले आहे. आधीच एकमेकांच्या सहवासात डोके फिरायची वेळ आली आहे. आता कौन्सिलरकडे जाऊन वेडेपणाचे प्रमाणपत्रदेखील घेऊन येतो... किंवा यांच्या सहवासात मी अर्धी वेडी झाली आहेच; आता कौन्सिलरकडे जाऊन तिकडून परस्पर वेड्यांचे इस्पितळ गाठते म्हणजे हे सुटतील आणि मी पण सुटेन... वगैरे वगैरे. समुपदेशक म्हटल्यावर आपण वेडे आहोत का? हा अत्यंत चुकीचा प्रश्न अजूनही आपल्या मनात येतो. या परंपरागत सवयीमुळेच त्यांच्या प्रतिक्रिया आल्या. त्यानंतर माझ्या मानसशास्त्राच्या अभ्यासाचा वापर करून मी पुढील दोन तास त्यांना समुपदेशक म्हणजे काय व त्याच्याकडे जाऊन त्यांना काय फायदा होऊ शकतो, याबद्दल समुपदेशनच केले. दोन तासांच्या प्रयत्नांनंतर माझ्या त्या भूमिकेला यश मिळाले. ती दोघे एका समुपदेशकाकडे जाण्यास तयार झाली.



साधारण सहा महिन्यांच्या समुपदेशनानंतर त्यांच्या जीवनात आश्चर्यकारक बदल झाले. ते समुपदेशकाच्या सल्ल्याने त्यांनीच केले. त्यांचे वागणे बदलले, त्यांचा एकमेकांबद्दलचा ग्रह बदलला, दोघे एकमेकांसोबत सकारात्मक वेळ घालवू लागले. साधारण वर्षभरानंतर एकमेकांना खाऊ की गिळू पाहणारे ते नवरा-बायको एक समाधानी व आनंदी वैवाहिक आयुष्य व्यतीत करू लागले. आज त्या घटनेनंतर पुढे १० वर्षे लोटून गेली आहेत व आता आपल्या मुलाबाळांसह त्यांचा एक आनंदी परिवार सर्व लोकांना व आम्हा सर्वांना जाणवतो आहे. हे साध्य होऊ शकले ते केवळ एका अत्यंत प्रोफेशनल व अभ्यासू समुपदेशकाच्या समुपदेशनामुळेच; किंबहुना त्या दोघांनी समुपदेशनाचे महत्त्व समजून घेतल्यानेच. २१ व्या शतकातील बदलत्या काळात एका बाजूने माणसाचा भौतिक विकास फार झपाट्याने होत असला, तरीही या नव्या काळात अनेक मानसिक समस्या निर्माण झाल्या आहेत. जीवनाचा वेग वाढला, स्पर्धा वाढली, पैशाची गरज वाढली, तो मिळविण्यासाठी धावपळ वाढली, त्यामुळे वेळ मिळेनासा झाला व त्यामधून संवाद हरविला. चौकोनी कुटुंबांमध्ये संवादच नसेल तर निर्माण झालेली पोकळी वाद व वितंडवादानेच भरली जाणार हे नक्की. त्यामुळेच सर्वच वयोगटाच्या मंडळींना वेगवेगळ्या मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते. मुळात काय होतेय; वाद निर्माण झाला की, त्याचे मूळ मानसिक समस्येत आहे, हेच अनेक वेळा कळत नाही. अजूनही मानसिक समस्या म्हणजे वेडेपणा असे सीमकरण आपल्या परंपरागत विचारसरणीतून गेलेले नाही. मानसिक समस्या म्हणजे वेडेपणा, म्हणजे मी वेडा, म्हणजे मला आता वेड्यांच्या इस्पितळात नेणार, अशी विचार शृंखला तयार होते. त्यामुळे मानसिक समस्या तशीच राहून एकमेकांतील दुराव्याचे निराकरण भलतीकडेच शोधले जाते. जुन्या काळात कदाचित सामाजिक परिस्थितीमुळे व एकोप्यामुळे अनेक समस्यांचे निराकरण परस्परच केले जायचे. जसे मुलांच्या बाबतीत त्यांच्या विकासाचा विचार शाळेच्या पातळीवरच केला जायचा आणि त्याला पाढे आले नाही तर हातावर रुळ मारण्याचा अधिकार शिक्षकाला होता. आता तसे राहिलेले नाही. मुलांना मारहाण करून शिकविणे नव्या पठडीत बसत नाही. ही बाब योग्य की अयोग्य हा स्वतंत्र चर्चेचा विषय राहू शकतो. परंतु मुलाचे मन सांभाळणे व त्याला ताणविरहित प्रशिक्षण देणे या प्रक्रियेत त्यांच्या मनाचा विचार करणारा समुपदेशक आजकाल शाळांमधून नेमला जातो आहे. बालकांवर निर्माण होत असलेल्या ताणाचे योग्य नियोजन कसे करायचे व त्यास सकारात्मक उर्जेमध्ये कसे परावर्तित करायचे, हे समुपदेशक सांगण्याचे कार्य करीत असतो.

आपल्या परंपरागत जीवन पद्धती आपल्या नसानसांमध्ये भिनलेल्या असल्याने जग बदललेले असले, तरीही त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन मात्र तोच आहे व त्यामधूनच वेगवेगळ्या पातळ्यांवर संघर्षांची स्थिती निर्माण होताना दिसते. अशावेळी योग्य समुपदेशक आपल्याला प्राप्त परिस्थितीकडे कसे बघायचे आणि आपल्या वागण्याच्या शैलीमध्ये फार छोटे बदल करून आपल्या आजूबाजूचे वातावरण आनंदी कसे ठेवायचे याबद्दल मार्गदर्शन करू शकतो. त्यासाठी समुपदेशकाकडे जाणे माझ्या योग्यतेला शोभत नाही अशा पद्धतीचा अहं बाजूला सारणे आवश्यक आहे तसेच समुपदेशन कोणत्याही वयात प्राप्त केले जाऊ शकते; किंबहुना त्यास वयाचे बंधन नाही. आम्ही खूप पावसाळे बघितले किंवा आम्हाला सर्व कळते यासारख्या आत्मभ्रमात जगत असलेल्या मंडळींनीही प्रसंगी समुपदेशकाची मदत घेऊन बिघडणारी परिस्थिती सावरायला हवी. सध्या जगण्याच्या अनेक वेगवेगळ्या संकल्पना तयार होत आहेत. कधी कधी तर तो बदल स्वीकारण्याच्या पलीकडचा असतो. शेवटी आपल्याला त्यामधूनही मार्ग काढणे गरजेचे असतेच. त्यासाठीच आपल्याला त्या नव्या बदलांना सामोरे जाण्याकरिता बळ देण्याचे कार्य एक चांगला समुपदेशक करू शकतो. कारण समुपदेशक हा आपला आपल्याच जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रदान करणारा मित्र-मैत्रीण आहे, हे लक्षात ठेवायला हवे. या मित्राच्या किंवा मैत्रिणीच्या मदतीने आपण आपले आयुष्य आपल्या सख्या-सोबत्यांसह आनंदात व्यतीत करू शकतो. शेवटी जीवनाचे ध्येय आनंदी व समाधानी आयुष्य हेच असते ना!

---

# अंत्येष्टी



महास्मशान मणिकर्णिका घाट काशी; मृत्यू साजरा करणारं जगातलं एकमेव स्थान

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

प्राचीन भारताच्या चिंतन परंपरेत माणसाचं आदर्श पूर्णायुष्य १२० वर्षांचं मानलेलं आहे. त्यात थोडी व्यवहार्यतेची भर घालून किमान १०० वर्षांचं असावं, अशी आशा व्यक्त करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगानं अभीष्टचिंतन करणारे अतिशय सुंदर आशयाचे एकूण चार श्लोक जातकाच्या प्रत्येक वाढदिवशी म्हणण्याची प्रथा होती. आजकाल म्हटल्या जाणाऱ्या 'हॅप्पी बर्थ डे टू यू!' या ओळी त्यांच्या पासंगाला पुरणार नाहीत. ते पुढील प्रमाणे आहेत. प्रत्येक हिंदू सनातनी घरात वाढदिवशी यांचा गजर व्हायलाच हवा-

**'आयुर्द्रोणसुते श्रियो दशरथे शत्रुक्षयो राघवे। ऐश्वर्यं नहुषे गतिश्च पवने मानञ्च दुर्योधने। शौर्यं शान्तनवे बलं हलधरे सत्यञ्च कुन्तीसुते। विज्ञानं विदुरे भवन्ति भवतां कीर्तिश्च नारायणे।।'** अश्वत्थाम्यासारखे दीर्घायुष्य, दशरथासारखी लक्ष्मी, रामासारखा शत्रूंचा नाश, नहुषासारखे ऐश्वर्य, पवना सारखी गती, दुर्योधनासारखा मान, भीष्मासारखे शौर्य आणि कुंतीसुत युधिष्ठिरासारखे सत्य विदुरासारखी विद्वत्ता आणि नारायणाची कीर्ती प्राप्त व्हावी. **'यावत् तोयधर धरा-धरधरा-धारा-धरा-भूधरा। यावत् चारु-सुचारु-चारु-चमरं चामीकृतं चामरम्। यावत् रावण राम-राम रमणं रामायणं श्रूयते। तावद्भोग-विभोग-भोग-भुवने त्वं दीर्घजीवी भव।।'** जोपर्यंत धरेवर पाणी धारण करणारे ढग, भूमीनं धरण केलेले पर्वत आणि पाणी वाहून नेणाऱ्या धाराधरा नद्या आहेत, जोपर्यंत सुंदर चामर आहेत, जोपर्यंत रावण आणि राम यांच्याशी संबंधित रामायण ऐकले जाते, तोपर्यंत (हे प्रिय), तू या उपभोग्य जगात दीर्घजीवी हो. **'आयुष्मान् भव पुत्रवान् भव चिरं श्रीमान् यशस्वी भव। प्रज्ञावान् भव भुरिभुति करणैः व्यापार दक्षो भव। तेजस्वी भव शत्रुदर्प दहनैः दानैक निष्ठो भव। श्रीशम्भो भव पाद पूजनरतः सर्वोपकारि भव।।'** (तू) आयुष्यवान हो आणि पुत्रवान, (तुझी) श्रीमंती चिरकाळ टिकणारी असो, (तू) अफाट ज्ञान/बुद्धी प्राप्त कर, भरपूर (भूरि-भूरि) प्रयत्न कर आणि व्यवसायात अत्यंत कुशल हो. तेजस्वी हो शत्रूच्या गर्वाचं दहन करणारा आणि अनेक (प्रकारची) दानं करण्यावर निष्ठा असणारा हो. श्री शंभूच्या पावलांचं पूजन करण्यात सतत रत राहून सर्वोपकार करणारा हो...

**'लक्ष्मीस्ते पंकजाक्षीर्विलसतु भवने भारती कण्ठदेशे। वर्द्धन्तां बन्धुवर्गाः प्रबलरिपुगणा यान्तु पाताल मूले। देशे देशे सुकीर्तिः प्रसरतु भवतां कुन्दपूर्णेन्दु शुभ्रा। जीवत्वं पुत्रपौत्रैः स्वजनपरिवृतो विविधगुणर्हायनानं शतञ्चः।।**

(कमलपुष्पाच्या पाकळ्यांसारखे नेत्र असणारी देवी लक्ष्मी तुझ्या घरात आणि देवी सरस्वती तुझ्या कंठात विलास करो, बांधवांच्या (संख्येत) वाढ होवो आणि प्रबळ असणारा शत्रुपक्ष पाताळाच्या मुळाशी जावो, पांढऱ्या कुंदफुलासारखी आणि पूर्णचंद्राच्या चंद्रिकेप्रमाणे शुभ्र धवल कीर्ती देशोदेशी पसरो. मुलाबाळा-नातवंड आणि नात्या-गोत्यातल्या मंडळींच्या गराड्यात विविध गुणांसह शंभर वर्षं तू जगावंस.) हे सगळं आदर्श आयुष्याचं वर्णन असलं, तरी आपल्या पूर्वजांना आयुष्याकडून काय काय हवंय ते स्पष्ट होतं. यातल्या काही अपेक्षा पूर्ण होतील, काही होणार नाहीत. दीर्घायुषी व्यक्तीच्या आयुष्याच्या विविध टप्प्यांवर ग्रहशांती करावी, असं शास्त्र सांगतं. या शांतींची नावं आहेत- ५० व्या वर्षी वैष्णवी, ५५ व्या वर्षी वारुणी, ६० व्या वर्षी उग्ररथ, ६५ व्या वर्षी मृत्युंजय महारथी, ७० व्या वर्षी भैमरथी, ७५ व्या वर्षी ऐन्द्री, ८० व्या वर्षी सहस्रचंद्र दर्शन, ८५ व्या वर्षी रुद्री, ९० व्या वर्षी कालस्वरूप सौरी, ९५ व्या वर्षी त्र्यंबकमहारथी, १०० व्या वर्षी शताब्दी महामृत्युंजय. जन्म झाला म्हणजे मृत्यू हा होणारच. त्यामुळे या आयुष्याला एका क्षणी पूर्णविराम असणारच. योगशास्त्रात शरीराला अन्नमय कोष आणि प्राणाला प्राणमय कोष म्हणतात. अन्नमय कोषाला एकसंध ठेवायचं आणि त्याला सतत कार्यप्रवण क्रियाशील राखायचं मुख्य काम प्राणमय कोष करत असतो. तो अन्नमय कोषाला सोडून गेला की, अन्नमय कोष म्हणून जे काही आहे, ते प्रेत (प्र+इत् )म्हणवल्या जातं. 'प्र' म्हणजे पुढे; इ म्हणजे जाणे. प्रेत मृत्यू (ओलांडून) पुढे गेलेलं. हा शब्द नपुंसकलिंगीच असतो. मृत्यू प्रक्रियेचं विस्तृत विश्लेषण योगशास्त्रात करण्यात आलेलं आहे. पाच मुख्य आणि पाच उप असे एकूण १० प्रकारचे प्राण शरीराच्या क्रियान्वयनासाठी आयुष्यभर कार्यरत असतात. मृत्यूमध्ये दोन ते सहा तासात एक एक प्राण शरीर सोडून जातो. सर्वात शेवटी 'धनंजय' नावाचा उपप्राण सोडून गेला की, शरीर कडक व्हायला सुरुवात होते. प्रेत विघटित व्हायला सुरुवात होते. त्यातून दुर्गंध येऊ लागतो, त्यातली विषाक्तता वाढत जाते. हे सारं होण्याआधीच त्या प्रेताची विल्हेवाट लावण्यात येते. सनातनी हिंदू यालादेखील एक संस्कार मानतो.

(पान ६ वर)

# विकास आणि विनाशातील लक्ष्मणरेषा



**मानवजातीच्या इतिहासात विकास हा नेहमीच प्रगतीचा समानार्थी शब्द मानला गेला. चाकाच्या शोधापासून औद्योगिक क्रांतीपर्यंत आणि डिजिटल युगापर्यंत माणसाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर नवनवीन क्षितिजे गाठली; परंतु हा विकास निसर्गाशी सुसंगत नसून विनाशाची बीजे पेरतो आहे. परिणामी विकास आणि विनाश यांच्यामधील बारीक पण अत्यंत महत्त्वाची सीमारेषा आजच्या काळातील खरी 'लक्ष्मणरेषा' ठरते.**

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

२० व्या शतकानंतर औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या वापरामुळे मानवी जीवन अधिक सुलभ झाले. उंच इमारती, वेगवान वाहतूक, प्रचंड ऊर्जा निर्मिती आणि जागतिकीकरण यामुळे आधुनिकतेचा चेहरा उजळला; पण या उजेडामागे अंधारही वाढत गेला. जंगलतोड, पाण्याचे अति-शोषण, वायू प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास ही त्याचीच चिन्हे आहेत. आज हवामान बदल ही केवळ वैज्ञानिक संज्ञा राहिलेली नाही, तर ती वास्तव आहे. वितळणारे हिमनद, वाढते समुद्रपातळीचे प्रमाण, अनियमित पाऊस आणि उष्णतेच्या लाटा हे सर्व निसर्गाच्या असंतुलनाचे संकेत आहेत. विकासाच्या नावे आपण पृथ्वीच्या सहनशक्तीची परीक्षा घेत आहोत. प्रत्येक देश आर्थिक वाढीचा दर वाढविण्याच्या स्पर्धेत आहे. मोठे प्रकल्प, औद्योगिक वसाहती, खाणकाम आणि पायाभूत सुविधा यामुळे रोजगार निर्मिती होते, अर्थव्यवस्था बळकट होते; पण या विकासाची किंमत कोण मोजते? अनेकदा ती किंमत पर्यावरण मोजते आणि शेवटी मानवजात. नदी प्रदूषणामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. हवा प्रदूषणामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर बनतो, तर जंगलतोडीमुळे आदिवासी संस्कृती आणि वन्यजीव धोक्यात येतात. आर्थिक प्रगतीच्या नादात आपण भविष्यातील पिढ्यांवर पर्यावरणीय कर्ज लादत आहोत. हे कर्ज पैशाने फेडता येत नाही, तर ते फेडावे लागते. विकास आणि पर्यावरण यांना परस्परविरोधी मानण्याची प्रवृत्ती चुकीची आहे. शाश्वत विकास ही संकल्पना याच प्रश्नाचे उत्तर देते. आजच्या गरजा भागवताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर गदा येऊ नये. अक्षय ऊर्जा, सेंद्रिय शेती, जलसंवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि हरित तंत्रज्ञान यांचा अवलंब केल्यास विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखता येऊ शकतो. स्थानिक पातळीवरही नागरिकांची भूमिका महत्त्वाची आहे. प्लॅस्टिकचा कमी वापर, पाण्याची बचत, झाडे लावणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे या छोट्या कृती मोठा बदल घडवू शकतात. शासनाच्या धोरणांइतकीच जनसहभागाचीही गरज आहे. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ कायदेशीर किंवा राजकीय जबाबदारी नाही, तर ती नैतिक जबाबदारी आहे. पृथ्वी ही केवळ संसाधनांचा साठा नसून ती आपल्या अस्तित्वाचा पाया आहे. माणूस निसर्गाचा स्वामी नसून एक घटक आहे, हे समजणे आवश्यक आहे. आज आपण विकासाच्या वाटेवर उभे आहोत; पण त्या वाटेवर चालताना लक्ष्मणरेषा ओलांडली जाऊ नये, याची काळजी घ्यावी लागेल. अन्यथा, विकासाच्या नावाखाली आपण स्वतःच्याच पायाखालची जमीन सरकवू. प्रगतीची व्याख्या केवळ आर्थिक वाढीत न मोजता पर्यावरणीय समतोल, सामाजिक न्याय आणि मानवी कल्याण यांत शोधली पाहिजे. विकास आणि विनाशातील लक्ष्मणरेषा ओळखून तिचा आदर करूनच आपण खऱ्या अर्थाने समृद्ध आणि सुरक्षित भविष्य घडवू शकतो.

पर्यावरण आणि माणूस यांचे नाते संघर्षाचे नसून सहजीवनाचे आहे. या सहजीवनाची जाणीव जपली, तरच विकासाची दिशा योग्य राहील अन्यथा इतिहास आपल्याला विनाशाचे शिलालेख म्हणूनच लक्षात ठेवेल. जलवायू परिवर्तन ही काही कल्पना नाही आणि आता त्यासाठी पुरावे गोळा करण्याचीही गरज उरलेली नाही. मागील एका दशकात घडलेल्या घटना आणि यंदाच्या वर्षातही आपण जे काही पाहिले व भोगले आहे, त्या सर्व गोष्टी स्पष्ट संकेत देतात की, काहीतरी बदलत आहे आणि तो बदल धोकादायक आहे. निसर्गाच्या या बदलत्या वर्तनाचे सर्वांत मोठे दोषी आपण स्वतः आहोत. ही आता एक मोठी जागतिक घटना बनली आहे. आज कोणताही देश असा दावा करू शकत नाही की तो सुरक्षित आहे. अगदी ते देशही नाहीत, जे आपल्या पर्यावरण आणि निसर्गाच्या संरक्षणासाठी प्रयत्नशील राहिले आहेत. भारतामध्येच नव्हे, तर संपूर्ण जगात २०२४ साली भीषण उष्णतेने कहर केला. ५० अंश सेल्सिअसपर्यंतची जीवघेणी उष्णता आपण सहन केली आणि २०२५ मध्ये ही स्थिती इतकी सामान्य झाली की, कोणालाही त्याचे आश्चर्य वाटेनासे झाले. त्यानंतर जगभर आलेल्या पुरांनी परिस्थिती आणखी गंभीर केली. इतकेच नव्हे, तर सौदी अरेबियासारख्या देशात (जिथे बर्फाची कल्पनाही करता येत नाही) काही भागांत जोरदार हिमवृष्टी झाली. हे कोणासाठीही आश्चवर्यकारक होते; परंतु कथित 'रोमँटिक पर्यावरणवादाने' त्याला 'विंटर वंडरलँड' असे संबोधून सादर केले. त्याला निसर्गाचा चमत्कार म्हटले जात आहे; पण वास्तव हे आहे की, तो निसर्गाचा प्रहार आहे. या दोन्हींतला फरक समजून घेणे आज अत्यंत आवश्यक आहे. मागील १० वर्षांची आकडेवारी पाहिली, तर पर्वतीय प्रदेश असोत किंवा मैदानी भाग (हिमाचल प्रदेश, उत्तराखंड किंवा केरळ); सर्वत्र काही ना काही असे घडले आहे. त्याचा अर्थ असा की, हवामान आता आपल्या नियंत्रणात राहिलेले नाही. हा निसर्गाचा अंतिम संदेश आहे की, अजूनही समजून घेण्याची व सावरण्याची वेळ आहे. निसर्ग कोणत्याही देशाच्या चांगल्या किंवा वाईट वर्तनात भेद करत नाही. विकसित देश असोत वा अविकसित; निसर्गाशी केलेल्या खेळाची किंमत सर्वांनाच मोजावी लागेल.

आता प्रश्न निसर्गाला वाचवण्याचा नसून स्वतःला वाचवण्याचा आहे. आज जगातील सर्वांत मोठी शर्यत आर्थिक विकासाची आहे. हे सर्व उत्तम जीवनाच्या कल्पनेसाठी, सुख-सुविधांनी परिपूर्ण जगासाठी केले जात आहे. आपण निसर्गाशी जसा व्यवहार केला आहे, तीच सुखे पुढे मोठ्या दुःखात परिवर्तित होणार आहेत आणि कदाचित आपण ती सहनही करू शकणार नाही. सुमारे २५ कोटी वर्षांपूर्वी आणि नंतर साडेसहा कोटी वर्षांपूर्वी निसर्गात असे मोठे बदल झाले. त्यामुळे संपूर्ण जीवसृष्टी नष्ट झाली. मानवी सभ्यतेच्या इतिहासातही सिंधू संस्कृती असो, प्राचीन इजिप्तचे जुने साम्राज्य असो किंवा माया संस्कृती; त्यांच्या पतनात निसर्गाची भूमिका निर्णायक ठरली आहे. मागील ४० वर्षांच्या आकडेवारीनुसार, सर्वाधिक नैसर्गिक आपत्ती अमेरिकेत त्यानंतर चीनमध्ये आणि तिसऱ्या क्रमांकावर भारतात आल्या आहेत. हे तीनही देश त्यांच्या अर्थव्यवस्थांसाठी ओळखले जातात. आर्थिक विकासाला विरोध नाही किंवा हरकतही नाही; परंतु जर आपण अर्थव्यवस्था आणि पर्यावरणशास्त्र यांना एकत्र घेऊन पुढे चाललो, तर अधिक चांगला, सुरक्षित आणि संतुलित समाज उभारणे शक्य आहे. एका बाजूला निसर्ग आपली संवेदना व्यक्त करत आहे, तर दुसऱ्या बाजूला सरकारांना विरोधाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत एकत्र बसून विकासाची रेषा ठरवली जावी. त्याला सर्वांची मान्यता आहे.

विकास आणि विनाश यांच्यामधील हीच ती लक्ष्मणरेषा असेल, जी ओलांडणे कोणाच्याही हिताचे ठरणार नाही. महामार्ग, वेगवान दळणवळण, डिजिटल क्रांती आणि औद्योगिक विस्तार हे सर्व विकासाचे प्रतीक मानले जातात; परंतु या चकाकत्या प्रगतीच्या मागे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. हा विकास निसर्गाशी सुसंगत आहे का? की आपण प्रगतीच्या नावाखाली स्वतःच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करीत आहोत? गेल्या काही दशकांत हवामानातील तीव्र बदल अनुभवायला मिळत आहेत. वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान, वारंवार येणारे पूर आणि दुष्काळ, समुद्रपातळीत होणारी वाढ हे सर्व संकेत एका मोठ्या पर्यावरणीय असमतोलाकडे निर्देश करतात.

(पान ६ वर)

## श्रीराम नवमी

अवध पुरी जन्मे श्रीहरि रामावतार या पृथेवरी
चैत्राचा मास बहरे खास निसर्ग फुले हो स्वागतास
इंदुकलेने बाललीलेने वाढले बाळ ऊब मायेने
कोदंड धारी तो मनोहारी कृपा कटाक्षे दुःख निवारी
सत्य वचनी हा एकपत्नी आदर्श पती हा त्रिभुवनी
सुवर्ण लंका नसावी शंका रावण वध रामाचा डंका
श्रीराम नाम सफल काम सकल जना उद्धरी राम

मंजिरी अनसिंगकर



## मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम (अभंग)

चैत्र नवमीस । कौसल्या उदरी।।
अयोध्या नगरी । रामजन्म ।।
पुरुषोत्तमाचा । प्रकटे भूवर।।
सप्त अवतार । श्रीविष्णूंचा।।
दशरथ पिता । मायाळू त्रिमाता।।
थोर जन्मदाता । लाभतसे।।
पाळण्या वचन । प्रे ळ पित्याचे।।
सोडीले राज्याचे । सिंहासन।।
चौदा वर्षांसाठी । लक्ष्मणाच्या संगे।।
सीताही वामांगे । वनवास।।
मर्यादा पालन । श्रेष्ठतम राजा।।
पुत्रवत प्रजा । राजमणी।।
अहल्या उद्धार । रावण संहार।।
उष्टावली बोरं । शबरीची।।
विश्वामित्र गुरु । बोध वरिष्ठांचे।।
चारही बंधूचे । गुरुकुल।।
हनु ंत, बाली । प्रणाम करिती।।
त्रिभूवनी कीर्ती । श्रीरामांची।।
त्याग, निष्ठा, तेज । मूर्ति ंत रूप।।
दैवीय स्वरूप । धनुर्धर ।।
स्वामी त्रिलोकीचा । चार पुरुषार्थ।।
धर्म, काम, अर्थ । मोक्ष ठायी।।

स्वप्ना जगदळे

## जानकी जीवन सीताराम

जानकी जीवन सीता राम,
राम राम राम राजा राम राम राम ।।१।।
नम्रता किरीटी तुज श्री राघव,
राजा प्रग्म प्रतापी हे नरा ।।२।।
कीर्ति ंत श्रीराम प्रभू तू,
तारक गुणी श्रीराम भगवंता ।।३।।
जीवन तुझे प्रजेसी समर्पण,
भक्त रक्षकावतार धरासी ।।४।।
वनवास तुझा अति कष्ट सोशिसी,
प्रजाहित 'मनवा' तव राजन ।।५।।
नम्र स्वभावे जिंकिले रामा,
परशुराम तप तेज राघव ।।६।।
सीतापती अवधपुरी श्रीरामा,
'रामबाण' अद्भुत तव राजाजी ।।७।।
तारक नाम तुझे 'सीताराम',
रामासवे अर्धांगी जानकी ।।८।।
रामनाम उत्तुंग शिला तरे,
रामनाम शिवशंकर ध्यान ।।९।।
मनवा हृदी श्रीराम जानकी,
प्रतापी वीर दयाशील राजा ।।१०।।
जानकी जीवन सीताराम...

डॉ. मिलिंद इंदूरकर

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# काठीची होळी : एक अलौकिक अनुभूती



सातपुड्याच्या पर्वतरांगांमधून झोकात वळणे घेत आमची गाडी अवघड घाट चढत होती. बऱ्याच वर्षांपासून 'काठीची होळी' ऐकली होती. आज प्रत्यक्ष बघायचा अनुभव मिळणार होता. मोलगी पार करताना काठीच्या होळीसाठी सजलेल्या तरुणांनी गाडी अडवली. 'होल्या' आणि 'होलण' अंगावर राख पांघरून आणि हातात मोरपिसे नाचवत होळीचा 'फाग' मागायला समोर आली. रस्त्याच्या दुतर्फा ताज्या लालचुटुक स्ट्रॉबेरी विकण्यासाठी पोरंसोरं बसली होती. 'स्ट्रॉबेरी शेतीमुळे पाड्यावरचं आयुष्यच बदलून गेलंय.' ड्रायव्हर स्थानिक असल्यामुळे त्याला येथल्या बारीकसारीक गोष्टी माहीत होत्या. पाड्यावरचं कष्टप्रद जीवन त्याने अनुभवलं होतं.

'होळी म्हणजे आनंद. मोहाच्या दारूचा सुगंध.' खरोखरीच आजूबाजूची झाडं चैतन्याने सळसळत होती. शेतातली हिरवी पाती उत्साहाने चमचमत होती. 'हे भगरीचं शेत आहे बरं ताई. येथे भगर उपवासाला नाही खात. चिकनच्या रश्याबरोबर मस्त ओरपतो आम्ही.' असे अनेक सांस्कृतिक धक्के पचवित आम्ही सातपुड्याच्या कुशीत वरवर चढत होतो. नंदुरबार जिल्ह्यातील काठी (अक्कलकुवा तालुका) येथील राजवाडी होळीला ८०० वर्षांची समृद्ध परंपरा आहे. उम्मेदजी लक्ष्मण, रोतुजी उमेद, चंद्रसिंह रोतुजी या आदिवासी राजांनी काठीच्या होळीला राजाश्रय दिला. ही परंपरा इ. स. १२४६ पासून उमेदसिंग राजाने सुरू केली. काठी राजवाडीचे वंशज पृथ्वीसिंग पाडवी आणि इतर पाडवी कुटुंबीय तसेच सर्व ग्रामस्थांनी काठीच्या होळीला पवित्र मानले आणि होळीची तयारी पाड्यापाड्यांवर होऊ लागली. पाडवी म्हणजे 'पहाड वीर.' काठी संस्थानाचे हे वंशज पूर्वी १०२ खेड्यांचे संस्थानिक होते. त्यातली दोन खेडी आता गुजरातला गेली आहेत. १८०४ साली याच चंद्रवंशी राजगादीने ब्रिटिशांविरुद्ध पहिला उठाव केलेला होता. सातपुड्याच्या पर्वतरांगा आणि आजूबाजूला घनदाट वनराई यामुळे या पहाडवीरांचे तीरबाण ब्रिटिश सैनिकाला घायाळ करीत असत. वरखेडी नदीच्या जणू सोबतच आम्ही चालत होतो. मधूनच ती बोलत होती. कधी अवखळपणे धावत होती. तिलाही आमच्यासारखीच पवित्र काठीच्या बांबूची आस लागली होती. काठी होळीसाठी ७० फूट उंचीचा पवित्र बांबू गुजरात, नेमगीरहून आणला जातो. या पवित्र बांबूला डोंगरदऱ्यातून तासन्‌तास पायी प्रवास करून मानकरी आणतात. 'चापडी' आणि 'मोकस' गावांमध्ये मात्र त्यांचा काही वेळ मुक्काम असतो. हा बांबू कसा ओळखायचा? घनदाट अरण्यात सर्वात उंच वाढलेला बांबू म्हणजे काठीचा बांबू. बांबूला काढण्यासाठी कोणतेच हत्यार वापरले जात नाही. फक्त हाताने आजूबाजूची माती उकरायची. फार मेहनतीचे असते हे काम. मुळांना सुखरूप ठेवून पुजले जाते. नंतर दुसऱ्या एका सशक्त तरतरीत बांबूला पुजून त्याला पुढच्या वर्षीचे आमंत्रण दिले जाते. एकदा का त्याला प्रेमाचा धागा बांधला तर ते बंधन वर्षभर कोणीच तोडत नाही. त्या बांबूला पुढच्या वर्षासाठी राखून ठेवले जाते. अरण्यातील सर्व पूजा यथासांग पार पडतात आणि अलगदपणे मानकरी काठीच्या पवित्र बांबूचा दांडा खांद्यावर धरतात. आता सुरू होतो तासन्‌तास कष्टदायी प्रवास. गावागावातून, पाड्यापाड्यातून हा काठीचा दांडा मिरवत मिरवत पहाटेच्या सुमारास काठीपर्यंत पोहोचतो. एका वळणदार वाटेवर भगतपाडा लागला. तिथे थोडा वेळ चहासाठी विसावलो. बरेचसे पालमी तेथे रात्रीच्या उत्सवासाठी तयार होत होते. पालमी म्हणजे जे नवस बोललेले आहेत. अंगावर चुन्याचं गोंदण, डोक्यावर मोरपीस असा पेहराव नवस बोललेलेच करतात. बुध्या, बावा, मोरक्या सगळेजण तयार होत होते. मोरक्याने फेटा बांधला. वरती भलामोठा मोरपिसांचा तुरा खोवला. कमरेला वस्त्र बांधलं. त्यावर चांदीची दोरी करकचून बांधली. मोठाले घुंगरू बांधले. वाळवलेल्या भोपळ्याच्या बियांचं पावरा वाद्य बांधलं. अंगभर चुन्याचं गोंदण लावलं. गळ्यात चांदीचे जाडजूड हार घातले. हातात ढोलकी घेतली. माठाच्या तोंडाला बकऱ्याचं चामडं ताणून अंबाडीची दोरी बांधली की ढोलकी बनते. निसर्ग आदिवासीच्या हृदयातच आहे. झाडावरची पानं सहज खुडून तळव्याने पानांना दाबत सुंदर नैसर्गिक रंग ते तयार करतात. काही पुरुषांनीच बायकांचे सोंग घेतले होते. त्यांना 'कालीदेवी' म्हणतात. त्यांचे दागिने बघण्यासारखे होते. बांगड्या, बासक्या, वाकड्या, चांदीचे हार घालून जेव्हा ते ठुमकत चालू लागले तेव्हा अरण्यात अनुपम लावण्याची आभा पसरली. सूर्य हळूहळू विझू लागला होता. पक्ष्यांचे थवे झाडांवर झेपावत होते. हिरव्या करड्या सातपुड्याच्या पर्वतरांगांवर तांबूस रंगाची उधळण झाली होती.

नुकतीच उमलू लागलेली तांबूस-लाल पळस फुले होळीच्या ज्वालांची आठवण करून देत होती. निसर्गाची रंगपंचमी कायमच सुरू असते. दूरच्या एका वळणावर 'भगदरी' अशी काठीनजीकच्या खेड्याची छोटीशी पाटी दिसली. शेणाने स्वच्छ सारवलेले अंगण, बांबू-मातीचे टुमदार घर, समोर पसरलेलं हिरवेगार शेत आणि तोंडभर हसून स्वागत करणारे गावचे सरपंच पीरसिंग पाडवी. त्यांच्याशी मनमोकळं बोलल्यानंतर त्यांची गृहिणी आम्हाला आत घेऊन गेली. स्वयंपाकघर तर अगदी लखलखत होतं. सरपंचांची पत्नी आणि त्यांच्या दोन सुना जेवणाची तयारी करीत होत्या. सगळीकडे कोळंबी माश्यांचा सुगंध पसरला होता. जेवणात सामिष शाकाहारी दोन्ही प्रकार भरपूर होते. पाहुणे वेगवेगळ्या पाड्यांवरून येतच होते, पण ती माउली थकली नाही. तिचे हसू कधीच मावळले नाही. ५०० लोक जेवायला होते, पण तिची थाळी द्रौपदीची होती. आपल्या घरच्या शहरी चौकोनी भिंतीमध्ये अवचित आलेला पाहुणा मावत नाही. पण तिच्या मातीच्या घरात मात्र एकाच वेळेस ५०० पाहुणे मनसोक्त जेवत होते. पाहुण्यांच्या हास्यकल्लोळाने पौर्णिमेचा चंद्र धुंदावला होता. एवढ्यात पातेल्यातला भात संपला. तिने लगेच शिसवाची शिडी लावली आणि वरती पोटमाळ्यावर लगलग चढली. तेथे कणग्यांमध्ये धान्य सुरक्षित ठेवलं होतं. बांबू आणि मातीने बनवलेली ती रांजणासारखी दिसणारी कणगी बाहेरून शेणाने व्यवस्थित लिंपलेली होती. जर तूर्त गरज नसेल तर त्या रांजणाचे तोंड शेणाने व्यवस्थित बंद केले होते. धान्य साठवण्याचे शीतगृहच होते जणू ते. माउलीने झटदिशी पातेले भरून तांदूळ काढले आणि तोंडभर हसत ती शिडीवरून कसलाही आधार न घेता झपाझप उतरली. भरपूर जेवण करून आम्ही काठीच्या होळी मैदानाजवळ पोहोचलो. मध्यरात्र झाली होती. आदिवासी पुरुष धुंद होऊन घुंगराच्या तालावर थिरकत होते. त्यांचे थिरकणे एवढे लयबद्ध होते की, पुन्हापुन्हा बघावेसे वाटत होते. मुरलीबाबा, बुध्या, धानका, दोडे, कालिकादेवी रंगीबेरंगी पारंपरिक पेहराव करून हजारोंच्या संख्येने रामढोलच्या तालावर लयबद्ध ठेक्यावर बेधुंद नाचत होते. भिल्ल, पावरा, कोकणी, तडवी असे कोणतेच भेद त्यांच्यात नव्हते. पावरा वाद्यांचा, शिट्ट्यांचा, ढोलाचा, बासुरीचा आवाज दाही दिशांना मुग्ध करीत होता. सातपुड्याच्या कुशीत निबिड अरण्यात उन्मलून आलेला हा निसर्गाचा तृप्त हुंकार आदिमानवाने 'ओंकार' म्हणून स्वीकारलेला असावा. काळ्याकरड्या पर्वतांना तांबडं तोरण लागलं. ७० फूट लांबीचा पवित्र बांबूचा दांडा हजारो गावकऱ्यांच्या श्रमाने आणि श्रद्धेने होळीच्या जागेवर रोवला गेला. दांड्याभोवती लाकडे, गोवऱ्या, खोबरे आणि अशा अनेक वस्तू गावकऱ्यांनी अपार श्रद्धेने टाकल्या. नारळ अगरबत्ती दाखवली. शिट्ट्या, वाद्ये, रामढोलाचा आवाज आसमंतात दुमदुमला आणि पहाटप्रहरी काठीची पवित्र होळी धडधडत पेटली. होळी मातेने श्रमलेल्या गावकऱ्यांना पोट भरून आशीर्वाद दिले. काठीच्या मुख्य होळीनंतर महिनाभर पंचक्रोशीतल्या पाड्यांवर होळी साजरी होईल. राधावेष ल्येऊन पुरुषांचे घेरा नृत्य होईल. गावजेवण होईल आणि देवमोगरा देवी तृप्त मनाने सबंध विश्वाला सुखसमृद्धीचा आशीर्वाद देईल... आशीर्वादाची पळसफुलं घेऊन काँक्रीटच्या जंगलात आता परतीची वाट धरली आहे.

व्यक्तीवेध

श्रीकर परदेशी

# ॥ नीतीवंत, पुण्यवंत, वरदवंत ॥



श्री देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाल्यानंतरची गेली अडीच वर्षे मी त्यांचा प्रधान सचिव म्हणून कामपाहात आहे. परंतु त्यांच्याशी असलेला प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष ऋणानुबंध मात्र अडीच वर्षांहून किती तरी जुना, म्हणजे जवळपास पंचवीस वर्षांचा आहे. मसुरीच्या प्रशिक्षणात प्रत्येक प्रशिक्षणार्थीला एक ज्येष्ठ आय.ए.एस.अधिकारी काउन्सेलर म्हणून देण्यात येतात. ते सगळी यथासांग चर्चा करुन प्रशिक्षणार्थीच्या करियरची पुढील दिशा ठरवतात. मी सोलापूरचा आहे. आय.आय.टी.तून केमिकल इंजिनियर झालो. प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून हातून काहीतरी चांगलं कामघडावं अशी माझी मनीषा आहे. उच्च शिक्षणासाठी अनेक उत्तम अमेरिकी विद्यापीठातील शिष्यवृत्ती मला मिळाल्या होत्या. त्यानिमित्ताने मी बरेच भ्रमण करु शकलो असलो तरी, मी तुळजापूरच्या पूर्वेला मात्र कधीही गेलो नाही. माझे हे वाक्य ऐकताच ते काउन्सेलर म्हणाले, उत्तम, मग तुला चंद्रपूरला पाठवू.!!

चंद्रपूरला पोचलो तर चंद्रपुरातच काय पण आख्ख्या विदर्भात (नंतर माझी पत्नी झालेल्या मनीषाचा अपवाद वगळता) माझा एकाही व्यक्तीशी परिचय नव्हता. आय.ए.एस. प्रशिक्षणार्थीला वेळ भरपूर, निश्चित असं काम नाही, त्यामुळे भटकायची अमर्याद मुभा असते. देवेंद्र फडणवीस हे काम करायला लागते हां, भौ!! असे पाच-सातशे तरी एसएमएस त्यांच्या मोबाईलवर रोज दणादण आदळत असतात. त्यांच्या काकू शोभाताई तेव्हा आमदार होत्या. भाजप हा त्याकाळी फार हवा-हवासा फॅशनेबल पक्ष नव्हता. ह्या पक्षाचे मर्यादित लोक-प्रतिनिधी होते. सुमतीबाई सुकळीकर अनेक प्रयत्नांनंतरही शहरी नागपुरातून कधी निवडून येऊ शकल्या नव्हत्या. समितीच्या माध्यमातून मनीषाच्या आजी-शी त्यांची खूपच सलगी होती आणि त्यांच्या निवडणुकीच्या रणनितीविषयी उत्साही चर्चा घडायच्या...तगडी राजकीय मिरासदारी, वारसा नसलेल्या बाळबोध मध्यमवर्गीय घरातील गृहिणी आमदार म्हणून शोभातांई भोवती एक वलय होते. फटफटीवरुन किंवा १५-२० कार्यकर्ते कोंबलेल्या उघड्या कमांडर जीपमधून त्या चंद्रपूरच्या ४५ डिग्री उन्हात फिरत असत. मूल येथील त्यांचे घर, शेती पाहायचा योग तेव्हा आला. सरांचा, त्यांच्या कुटुंबाचा शेतीशी काही संबंध नाही असा जो बोभाटा सध्या सर्हास केला जातो तो ऐकून मला आश्चर्य वाटते. तोपर्यंत, हुरडा खायला शेतावर जाण्याइतकाच शेतीशी संबंध असलेल्या मला, कास्तकारीचं अर्थशास्त्र, बारकावे समजून घ्यायची पहिली संधी तेव्हा मिळाली. ही त्या ऋणानुबंधाची अप्रत्यक्षच सुरुवात. त्यानंतर अमरावती, वर्धा जिल्ह्यांत माझी नेमणूक झाली. सरांची राजकीय कारकीर्द आता कुठे सुरु झाली होती.

वयाच्या विशीतच ते नागपूरचे महापौर झाले. तेव्हा मी आणि मनीषा त्यांना भेटायला गेलो आणि म्हणालो... वयाच्या विशीतच आपण महापौर झाला आहात, वयाच्या चाळिशीत मुख्यमंत्री नक्की होणार! तेव्हा त्यांनी किंचित स्मित हास्य केले. (ते मुख्यमंत्री झाल्यावर भेटायला गेलो आणि तशाच अर्थाचं काही म्हणालो तेव्हाही, त्यांनी पुन्हा तसेच स्मितहास्य केले.) सरांचे 'ट्रेडमार्क स्मित-हास्य' हा त्यांच्या लोभस व्यक्तिमत्वाचा खास पैलू.

**नृपस्य चित्तं, पुरुषस्य भाग्यम्!!** असा एक श्लोक आहे. म्हणजे राजाच्या मनात आणि पुरुषाच्या भाग्यात काय आहे हे ब्रह्मदेव-ालाही समजणार नाही. एका कॉलेजच्या स्नेह-संमेलनात असा विषय निघाला की, देवेंद्र फडणवीस मुलांना का आवडतात? ते अत्यंत कर्तबगार आहेत, प्रामाणिक आहेत, अभ्यासू आहेत, प्रचंड हुशार आहेत अशी बरीच उत्तरे झाल्यावर एक मुलगी उत्स्फूर्तपणे म्हणाली, बिकॉज ही इज सो क्यूट! सरांच्या चेहऱ्यावरचे निरागस भाव हा त्यांच्या क्यूट स्मित हास्या इतकाच त्यांचा खास विशेष. सरांना ज्यांनी पूर्वायुष्यात मदत केली आहे, जे त्यांचे मित्र आहेत त्यांच्यासाठी सर नेहमीच धावून जातात हे तर स्वाभाविकच. पण जी लोकं अगोदरच्या काळात त्यांच्याशी वाईट वागली आहेत, नाहक त्रास दिला आहे असाही कुणी जर अडचणीत असेल, त्याचे काही काम असेल तर सर लगेच ते करतील. इतक्या सरळ माणसाचा चेहरा नेहमी निरागस दिसणारच की!

विदर्भात जिल्हाधिकारी म्हणून काम करत असलो तरी सरांच्या भेटी फार व्हायच्या नाहीत. पण माझी सासुरवाडी नागपूरला आणि सर राहतात त्याच धरमपेठ भागात. शिवाय मनीषा आणि सर एकाच शाळेत, कॉलेजात होते. त्यामुळे समान मित्र, स्नेह्यांची रेलचेल होती. त्यांच्या बहरत चाललेल्या राजकीय घोडदौडीविषयी त्यांचे वडील दिवंगत गंगाधरराव फडणवीस यांच्या अफाट लोक-संग्रहाविषयी, खूपदा चर्चा व्हायची. गंगाधरराव आणिबाणीत तुरुंगात होते. तेव्हां देवेंद्रनी बाणेदारपणे सांगितलं की अशा स्थितीत मी 'इंदिरा' कॉन्व्हेंट हया नावाच्या शाळेत जाणार नाही. वयाच्या सहाव्या वर्षी किती मुलांना इतकी जाण, इतकं धैर्य, इतका निश्चय असतो?

देवेंद्र फडणवीस हा माणूस खूप पुढे जायला हवा, अशी कळकळीची भावना, जी राजकारण्यांबद्दल अप-वादानेच आढळते, ती सगळ्यांच्याच मनात असे. वेस्ट हायकोर्ट रोडवरील इंडियन कॉफी हाऊस, रेड्डी मेस अशा खवय्येप्रिय गप्पा अड्ड्यांवर सरांचे दर्शन हमखास व्हायचे. सामोसा खाऊन तो कुठला आहे हे त्यांना बिनचूक ओळखता यायचे. आईच्या हातचं खाणं ही अत्युच्च पसंद, मग ती साधी फोडणीची पोळी का असेना! साहजिकच आई देखील खूप अभिमानाने नेहमीच आवर्जून सांगतात, आधी प्रश्न विचारतो, कोणी बनवलंय महाराजने की तू? आणि मी बनवलेलं असेल तरच खातो. जगण्यासाठी खावं, खाण्यासाठी जगू नये अशी शिष्टसंमत उक्ती असतांना, मी मात्र खाण्यासाठी जगतो असं सर बिनधास्त म्हणतात. पण त्याचवेळी, सरांनी नुकतंच तीस किलो वजन घटवलं हे विशेष!

एकदा का एखादी गोष्ट मनावर घेतली की ती करायचीच, हे त्यांच्या उत्तुंग यशामागचं महत्वाचं सूत्र आहे. सरांचे काका अण्णासाहेब फडणवीस हे अत्यंत सत्प्रवृत्त आणि कार्यक्षम असे प्रशासकीय अधिकारी होते. माझ्या सासरेबुवांचे ते काही वर्षे वरिष्ठ सहकारी असल्याने त्यांच्या कुटुंबाचाही उत्तम परिचय होता. ते बुलढाण्याला जिल्हाधिकारी असतांना, तेव्हाचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांनी त्यांना एकदा विचारले, का हो, कलेक्टरसाहेब, ते तुरुंगात फडणवीस आहेत ते तुमचे कोण? तो माझा सख्खा बंधु. - अण्णासाहेब!

ओह..! मग तुमचे संबंध आहेत कां त्यांचेशी अजून? -शंकरराव. प्रश्नच नाही. पुर्वीप्रमाणेच उत्तम संबंध तर आहेतच, पण तितकेच नव्हे तर एका ध्येयापोटी ते हा तुरुंगवास भोगत आहेत ह्याचा अभिमान आहे. -अण्णासाहेब. मुख्यमंत्र्यांना इतकं स्पष्टपणे बोलण्याची छाती खूप कमी अधिकाऱ्यामध्ये असते. तो तर आणिबाणीचा कठीण काळ होता. त्या काळात असे बोलण्याची हिंमत. तेही कसलाच कटुपणा उद्भवू न देता दाखवणं, हे विशेषच! देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले तेव्हा आणि त्यानंतरच्या काळात, अनेकजण अधूनमधून चुकचुकायचे की, श्री फडणवीस हे आहेत उत्तमच पण तरुण आहेत (म्हणजे ज्युनियर आहेत.) त्यांच्यापेक्षाही ज्येष्ठ, अनुभवी मंडळी आहेत की... असा सूर असतो. त्यावर मला असं वाटतं की, वर मी उल्लेख केलेल्या सर्व पूर्वसुरींची, त्यांनी घेतलेल्या परिश्रमांची, खालेल्लया खस्तांची पुण्याई देवेंद्र फडणवीस यांच्यामागे भक्कमपणे उभी आहे. अशीही मौलिक शिदोरी बरोबर असायला माणूस सरांसारखा सुसंस्कृत, वडिलधाऱ्याचा मान राखणारा, असा आज्ञाधारक पुत्र, पुतण्या, भाचा असावा लागतो! म्हणून लेखाच्या शीर्षकात 'पुण्यवंत' हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे. त्याच काळात त्यांच्या पत्नी अमृताजी स्थानिक ॲक्सिस बॅंकेत होत्या. त्या स्कूटी घेऊन येत आणि बॅंकेची अमुक एखादी डिपॉझिट योजना घ्याच असं माझ्या सासूबाईंना पटवून देत. मुरलेल्या एलआयसी एजंटला शोभेल अशा चिकाटीने चाललेला तो संवाद शांतपणे ऐकताना मला मोठी गंमत वाटायची. एखाद्या व्यक्तीच्या सतत भेटीगाठी होत नसतानाही, असंख्य अदृश्य धाग्यांनी त्या व्यक्तीचा संबंध येत राहतो, हा अनुभव मला सरांच्या बाबतीत आला. ह्यालाच मराठीत 'ऋणानुबंध' हा शब्द असावा. वीस वर्षानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांचा प्रधान सचिव म्हणून काम करण्याचे भाग्य माझ्या वाट्याला येईल हे त्या काळी माझ्या स्वप्नातही आलं नसतं. Knowledge ir Power हे तंतोतंत खरं आहे, तरी सध्याच्या गुगलच्या काळात, सगळंच ज्ञान प्रत्येकाला चुटकीसरशी उपलब्ध आहे म्हण्टल्यावर, प्रत्येकजण पॉवरफुल होतो का? ह्या प्रश्नाचं उत्तर मला सरांबरोबर काम करताना मिळालं. महाराष्ट्रातील काना- कोपऱ्यातली एखादी गोष्ट असो किंवा हवामानशास्त्र, अद्ययावत तंत्रज्ञान, संगीत, एखाद्या अधिकार्याचे, मंत्र्याच्या खाजगी सचिवाचे कोणकोणते 'उद्योग'चालू आहेत?, चित्रपट, विमानं, शेती अशा असंख्य विषयांची बित्तं-बातमी त्यांच्याकडे असते. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्याना भेडसावणारी एक अडचण म्हणजे, त्यांना काही सांगायला जावं, तर ते त्यांना अगोदरच ठाऊक असते,

(पान ६ वर)

पान १ वरून

## जय श्रीराम

भेदांच्या भिंतींमध्ये बंदिस्त झालेला समाज बलाढ्य दैत्यांसमोर उभा करायचा. अचानक राजगादीला पारख्या झालेल्या या वल्कलधारी कोवळ्या राजकुमारांवर कोण विश्वास ठेवणार! यासाठी घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक परीक्षेला तोंड द्यावे लागणार. 'मैत्र जिवांचे' हा रामबाण मार्ग! राम नावाच्या सभ्यतेचा प्रवास सुरू झाला. मैत्री, प्रेम, करुणा, विश्वास या आधारावर जय श्रीराम...! जनसमूह मिळवला की मग त्यांना होणाऱ्या आक्रमणांचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज करणे. वास्तव्य काळात समग्र समाजाचे मानसिक परिवर्तन करायचे आहे.

मागे सोडलेला भूभाग, जोडलेले मित्र, ठिकठिकाणी विविध प्रयोग करणाऱ्या यज्ञशाळा, आपले वर्तमानातील वास्तव्य यात संपर्क यंत्रणा प्रस्थापित करणे. शत्रूवर पाळत ठेवणे. ठिकठिकाणी एकाचवेळी शत्रूला नामोहरम करणे. मदांध, क्रूर शत्रूचा आपल्या प्रभावक्षेत्रात शिरकाव न होऊ देणे, अशा सर्व आघाड्यांवर वनवासातील प्रत्येक क्षण व्यतीत होत होता. निषाद, भिल्ल, वानर, गिद्ध यांसह सर्व लढवय्या जातिसमूहांमध्ये जननी जन्मभूमीसाठी लढण्याची सिद्धता करणे.

विविध भाषा, विविध बोली, विविध वेशभूषा, विविध परंपरा या सर्वांचा सुवर्णमध्य साधून सर्वांची तोंडं शत्रूच्या दिशेने उभे करणे, यात राम, लक्ष्मण व सीता तिघांनाही उसंत नव्हती. भगवती सीतेच्या हरणानंतर हा संघर्ष उभा नाही झाला. उलट अधमावर धर्माचा विजय संपादन करण्यासाठी पहिला संघटित व सशक्त प्रयत्न झाला म्हणून सीतेला या संकटाला सामोरे जावे लागले. समुद्रापल्याड स्वर्णमयी लंकेतील रावण, कुंभकर्ण, मेघनाथ, अही-मही रावण या अतुलनीय, प्रचंड शस्त्रसाठा आणि सैन्यसाठा असलेल्या राक्षसांशी युद्ध हे काही अतींद्रिय शक्तीच्या आधारे नव्हते.

सागर पार करायचा म्हणून लागणाऱ्या युद्ध नौका, आवश्यकता भासल्यास सेतुबंधन अशी पूर्वतयारी. प्रतिकूलतेत प्रवाहाविरुद्ध पोहण्यासाठी लागणारी सर्व ताकद एकवटून केलेला हा शंखनाद किती कठीण असेल! रामाने याही काळात मर्यादांचे तंतोतंत पालन केले. अन्यायाविरुद्ध लढा दिला. सुग्रीवाला राज्य परत मिळवून दिले. सज्जनशक्तीचे रक्षण केले. हनुमान, नल, नील, जाम्बुवंत, जटायू, सुग्रीव यांच्यासह एकीकडे सर्व जनजाती एका सूत्रात बांधल्या;तर दुसरीकडे राष्ट्रातील सर्व ऋषिकुळांची अतूट संपर्क व्यवस्था उभी केली. 'निशिचर हीन करऊ मही,' ही विश्वासपूर्ण प्रतिज्ञा पूर्ण केली. अशक्य ते शक्य झाले. 'मुकं करोती वाचालम्'चा प्रत्यय समाजमनाने घेतला.

खरोखरच भूवरी रावणवध झाला. आज आम्ही ज्याला रामलीला म्हणतो, ती अवतारी पुरुषाची चमत्कारी कथा नाही. ते यश आहे एका आदर्श संघटकाचे. ते यश आहे संकल्पाचे. प्रयत्नांच्या पराकाष्ठेचे. मानवी मूल्यांचे. असुरी शक्तींना गाडून टाकण्याच्या संघटित समाजमनाच्या हुंकाराचे ते यश आहे. रामाने पुत्र, पिता, पती, बंधू म्हणून आदर्श प्रस्थापित केलेच. पण माझ्या वर्तमानाला गरज आहे, वनवासी रामाच्या ध्येयनिष्ठ जीवनाची. आजही मारीच, शूर्पणखा, सुबाहू, त्राटिका डोकावल्या की गरज भासते ती रामाची. म्हणूनच राम आमची राष्ट्रीय अस्मिता आहे. स्वर्णमयी लंका न मिले माँ, अवधपुरीकी धूल मिले, सोने मे काटे चुभते है, मिट्टी मे है फूल खिले, सांगणारा राम या राष्ट्राची कायम गरज राहणार आहे...

## आखाती समृद्धीचे भवितव्य...

इराण एकीकडे जागतिक अर्थव्यवस्था संकटात आणून, तर दुसरीकडे अमेरिकन सैनिकांना लक्ष्य करून अमेरिकेत युद्धविरोधी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्यासाठी केवळ युद्ध थांबणे पुरेसे नाहीये. त्यांच्यासाठी इस्लामिक राजवटीस अमेरिकेची मान्यता मिळवणे, ती मान्यता व्यवहारात टिकवण्यासाठी प्रादेशिक सुरक्षेमध्ये अमेरिकेच्या जोडीला रशिया आणि चीनला सहभागी करून घेणे आणि आखाती देशांकडून युद्धाचा खर्च वसूल करणे, ही उद्दिष्टे आहेत. या युद्धात आखाती अरब देश ठामपणे अमेरिकेच्या बाजूने उभे आहेत. जर हे युद्ध लांबले किंवा इराणची राजवट न बदलताच थांबले, तर सगळ्यात जास्त नुकसान या देशांचे होणार आहे. भविष्यात तेल आणि नैसर्गिक वायूचा व्यापार पूर्वपदावर येणार असला, तरी जगातील सर्वात सुरक्षित, कायद्याचे राज्य असलेली आणि पारदर्शक या त्यांच्या प्रतिमेला तडा गेला आहे. युद्ध थांबल्यानंतर हे देश गुंतवणूकदारांना आकृष्ट करण्यात किती यशस्वी होतात, यावर आखातातील समृद्धीचे भवितव्य अवलंबून आहे.

### चैत्रगौर

चैत्रमासी, हर्षानसी झाले चैत्रगौरीचे आगमन
परंपरा मराठी माणसाची करूया आपण जतन.
चैत्रगौरीची स्थापना चैत्रतृतीयेला होते
महिनाभरासाठी ती माहेराला येते.
ऋतू फुललेला, नवसृजनाने चैतन्याने भारलेला
आसमंत चैत्रगौरीच्या स्वागतासाठी
रंग उधळीत आला वसंत माहेरवाशिणीचा
थाटमाट छान झोपाळ्यावर झुलते गर्भ रेशमी
खण वस्त्र ते मुलायम, अंगावर पांघरते.
सुगंधी मोगऱ्याचा गजरा दरवळ तिच्या देव्हाऱ्यात
हळदी कुंकू वाहताच प्रसन्नता मन गाभाऱ्यात

आंबेडाळ आंबटगोड कैरीपन्हे गारगार
नैवेद्य गौरीचा असे हो चविष्ट अन् सुंदर फार
हळदीकुंकू गौरीचे उत्साहात साजरे होते
सुंदर साडी लोहपेटीच्या पायऱ्यांवर खेळणी,
वस्तूंची आरास होते लाल टरबूज पिवळे खरबूज
चकली करंज्यांनी भरली ताटे आंब्याची पाने,
मोगरा फुले भिजले चणे, आनंद वाटे.
सुख समृद्धी प्रसन्नता घेऊन येते चैत्रगौर
माहेरांगणी आनंद लुटतेमन होते भावविभोर.

मंजिरी अनसिंगकर

कथा

प्रा. कमलाकर हणवन्ते

## वेलीवरचे फूल



मालती आणि मधुसूदन रोजच्यासारखे आजही फिरण्यासाठी घराबाहेर पडले होते. पहाटेचे साडेसहा वाजले होते. त्यांची ही आर्या सोसायटी शहरापासून दूर, वस्ती विरळ. तिथे बिबट्या फिरतो, अशी वार्ता पसरलेली. अलिकडेच ते या फ्लॅटमध्ये राहायला आले होते. कारण गावात फ्लॅट घेणे परवडणारे नव्हते. हा फ्लॅटही भाड्याने घेतलेला. थंडीचे दिवस. त्यामुळे पुरते उजाडले नव्हते. मधुसूदनची केंद्र सरकारातील सामान्य नोकरी. दर तीन वर्षांनी बदली ठरलेली तर मालती गृहिणी. नोकरी तिने कधीच केलेली नव्हती. दोघांनी चाळिशी ओलांडलेली तरी संसार दोघांचाच. दोघेही समरसून जगणारे. आनंदी, रसिक जोडपे. दोघे तसे गप्प गप्पच होते. मालती मनात स्तोत्र म्हणत होती तर मधू आपल्या विचारात मालतीच्या पुढे चालला होता. चालता चालता मालतीच्या पायात अचानक काटा घुसला तशी ती कळवळून 'आई गंऽऽ' करीत खाली वाकली. तर, काटेरी झुडुपाच्या एका फांदीनं पावलाला वेढा घातलेला. ते पाहताच ती खालीच बसली. ''अगं मालू काय हे?'' दोन पावले मागे येत मधुने म्हटले तर मालतीचे डोळे भरलेले. त्याने हलकेच तिच्या पावलाभोवतीचे काटे दूर केले तशी मालतीने 'हुश्श' केले आणि नकळत तिच्या चेहऱ्यावर स्मित फुलले. मधूच्या पावलावरच्या हातावर हात दाबत तिने म्हटले, ''तू डॉक्टर व्हायला हवा होतास बघ! काटे किती हळुवारपणे दूर केलेस!''

''हं, मालती डॉक्टर असतो, ना तर... जाऊ दे..'' त्याने वाक्य अर्धवट सोडून म्हटले, ''बोल ना काय केलं असतंस?'' तिने हसत विचारले. ''मालू, तुला वाईट वाटेल... नको. चल उठ, निघू या, मातीत बसल्याने कपडे खराब झाले असणार तुझे'' ''मधू, बोल ना. नाही रागावणार मी. काय करणार होतास डॉक्टर होऊन?'' तिने उठून विचारले. ''अगं, डॉक्टर असतो तर तू आई नक्की झाली असतीस! मी योग्य उपचार केले असते.'' त्याने गंभीरपणे म्हटले. एवढ्यात दोघांचे लक्ष एकाच वेळी एका कोवळ्या आवाजाने डाव्या बाजूस कोपऱ्यात कपड्यात गुंडाळलेल्या बाळाकडे गेले. एका झाडाखाली ते बाळ कापऱ्या आवाजात रडत होते. थंडीमुळे त्याचा आवाज फुटत नव्हता. मालती दुखऱ्या पायाने धावतच बाळाकडे गेली. ती त्या बाळाला उचलून घेणार तोच मधूने म्हटले, ''मालू, उचलून घेऊ नकोस त्याला. उगाच झंझट. पोलिस मागे लागतील आणि सांगून ठेवतो मुलाला सांभाळण्याचा विचार करू नकोस. मी पूर्ण पुरुष आहे. पापातून जन्मलेल्या परक्या पोराचं पितृत्व मला नकोय... मालती, हात लावू नकोस.'' ''पण.. पण किती केविलवाणं दिसतंय रे. आठ-दहा दिवसांचे बाळ दिसतेय हे. भूक लागली असेल रे त्याला. कुणी निर्दयपणे टाकून दिलेय कुणास ठाऊक.'' ''हं चल... चल म्हणतो ना.''

मालती चिडून म्हणाली, ''बाळाकडे बघ, बाळ किती गुबगुबीत आहे. आणि म्हणतोस की...!'' मधूही चिडून म्हणाला, ''बाळ कितीही सुंदर असलं तरी पापातून जन्मलेलंच ना.'' मालती परत रागावून म्हणाली, ''पाप कशावरून? असेल काही मजबुरी!'' ''मजबुरी असली? एवढ्याशा निष्पाप अर्भकाला जन्मास घालतानाच लाज कशी वाटली नाही?'' मधुसूदन चिडून म्हणाला. ''अहो, एवढे चिडायला काय झाले? तुमच्या संमतीशिवाय मला मूल हवे असले, तरी नेता येईल का घरी, नाही ना!'' विचार करून मालू म्हणाली. ''तू काय म्हणालीस? बाळ सुंदर आहे. दिसायलाही गुबगुबीत आहे.

आठ-दहा दिवसाचा असेल असे तूच म्हणालीस ना मला! हा विचार त्यांनी करायला नको होता?'' मालूचा हात हातात घेत समजुतीच्या स्वरात मधू म्हणाला. हातातला हात झिडकारून मालू म्हणाली, ''माझेच चुकले; मी तुम्हाला डॉक्टर समजले. डॉक्टर अशी कधीच जीवघेवी परीक्षा घेत नसतो; डॉक्टर इतरांना जीवदानच देत असतो. तुम्ही कसाई आहात कसाई!' मधुसूदन कळवळून म्हणाला ''मी कसाई नाही की डॉक्टर. डॉक्टर होण्याचे माझे स्वप्न होते. परिस्थितीअभावी तेही नाही जमलं मला-'' मालू म्हणाली, ''माणूस लाथ मारीन तेथून पाणी काढतो, असे तुम्हीच म्हटले आहे. मग तुम्ही धमक का दाखविली नाही? धमक दाखविली असती तर पूर्ण पुरुष आहात हेही सिद्ध....'' ''तुला काय वाटतं, पूर्ण पुरुष नसतो तर इतकी वर्षे आपण सोबतीला राहिलो असतो?'' न चिडता मधुसूदन शांतपणे म्हणाला.

त्याचं शांतपणे बोलणे ऐकून मालती कसंनुसं हसून म्हणाली, ''हे मात्र खरं आहे, पण इतकी वर्षे संसार करूनही आपल्याला एक तरी अपत्य झालंय का?'' ''हो पण, माझ्यात दोष नाही, तुझ्यातपण नाही. आपल्या नशिबातच नसेल मूल. पण आपलं काही बिघडलं का?'' ''बिघडलं? तुमचं म्हणणं खरं असलं, तरी माघारी बोलत नसतील कशावरून? मधुसूदन मला मूल हवंय मूल'' केविलवाणे मालती म्हणाली. 'मला असे पितृत्व नको आहे. त्यापेक्षा मला कोणी बाबा नाही म्हटले तरी चालेल.'' चिडून मधू म्हणाला. ''एवढा त्या निष्पाप जिवाचा तिटकारा? पण का?'' जरासे वाकड्यात शिरून मालती रागाने म्हणाली.

''कदाचित तू म्हणतेस म्हणून बाळाला घरीही नेलेही असते पण...'' मधुसूदन सौम्य शब्दात म्हणाला, ''पण काय? आता तुमचं घोडं अडलं कुठं?'' मालू करारी शब्दात म्हणाली. क्षणभर सांभाळून शांत चित्ताने मधुसूदन म्हणाला, ''उगीच पोलिसांचा ससेमिरा मागे लागेल त्याचे काय?'' ''लागला तर लागू द्या! त्यात काय एवढे?'' बेफिकीरपणे मालती बोलली. विचारपूर्वक मधुसूदन म्हणाला, ''वा गं वा, एकदा पोलिस आपल्याकडे आले की त्यांच्या तावडीतून सुटका लवकर होणे कठीण असते गं.'' परत मुद्यावर येत मालती खंबीरपणे म्हणाली, ''बाळाला घरी न्यायचं का नाही?'' ''नाही म्हणजे नाही.'' मधुसूदन रोखठोक म्हणाला. राहावल्या गेले नाही म्हणून परत पुढे म्हणाला, ''मालू आपण रीतसर दत्तक पुत्र घेऊ. मग तर झालं!'' ''हो पण, या बाळाकडे बघा ना; किती गोड आणि सुंदर आहे.'' डोळ्याच्या ओल्या झालेल्या कडा पुसत मालती म्हणाली. ''मालू... बाळ कितीही सुंदर असले, तरी पापाचे पितृत्व मी कधीच स्वीकारणार नाही.'' मधुसूदन रागाने म्हणाला. जरासा आवाज वाढवून चिडून मालती म्हणाली, ''यापेक्षा दुसरे तुम्ही काहीही करू शकत नाही.'' ''नाही ना, चल तर मग घरी...''

मधुसूदनही मालूवर रागावला. आता सकाळचे ९ वाजले होते. मालतीने बाळाला बघितल्यापासून तिचे मन सैरभैर झाले होते. तिला बाळ घरी नायचे होते. मधुसूदनने तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करूनही तो आपल्या उद्दिष्टात सफल झालेला नव्हता. हळुवारपणे मालतीचा हात हातात घेत म्हणाला, ''आपण काही ६० वर्षांचे झालो नाही. यापूर्वी आपण दोन-तीनदा डॉक्टरकडून तपासणी करून घेतली आहे. आपल्या नशिबात अपत्य योग असेल तर तुझ्याच पोटी बाळाचा जन्म ठरलेला असेल कदाचित...'' ''किती दिवसांपासून हेच ऐकते मी.'' मधुसूदनला पुढे बोलू न देता मालू एका दमात म्हणाली. ''बरं, हा विषय आपण इथेच संपवू या!'' लाडीगोडीने मधुसूदन म्हणाला. आता दोघांनी बाहेरचे कपडे बदलले.

मालती स्नान करायला गेली. मधुसूदनही स्नान करून आला होता. आर्या सोसायटी. गावापासून दूर. त्यात विरळ वस्ती. मालती चूपचापपणे राहिलेले कामे उरकत होती. ''मधुसूदन, तुमचे उरकले की नाही. नाहीतर मलाच म्हणाल की, माझ्याच मुळे तुम्हाला ऑफिसला जायला उशिरा झाला म्हणून.'' ''हे बघ मालू, मी तुझा राग समजू शकतो, परंतु मला पापाचे धनी व्हायचे नव्हते. यापुढे फक्त एकदाच डॉक्टरकडे जाऊ. तपासणीअंती त्यांनी जर म्हटले, तुम्हाला मूल होत नाही, तर चांगल्या अनाथालयातून दत्तक बाळ घेऊ.

तरीही मालू हू की चू न करता आपल्या कामात मग्न होती. मधुसूदन ऑफिसमध्ये गेल्यानंतर मालूला एकदा बाळ बघून यायचे होते, परंतु बिबट्या फिरतो आहे, या बातमीमुळे जाऊ की जाऊ नये, या बातमीचे तथ्य तिच्या लक्षात येताच ती घराबाहेर पडली होती. जाऊन बघते तर थंडीने कुडकुडणारं बाळ तिथे नव्हतंच. तशीच ती बाळाचा विचार करीत माघारी वळली. काही दिवसानंतर परत ते दोघे डॉक्टरकडे गेले. दोघांतही काहीही दोष नसल्याचे सांगून डॉक्टर म्हणाले, ''तुम्ही दोघेही मूल होण्याच्या योग्यतेचे पात्र आहात. कशाला दत्तक घेण्याच्या भानगड पडताहात?'' तपासणी करून यायला दोन-एक महिने झाले होते. मालूला उलट्या-ओकाऱ्या सुरू झाल्या होत्या. मालूला दिवस गेले होते. लवकरच मालू स्वतःच बाळाची आई होणार होती. उत्साह आणि आनंदाने मधुसूदन म्हणाला, ''डॉक्टरचे म्हणणे खरे ठरले. आपल्याच वेलीवर फूल उमलणार आहे.''

**२०२३ पासून ते सप्टेंबर २०२५ या अडीच वर्षांच्या काळात पाच वर्षांखालील एकूण ३४ हजार ३२५ बालकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक आकडेवारी उघडकीस आली आहे तसेच धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यात एप्रिल ते नोव्हेंबर २०२५ या आठ महिन्यात १०७ बालमृत्यू तर मेळघाट येथे जुलै ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान ७७ बालकांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्याने प्रश्न पडतो की, ही कोवळी पानगळ रोखणार कशी?**

समाजभान

**सत्यसाई पी.एम.**

# कोवळी पानगळ रोखण्याचे आव्हान



मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागात लहान बालके कुपोषणामुळे माना टाकत आहेत. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा एक असा आदिवासी प्रदेश आहे, जिथे कुपोषणाचे सर्वाधिक रुग्ण आढळतात. चिखलदरा आणि धारणी या दोन तालुक्यात गेल्या वर्षी १० हजारांवर बालके कुपोषित असल्याचे सरकारी आकडेवारीतूनच उघड झाले होते. कुपोषण कमी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कोट्यवधी रुपये खर्च करीत असतानाही कुपोषणाचे प्रमाण कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंच्या दाहक समस्येवर उच्च न्यायालय २००६ पासून निर्देश देत आले आहे. राज्यांत एकात्मिक बालविकास सेवा योजना आणि आरोग्य तपासणी कार्यक्रम राबविला जात असताना योजनेतील त्रुटींमुळे कुपोषण दूर करण्यात सरकारमार्फत कमतरता दिसल्याने, नुकतेच सुरू असलेले अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार संजय खोडके यांनी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला असता, त्याला महिला व बालविकास विभागाकडून दिलेल्या लेखी उत्तरात राज्यातील कुपोषणाची भयावह स्थिती समोर आली आहे. कुपोषणामागील कारणे चुकीचे बालसंगोपन हे मुलांच्या कुपोषणाचे प्रमुख कारण आहे. लग्नाचे कमी वय, माता आणि मुलांचे आजारपण, दोन मुलांमधील कमी अंतर अशी इतरही अनेक कारणे आहेत. या भागात उपजतच म्हणजे गर्भातच बाळाचा मृत्यू तसेच मातामृत्यूंचे प्रमाणही भयावह आहे. येथे ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य पथके तसेच फिरती पथके यांसह इतरही यंत्रणांमार्फत उपचार आणि उपाय केले जात असताना तसेच अनेक सामाजिक संस्था या भागात याच संवेदनशील विषयावर काम करताना दिसतात. बालकांचे मृत्यू रोखण्यात अपयश का आले आहे, याची कारणे शोधण्याची जबाबदारी सरकारची आहे. काही पाहण्यांमध्ये कुपोषित मुलांसाठी देण्यात येणारे सरकारी योजनांचे फायदे बहुतेकदा संपूर्ण कुटुंबाला मिळत होते. त्यामुळे पोषण कमी होत गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोषण संपूर्ण कुटुंबासाठी दिले गेले पाहिजे आणि योग्य पोषणासह शिक्षणावरही तितकाच भर दिला गेला पाहिजे, असा निष्कर्ष काढण्यात आला होता. अन्नवाटप आणि उत्पन्न वाढविण्यामुळे कमीत कमी दुष्परिणाम होतील, अशीही अटकळ होती; मात्र अशा निष्कर्षाबाबत प्रभावी अंमलबजावणी होते का, हा प्रश्न आहे. मेळघाटातील कालमखार, बैरागड, सादराबादी, धुळघाट रेल्वे, हातरू या भागांतील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ आणि बालरोगतज्ज्ञांची कमतरता, औषधांचा तुटवडा आणि अनेक महिन्यांपासून बंद असलेली फिरती पथके यामुळे आदिवासींना आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागते आहे. मुंबईतही कुपोषित बालक असल्याचे समोर आले आहे. यानुसार मुंबई शहर विभागात २७४ तीव्र कुपोषित तर १३३४ मध्यम कुपोषित अशी एकूण १६०८ बालके आढळली आहेत तर उपनगरांमध्येही ६८२ तीव्र कुपोषित आणि ५६६६ मध्यम अशी एकूण ६३४८ बालके कुपोषित असल्याचे सरकारच्या आकडेवारीतून दिसते. कुपोषण रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. मेळघाट निसर्गसंपन्न असतानाही हा प्रदेश नैसर्गिक साधनांबाबत कुपोषितच आहे. अधिकाऱ्यांची रिक्त पदे कुपोषण तसेच बालमृत्यूंच्या समस्येवर काम करण्यासाठी आवश्यक असलेले बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची अर्ध्याहून अधिक पदे रिक्त आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ५५३ अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून त्यापैकी ३३५ पदे रिक्त आहेत तर मुख्य सेविकांच्या ३८९९ पदांपैकी १३६४ पदे रिक्त आहेत. अंगणवाडी सेविका मदतनीसांच्या १ लाख १० हजार ६६४ पदांपैकी अनुक्रमे १०८३ आणि ४०५९ पदे रिक्त असून आहेत. 'सर्च'चा अहवाल महाराष्ट्रात दरवर्षी १ लाख २० हजारांपेक्षा जास्त बालमृत्यू होतात. त्यामध्ये कुपोषणाने होणाऱ्या नवजात अर्भकांच्या व बालकांच्या मृत्यूचे प्रमाण सर्वांत जास्त असल्याचा डॉ. अभय बंग यांच्या समितीचा धक्कादायक अहवाल डिसेंबर २००४ मध्येच विधानसभेत मांडण्यात आला होता. या अहवालामुळे या सामाजिक समस्येची बाजू उजेडात येऊन याबद्दलची राज्य सरकारची उदासीनता टीकेची लक्ष्य ठरली. डॉ. बंग यांनी गडचिरोली जिल्ह्यात सुरू केलेल्या सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन ॲन्ड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ (सर्च) या संस्थेचे कार्य या भागात १९८८ पासून सुरू होते. पुढे आदिवासी बहुल मेळघाटात काम करताना न्यूमोनिया व हगवण या प्रामुख्याने बालमृत्यूंना कारणीभूत असलेल्या आजारांवर प्रभावी उपाययोजना राबवून बालमृत्यूंचे प्रमाण घटवण्यात 'सर्च'ला यश आले, तरीदेखील हे प्रमाण एका मर्यादेपेक्षा कमी होत नाही. त्यामुळे 'सर्च'ने पुन्हा पाहणी केली आणि पुढील उपाययोजनांचा भाग म्हणून 'आरोग्यदूत' ही अभिनव योजना सुरू केली.

राज्यातील २२६ गावांमध्ये व्यापक पाहणी करून प्रसिद्ध केलेल्या 'कोवळी पानगळ' या अहवालामधून बालमृत्यूंची प्रत्यक्ष आकडेवारी शासकीय आकडेवारींपेक्षा कितीतरी पटींनी अधिक असल्याचा धक्कादायक निष्कर्ष पुढे आला. धुळे, नंदूरबार, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर आदी जिल्ह्यांमधील कुपोषणग्रस्त मुलांच्या समस्येविषयी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखांची दखल घेऊनच, २००४ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने तत्कालीन राज्य सरकारला याबाबतच्या स्थितीची त्वरेने माहिती देण्याचे निर्देश दिले होते; मात्र त्यापूर्वी १० वर्षे आधी सामाजिक कार्यकर्त्या शीला बारसे यांनी मेळघाटातील बालकांच्या चिंताजनक स्थितीबद्दल उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मार्च २०२३ महिन्यात राज्यातील एकूण बालकांपैकी १.९३ टक्के बालके तीव्र कुपोषित आढळले होते, तर जानेवारी २०२६ अखेरीस ही संख्या कमी होऊन ०.३३ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे दिसले तर मध्यम कुपोषित बालकांची टक्केवारीही मार्च २०२३ मध्ये ५.०९ टक्क्यांवरून जानेवारी २०२६ पर्यंत २.२४ टक्के इतके झाल्याचेही स्पष्ट होत आहे. अर्थात, कुपोषण दूर करण्यासाठी सातत्याने मागणी होत असतानाही सरकारकडून होत असलेले प्रयत्न अपुरे पडत असल्याचे यातून स्पष्ट दिसते.

उगवतीचे रंग

**विश्वास देशपांडे**

भ्र. ९४०३७४९९३२

# रातोंके साये घने...



माणसाचं जीवन म्हणजे सुख आणि दु:ख यांचं यांचा मेळ असतो. सुख आणि दु:ख एकेकटं कधी येत नाही. आपण जेव्हा अत्याधिक आनंदात असतो, तेव्हा मनात कुठे तरी धाकधूक असते की हे नक्की खरंय का? हे संपणार तर नाही ना? आणि खरंच कोणतीही परिस्थिती सतत कायम कधीच राहत नाही. सुखाच्या पाठोपाठ दु:खाचा प्रवेश जीवनाच्या रंगमंचावर होतोच. किंबहुना जेव्हा सुख आनंदी कपडे घालून रंगमंचावर प्रवेश करते तेव्हा त्याच्या पाठीमागे विंगेत दु:ख वाट पाहत उभेच असते.

सुख आणि दु:ख दोन्हीही येतात आणि आपल्या जीवनात त्यांची भूमिका बजावून जातात. आपण किती आनंदी राहायचे, किती दु:खी व्हायचे हे ते आपल्यावर सोडून देतात. कन्फ्यूशियस नावाचा एक तत्वज्ञ होता. त्याला एकदा त्याच्या शिष्याने विचारले की सुख आणि दु:ख या दोन्ही परिस्थितीत लक्षात ठेवावी अशी कोणती गोष्ट आहे? तेव्हा कन्फ्यूशियसने उत्तर दिले की, पण एकच गोष्ट लक्षात ठेवायची आणि ती म्हणजे 'हेही दिवस जातील.' आपण सामान्य माणसे! कधी कधी संकटांची मालिकाच आपल्या स्वागताला उभी असते.

एक झाले की दुसरे. अशा वेळी आपला धीर साहजिकच खचतो. आपण निराश होतो. परिस्थितीला दोष देऊ लागतो. माझ्याच वाट्याला ही सगळी संकटे, समस्या का असा प्रश्न विचारू लागतो. काही दुर्बल मनाची माणसे तर आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग निवडतात. पण संकटे कोणाच्या जीवनात आली नाहीत? त्यांच्यापुढे हार न मानता त्यांचा सामना करता आला पाहिजे. अगदी राम, कृष्ण, शिवाजी महाराज यांच्या जीवनाचा जरी अभ्यास केला तरी आपल्याला आढळून येईल की त्यांचे जीवन सुरुवातीपासूनच केवढे संकटांनी भरले होते. पण ही माणसे खचून गेली नाहीत.

ती परिस्थितीच्या डोक्यावर पाय देऊन त्यावर आरूढ झाली. श्रीरामाला राज्याभिषेक होणार होता त्याच्या दुसऱ्याच दिवशी वनवासात जावे लागले. प्राणप्रिय सीतेचे अपहरण झाले. रावणासारख्या महाबलाढ्य शत्रूशी गाठ पडली.

श्रीकृष्णाच्या तर जन्मापासूनच संकटे पाचवीला पुजली होती. जन्म झाला बंदिवासात. नंतर कंसाने त्याला मारण्यासाठी पाठवलेल्या पुतना मावशींसह अनेक राक्षसांशी सामना करावा लागला. शिवाजी महाराजांनी तर शून्यातून स्वराज्याची निर्मिती केली. कधी कधी तहात सारे गमावण्याची वेळ आली पण ते निराश झाले नाहीत.

थोरांची चरित्रे या दृष्टीने अभ्यासली नाहीत तर त्यांनी आपल्याला जी शिकवण दिली आहे, तिच्याकडेच दुर्लक्ष केल्यासारखे होईल. जेव्हा जीवनामध्ये निराशा आपल्याला घेरते तेव्हा आपले आवडते छंद आपल्याला जीवन जगण्याची ऊर्जा देतात. अशी ऊर्जा देणाऱ्या साधनांमध्ये निसर्ग, आपल्याला प्रसन्नता देणारे संगीत, आवडणारी आणि वेगळ्या विश्वात घेऊन जाणारी पुस्तके, जगण्याची ऊर्जा देणारे आपले मित्र यांचे स्थान कोणी घेऊ शकत नाही. या सगळ्या गोष्टी निराशेचा अंधार दूर करून तुमच्या जीवनात आनंदाची पहाट आणण्यासाठी अत्यंत उपयोगी आहेत. आज मला असेच एक सुंदर गाणे आठवते आहे.

निराश परिस्थितीत वाट दाखवणारे, मरगळलेल्या मनाला उभारी देणारे. ते गाणं आहे 'अन्नदाता' या चित्रपटातलं. या गीतात चारच कडवी आहेत पण ज्यांच्या कंठातून प्रत्यक्ष सरस्वती गीताचे बोल होऊन प्रकटते अशा लता मंगेशकरांच्या सुरांनी या गीताला अप्रतिम सामर्थ्य प्रदान केले आहे. कवी योगेश यांच्या गीताला सलील चौधरी यांचं संगीत आहे. जया भादुरीचा पडद्यावरील समर्थ अभिनय पाहण्यासारखा आहे.

गीताची सुरुवात लता मंगेशकरांच्या हळुवार सुरांनी होते. 'रातोंके साये घने...' या शब्दांनी गाण्याची सुरुवात होते. हळूहळू आवाज वरच्या पट्टीत जायला लागतो. एका वेगळ्याच ट्रान्समध्ये हे गाणं आपल्याला घेऊन जातं. आपल्या सगळ्यांना रात्र संपून पहाटेची प्रतीक्षा असते.

रात्र संपून पहाटेची प्रतीक्षा करणे हे जीवनातील आशेचे प्रतीक आहे. संकटे, समस्या म्हणजे जणू आपल्या जीवनातील काळोखी रात्र! गाण्याच्या पहिल्या कडव्यात कवी म्हणतो,

**रातोंके साये घने जब बोझ दिल पे बने,**
**ना तो जले बाती ना हो कोई साथी!**
**फिर भी न डर अगर बुझे दिये,**
**सहर तो हैं तेरे लिये!**

रात्रीच्या काळोखाची भीती मनावर असेल, आजूबाजूला कोणताच दिवा प्रकाशमान दिसत नाही. साथीलाही कोणीच नाही. अशा वेळी हे मना, घाबरू नकोस. लक्षात ठेव की पहाट तुझ्यासाठीच आहे. हा अंधार, ही रात्र संपणार आहे. ('सहर' हा उर्दू शब्द आहे. सहर म्हणजे पहाट.) दुसऱ्या कडव्यात कवी म्हणतो,

**जब भी मुझे कभी कोई जो गम घेरे, लगता हैं होंगे नही सपने ये पुरे मेरे!**

कहता हैं दिल मुझको माना हैं गम तुझको, फिर भी न डर अगर बुझे दिये...

जेव्हा कधी मी खूप संकटात असतो, निराश करणारी परिस्थिती असते तेव्हा असे वाटते की माझे स्वप्न, माझ्या इच्छा पूर्ण होणार नाहीत. पण माझे मन मला सांगते की तुला समस्या आहेत, दु:ख आहे हे मान्य पण तू घाबरू नकोस, निराश होऊ नकोस.

अरे वेड्या पहाट तुझ्यासाठीच आहे. तिसरे कडवे आपल्याला सांगते,

**जब ना खिले चमन मेरा बहारोमे, जब डुबने मैं लगू रातोंके मंझधार में!**
**मायूस मन डोले पर ये गगन बोले, फिर भी न डर अगर बूझे दिये...!**

सगळीकडे वातावरण कसं सुंदर, प्रसन्न आहे पण अशा वातावरणातही माझं जीवन कसं निराश, मरगळलेलं आहे! रात्रीच्या नैराश्येच्या अंधारप्रवाहात मी बुडतो आहे. मन निराश आहे. पण हे समोर दिसणारं आकाश मला सांगतं आहे की घाबरू नकोस, उद्याचा सूर्योदय तुझ्यासाठी आहेच. निराश होण्याची कारण नाही. ही भयंकर रात्र संपणार आहे. शेवटच्या कडव्यात कवी आपल्याला सांगतो, जब जिंदगी किसी तरह बहलती नही, खामोशीयोंसे भरी ये रात ढलती नही

तब मुस्कुराऊं मैं ये गीत गाऊं मैं, फिर भी न डर अगर बुझे दिये... कधी कधी कोणत्याही प्रकारे, कोणत्याही गोष्टीने मनाला बरे वाटत नाही, भयानक शांतता असलेली ही रात्र लवकर संपत नाही, तेव्हा मी हसतो आणि हे सुंदर, आशादायी गीत गातो. कोणतं? तर हेच! रात्र कितीही भयानक असली तरी ती संपणार आहे. सुंदर आशादायी पहाट उज्ज्वल उद्याची आशा घेऊन येणारच आहे.

लता मंगेशकर यांनी हे गाणं इतकं अप्रतिम गायलं आहे की कितीही वेळा ऐकलं तरी मन भरत नाही. अशी ऊर्जा देणारी खूप गाणी आहेत. आणखी काही गाण्यांबद्दल पुढे केव्हा तरी! या गाण्याबद्दल लिहिताना मला कुसुमाग्रजांच्या ओळी आठवतात कशास आई भिजविशी डोळे उजळ तुझे भाळ, रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल.

प्रबंधांची बीजे

**श्रीरंग हिर्लेकर**

# क्वांटम एन्टँगलमेंट - वेदान्त आणि सोयर- सूतक



गीले बनित्स हा न्यूटनचा समकालीन जर्मन गणिती आणि तत्त्वज्ञ. त्याच्या मते विश्व हे यंत्र नसून अर्थपूर्ण सुसंवाद आहे. मोनॅड तत्त्वज्ञान ही त्याची सर्वात महत्त्वाची देणगी. मोनॅड म्हणजे पदार्थाचा अविभाज्य घटक आणि विश्व म्हणजे पदार्थांचा नव्हे तर चेतन एककांचा समूह. शरीर व मन एकमेकांवर थेट परिणाम करत नाहीत तर दोन्हींमध्ये पूर्वनियोजित सुसंवाद आहे. त्यामुळेच जगात एक विशिष्ट क्रम, सुसूत्रता आणि नियम दिसतात. त्याचे प्रसिद्ध विधान म्हणजे ईश्वराने शक्य असलेल्या सर्व शक्यतांमधून एक सर्वोत्तम विश्व निर्माण केले. वरवर अनिष्ट दिसणाऱ्या गोष्टींमध्ये भविष्यातील व्यापक कल्याणच दडलेले असते. त्याच्या मते प्रत्येक मोनॅडमध्ये विश्वाचे प्रतिबिंब आहे. दोन मोनॅडमध्ये प्रत्यक्ष संपर्क दिसत नसला तरी सुसंवाद असतो.

भारतीय तत्त्वज्ञान सांगते की, ब्रह्म हेच एकमेव चैतन्य आहे. जीव हा ब्रह्माचाच अंश. 'जीवो ब्रह्मैव नापर:।' बाह्य व्यवहार म्हणजे माया, पण त्यांचा साक्षी एकच. लेबनित्सने सुसंवाद हे शब्द वापरले तर वेदांनी 'ऋतं च सत्यं' असे सांगितले. एकाने विश्वातील नियमबद्धता सांगितली तर दुसऱ्याने तिला वैश्विक न्याय व्यवस्था असे म्हटले. क्वांटम एन्टँगलमेंट किंवा पूंज गुंतागुत: आधुनिक भौतिकशास्त्र सांगते की, एकाच वेळेस जन्मलेले दोन फोटॉन कण एकमेकांच्या जवळ असोत की दोन ध्रुवांवर दोघे आपण असे दूर असोत, त्यांच्यात दृश्य संबंध नसताही सुसंवाद चालतो. जशी एकाची स्थिती-गती, तशीच दुसऱ्याचीही. जणू सयामी जुळी भावंडेच. पुंजवैज्ञानिक म्हणतात त्यांच्यात कोणतातरी अनुबंध असतो. भौतिक अंतराच्या निरपेक्ष असे हे एकत्व असते. येथे दलाई लामांच्या कथेतील एका यौगिक प्रयोगाचे स्मरण होते. जिवाने शरीराबाहेर पडून स्वत:च स्वत:च्या शरीराचे निरीक्षण करावयाचे किंवा आसमंतात विहार करावयाचा. नाभीशी एका रौप्यसदृश रज्जूला तो जखडला असतो. विश्वात हवे तेथे संचार करून त्याच रज्जू मार्गाने शरीरात पुनर्प्रवेश करतो. ही साधी कथा नसून ध्यान अणि अनुभवाची भाषा आहे. तिबेटी परंपरेत याला सूक्ष्म देहाचा संचार म्हणतात. येथे जीवचैतन्य शरीरापासून वेगळे होते. चेतना बाहेर फिरते, अनुभव घेते आणि त्याच मार्गाने परत येते. श्रीमद् आद्य शंकराचार्यांची कथा अशीच आहे. मंडनमिश्रांच्या पत्नीशी-उभय भारतीशी वेदान्तावर चर्चा चालली असता तिने आचार्यांना निरुत्तर करण्यासाठी कामशास्त्रातील काही प्रश्न विचारले. अनुभवाशिवाय बोलायचे नाही आणि संन्याशाला तर हा विषय वर्ज्य. म्हणून मग ते योगमार्गाने देहाबाहेर पडले. त्याचवेळेस काश्मीरच्या अमरुकराजाचे निधन झाले होते. आचार्यांनी योगसामर्थ्याने त्याच्या मृत शरीरात प्रवेश करून काही दिवस संसाराचा अनुभव घेतला व पूर्वीच्या देहात परत येऊन उभयभारतीच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देणारा 'अमरुशतक' नावाचा ग्रंथ लिहून अर्पण केला. ते परत आले कारण रज्जू मार्ग अबाधित होता. हे रज्जुसूत्र कशाचे बनले असावे? ते स्थूल देहाचेही नव्हते किंवा सूक्ष्म देहाचेही नव्हते. ते होते कारण चैतन्य सूत्र. उपनिषद म्हणते तसे 'येन सर्वमिदं तत्' म्हणजे ज्याने सर्वच काही व्यापले आहे ते होते. म्हणजे लेबनित्सची कल्पना, क्वांटम एन्टँगलमेंट, दलाई लामांचे यौगिक प्रयोग, आचार्यांचा परकाया प्रयोग, अद्वैत तत्त्वज्ञानातील अविद्याजन्य देह संबंध ही सगळी एकाच अनुभूतीची निरनिराळ्या शब्दातील भाष्ये आहेत.

क्वांटम एन्टँगलमेंट हेच सांगते- कण वेगळे झाले तरी संबंध राहतोच. ध्यानपरंपरा म्हणते चेतना शरीराबाहेर गेली तरी संपर्क अखंडीत राहतो. योगप्रयोगातील विश्वसंचारात हा मार्ग फक्त शिथिल होतो. यातून एक प्रश्न उद्भवतो- कोण कोणात राहतो? चैतन्य देहात की देह चैतन्यात? आत कोण आणि बाहेर कोण? आचार्य मूलभूत सिद्धांत सांगतात-आत्मा हा कर्ता नाही, भोक्ता नाही. कर्तृत्व-भोक्तृत्व हे देह-इंद्रिये मन यामुळे दिसते. आता पुढचा प्रश्न- आत्मा जर देहापेक्षा भिन्न तर त्याचे देहाशी जोडलेपण कसे टिकते? उत्तर- अविद्या किंवा अज्ञानामुळे. हेच ते लामांचे किंवा लेबनित्सचे सूत्र.

**आचार्यांच्या कथेचा तत्त्वार्थ-** चैतन्य सर्वत्र आहे. प्रत्येक भौतिक देहाचे व्यावहारिक अहंभाव देहाशी संलग्न राहतात. मी अमुक देह आहे ही भ्रांती म्हणजे तो विशिष्ट रज्जू. मृत्यू आणि पुनर्जन्म म्हणजे अविद्या+वासना+नवीन देह. योगसमाधीत अविद्या नष्ट न होता काही काळ स्थगित होते, वासना शिथिल असते. परकाया प्रवेशात अविद्या कार्यरत असली, तरी नियंत्रणात असते. मोक्ष म्हणजे विद्या पूर्णत: नष्ट. आता रज्जू म्हणजे वासना आणि अविद्येचे सातत्य हा अर्थ स्पष्ट होतो. सारांशाने योगवासिष्ठही असेच सांगते. ते म्हणते 'चित्तमेव संसार:।' त्यामुळे देहातून बाहेर कोण पडते तर ती चित्ताची जाणीव. चित्त जर म्हणत असेल की मी येथेच आहे तर ते येथेच असते, बाहेर आहे असे म्हणेल तर ते बाहेरच आहे. पण तरीही स्मृतिसूत्र टिकूनच राहते. मृत्युवेळेसच ते तुटते. आतापर्यंतच्या विवेचनाचा सारांश: तिबेटी मताप्रमाणे सूक्ष्म चेतनासूत्र, योगशास्त्रानुसार नाडी-प्राणसूत्र.

**आचार्यांचे मत:** अविद्या-वासना, योगवासिष्ठाचे सांगणे: स्मृती-चित्त सातत्य आणि भौतिकशास्त्रातील क्वांटम एन्टँगलमेंट हे सर्व एकच. सुषुप्ती आणि समाधी: मांडूक्योपनिषद सांगते-सुषुप्ती म्हणजे गाढ झोप. अशी गाढ की 'न कंचनं कामं कामयते। न कंचनं स्वप्नं पश्यति।।' कशाचीही इच्छा नाही. ज्ञानेंद्रिये शांत. मन शांत. अहंभाव लुप्त. आजूबाजूच्या जगाचे भान नाही. सुषुप्तीत इंद्रिये व अं:तकरणाला व्यापणारी जाणीव वेगळी होते. सुषुप्तीत अज्ञानामुळे शांत असलेली जाणीव समाधीत ज्ञानामुळे शांत होते. म्हणून कोणतेही स्वप्न नाही. सुषुप्तीतून जागे झाल्यावर आपण म्हणतो की, मी छान झोपलो. हा मी कोण? समाधीत जागृती असतेच, पण निरव शांतता प्रतीत होते. सुषुप्तीत रज्जू तात्पुरती शिथिल होते, पण मी अमुक आहे ही ओळखच पूर्ण तुटत नाही म्हणूनच कधीतरी झोपेतून जाग येते, जागाच असलेला साधक समाधीतून परत येतो. देह जीर्ण झाला की मृत्यू होतो. रज्जू तुटते. मी अमूक आहे ही शेवटची पकड सुटते. मन, प्राण, वासनांचा स्थूल देहाशी संबंध संपतो. म्हणून सुषुप्तीतून, समाधीतून परत येता येते तसे मृत्यूनंतर नाही.

**योगवासिष्ठ सांगते-** 'यत्र स्मृति: तत्र देह:' तेव्हा स्मृती हीच रज्जू. उपनिषदांचे हेच उत्तर. रज्जू-क्वांटम गुंतागुंत आणि सोयर-सुतक जवळच्या नातेसंबंधात जन्म अथवा मृत्यू झाल्यास संबंधित नातेवाईक त्यांच्या नातेसंबंधाच्या अंतराच्या हिशेबाने काही काळ सोयर- सूतक पाळतात. १ ते ७ पिढ्यांप्रमाणे सपिंड, ७ ते १४ मध्ये समानोदक, १५ ते २१ मध्ये सगोत्र, पुढे ४२ पिढ्यांपर्यंत सगोत्र पण दशा तुटणे याप्रमाणे ही शृंखला क्षीण होत जाते.

प्रत्येक जातिधर्म परंपरेप्रमाणे हा काळ कमी- जास्त असतो. फार काय पण माणसांप्रमाणेच प्राणीही हे पाळतात. यावर थोर अरण्यऋषी मारुती चितमपल्लींच्या लेखनात अधूनमधून काही अनुभव वाचायला मिळतात. हा विषय भावना, अंधश्रद्धा किंवा परंपरेचा नसून रज्जू-क्वांटम गुंतागुंतीशी संबंधित आहे. सामान्य लोक याचा संबंध अपवित्रता, हायजीन सोवळे-ओवळे याच्याशी जोडतात. काही जण तर आमचे त्यांचे नाते असले तरी ते दूर राहतात, आमचेत्यांच्याशी पटत नाही वगैरे कारणे सांगतात. पण सोयर-सूतक कल्पनेचा आधारच निराळा आहे. भौतिक आणि वैचारिक अंतर कितीही असले, तरी ही अदृश्य रज्जू अबाधित असते. अंतराच्या व्यस्ततेच्या वर्गाप्रमाणे गुरुत्वाकर्षण क्षीण झाले तरी ० होत नाही तसे दिवस कमी-जास्त होतात.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, २२ मार्च ते शनिवार, २८ मार्च २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, २२ मार्च-** विनायक चतुर्थी, गणपतीला दवणा वाहणे, भारतीय चैत्र मासारंभ व शके १९४८ प्रारंभ, हनुमान यात्रा डोंगरवाडी (ता. वाळवा) जागतिक जल दिन * **सोमवार, २३ मार्च-** कल्पादि, श्री विष्णू दोलोत्सव, हयव्रत, श्री पंचमी, लक्ष्मी पंचमी, श्री ज्योतिर्लिंग षष्ठी यात्रा जोतिबा डोंगर कोल्हापूर, क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरू व सुखदेव शहीद दिन, हवामान दिन * **मंगळवार, २४ मार्च-** जागतिक क्षयरोग दिन, नाईकबा यात्रा बनपुरी (ता. पाटण) व शिगाव (ता. वाळवा), कार्तिक स्वामींना दवणा वाहणे * **बुधवार, २५ मार्च-** सूर्याला दवणा वाहणे, आयंबील ओळी प्रारंभ (जैन), श्री एकवीरादेवी पालखी लोणावळा (जि.पुणे), बिरदेव यात्रा आरेवाडी (ता. कवठेमहांकाळ), ज्योतिर्लिंग यात्रा कांदे (ता. शिराळा) * **गुरुवार, २६ मार्च-** श्रीरामनवमी, दुर्गाष्टमी, भवानीदेवीची उत्पत्ती, देवी नवरात्र समाप्ती, बंजारा उत्सव प्रारंभ पोहरागड, ध्वज बांधणे सोहळा शिखर शिंगणापूर, शिवलेज दिन, श्री बाळूमामा उत्सव आदमापूर, श्री रामदास स्वामी जयंती, साईबाबा उत्सव शिर्डी, हनुमान यात्रा सावर्डे * **शुक्रवार, २७ मार्च-** जागतिक रंगभूमी दिन, श्री स्वामी नारायण जयंती, श्री सिध्दारूढ स्वामी जयंती, चैत्री नवरात्र समाप्ती, देवीला दवणा वाहणे, कान्होबा यात्रा कणेगाव (ता. वाळवा) * **शनिवार, २८ मार्च-** खंडोबा लंगर यात्रा, मंगसुळी, मैखनाथ यात्रा गिरीम, खंडोबा यात्रा सिंगनहळ्ळी (ता. जत)

**मुहूर्तः-** * **साखरपुडा-** २४ मार्च * **डोहाळ जेवण-** २५ मार्च (१४ पर्यंत), २६ मार्च (१६ पर्यंत), २७ मार्च * **बारसे-** २४ मार्च (१६ नंतर), २५ मार्च (१४ पर्यंत), २७ मार्च (१० नंतर) ***जावळ-** २५ मार्च (१४ पर्यंत), २७ मार्च * **गृहप्रवेश-** २५ मार्च (१४ पर्यंत), २६ मार्च

### मेष :- नव्या संधी लाभतील

वेळेजवळ इतका वेळ नाही की, तो आपल्याला दुसर्यांदा वेळ देऊ शकेल. राशी स्वामी मंगळ लाभात आहे. त्यामुळे महत्त्वाचे व्यवहार या आठवड्यात करावेत. कौटुंबातील जीवनात सौख्याच्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. व्यवसायात नव्या संधी लाभतील. लाभ घ्यावा. शुभ ता. २४, २६

### वृषभः- अडचणी सुटत जातील

जे कसलीच अपेक्षा करत नाहीत, ते खरे भाग्यवान. कारण त्यांच्यावर निराश होण्याची वेळ येत नाही. धनस्थ गुरु आर्थिक बाबतीत शुभ फलदायी आहे. हौस मजेसाठी खर्च कराल. नव्या कामांना गती मिळेल. व्यवसायिक निर्णय विचाराने घ्यावेत. सरकारी कामे विलंबाने पण मार्गी लागतील. अडचणी सुटत जातील. शुभ ता. २६,२७

### मिथुनः- बिनधास्त वाटचाल करावी

कोण, काय, का, कसे करत आहे. यापासून दूर राहिला तर आनंदी रहाल. मंगळाचे भाग्य व चर्मस्थानावरून होणारे भ्रमण लाभदायक ठरेल. नव्या कामांना गती मिळेल. अडचणीतून वेळीच मार्ग निघेल. चिंता नको. नव्या संधीचे स्वागत करावे. गुरुकृपेने सर्व काही मनासारखे घडत जाईल. सौख्यदायी घटना घडतील. बिनधास्त होऊन वाटचाल करावी. शुभ ता. २४,२८

### कर्कः- कलागुणांचा गौरव

जेवढं मिळतंय त्यातच आनंदी रहावे, कारण आपणास जे मिळतंय ते अनेकांसाठी स्वप्न आहे. अष्टमात मंगळ, राहू, बुधासह आहे. त्यामुळे तीव्र उन्हाळ्यात प्रकृतीची मुख्यतः काळजी घ्यावी. मनात आले की, लगेच केले असे काही करू नका. विचारपूर्वक पावले उचलावीत. म्हणजे माघार घेण्याची वेळ येणार नाही. कलागुणांचा गौरव होईल. शुभ ता. २६,२७

### सिंहः- अडचणींची चिंता नको

आल्या क्षणाचा घ्यावा, आनंद कारण आजचा आनंद आज, उद्या कधी येत नाही. कौटुंबिक जीवनात, भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. शारीरिक तक्रारी राहणार आहेत. काळजी घ्यावी. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. अडचणीची चिंता नको. मार्ग निघत जाईल. शुभ ता. २४,२८

### कन्याः- काळजी घ्यावी

आळसाला आजचा दिवस दिला की, तो उद्याचा दिवसही चोरतोच. पुढे रविवार, शनिवार मंगळ येणार आहे. कौटुंबिक जीवनातील प्रश्न विकोपाला जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. कार्यक्षेत्रात चांगली वाटचाल करू शकाल. प्रगतीच्या घटना घडतील. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. शुभ ता. २६,२७

### तुलाः- दगदग वाढेल

आयुष्यात सुख विकणारा व दुःख विकत घेणारा कधीच भेटत नाही. राशी समोरच शुक्र येत असल्याने सौख्याच्या घटना घडतील. रवि, शनिवर मंगळ येत असल्याने प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. दगदग वाढणार आहे. अडचणीतून विलंबाने पण मार्ग निघत जाईल. हितशत्रूंच्या कारवाया हाणून पाडाल. सुसंधी लाभतील. शुभ ता. २४,२६

### वृश्चिकः- सुसंधी लाभतील

काळजी घेत जावी स्वतःची, कारण तुमच्याकडे माझ्यासारखे खूप असतील, पण माझ्याकडे तुमच्यासारखे कोणीच नाही. सुखस्थ मंगळ, राहू सध्या प्रतिकूल आहेत. त्यामुळे विचारपूर्वक रहावे. नव्या योजना लगेच अमलात आणू नका. प्रशासन, यांत्रीक क्षेत्रात सुसंधी लाभतील. वादविवादाचे प्रसंग टाळावेत. विचाराने रहावे. शुभ ता. २६,२७

### धनुः- दगदग टाळावी

लोकांचे सल्ले घ्या, कारण ते फुकटच असतात. निर्णय मात्र स्वतः घ्या. कारण ते अमूल्य असतात. चौथ्या रवि, शरीवर मंगळ ही येत आहे. त्यामुळे आपले सुख स्वास्थ्य हरविणार नाही, याची काळजी घ्यावी. विनाकारण धावपळ करावी लागेल. गुरुकृपेने समस्यातून मार्ग निघत जाईल. नवे विचार विचारपूर्वक स्वीकारावेत. दगदग टाळावी. शुभ ता. २७,२८

### मकरः- मार्ग निघत जाईल

झिजलेले खांदे हे बोलणाऱ्या ओठांपेक्षा श्रेष्ठ असतात. धनस्थ मंगळ, राहू वरून पुढील आठवड्यात मुक्काम हलविणार आहे. त्यामुळे निर्माण झालेली आर्थिक कोंडी आता सुटत जाणार आहे. सुखस्थ शुक्रामुळे सौखेच्या घटना घडतील. कार्यक्षेत्रात चांगली वाटचाल करू शकाल. अनावश्यक खर्च टाळावेत. मार्ग निघत जाईल. शुभ ता. २७,२८

### कुंभः- काळजी घ्या

बाजारात भाजी आपण दहा वेळा पारखून घेतो कारण कष्टाच्या पैशाची आपल्याला किंमत असते. राशीतील मंगळ धनस्थ रवि शनिवर येणार आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत बेफिकीर राहू नका. उष्णतेपासून त्रास संभवतो. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. नवे प्रश्न निर्माण होणार नाहीत, याची काळजी घ्या. शुभ ता. २६,२७

### मीनः- स्वास्थ्य टिकवावे

जी माणसं कठीण काळात खोटी ठरतात, त्यांना आयुष्यात पुन्हा स्थान देऊ नये. राशीतील शनि, रविवर मंगळ ही येणार आहे. त्यामुळे आपले स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता आहे. धनस्थ शुक्रामुळे गृहसजावट, खाद्यपदार्थ अशा व्यवसायात प्रगतीच्या घटना घडतील. या सप्ताहात आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. शुभ ता. २४,२७

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## सीरियातला नवा उद्योग: 'डार्क'

खुद्द लंडन शहरात 'सेलफ्रिजेस' नावाचे असेच एक डिपार्टमेंटल स्टोअर्स फार प्रसिद्ध होते, आजही आहे. 'व्हाईटअवे लेडलॉ'ला मुंबईकर साहेबलोक 'पूर्वेकडचे सेलफ्रिजेस' म्हणत असत. तर, हा 'व्हाईटअवे लेडलॉ'वाला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एका सुप्रभाती एकाएकी पळून गेला. तो असा का पळाला, याबद्दल तत्कालीन मुंबई सरकारच्या सचिवालयात एक किस्सा फार चवीने सांगितला जात असे. इंग्रजांच्या काळापासून मुंबई इलाख्याचा इंग्रज गव्हर्नर आणि मग मुंबईचा राज्यपाल हे वाळकेश्वरच्या 'गव्हर्नर हाऊस' किंवा राजभवनात रहात असतात. आता या राजभवनाचे लोकभवन झाले असून, महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल तिथे राहतात.

पान २ वरून

## अंत्येष्टी

मानवी जीवनातला शेवटचा संस्कार म्हणून त्याला 'अंत्येष्टी' म्हणतात. 'इष्टि' म्हणजे प्रत्येक प्रतिपदेला नित्य होमानंतर करण्यात येणारा होम किंवा यज्ञ. सनातनी व्यक्तीच्या आयुष्यातील अखेरचा यज्ञ याअर्थी अंत्य+इष्टि हा शब्द योजण्यात आलेला आहे. यज्ञकेंद्रित जीवनशैलीत प्रतिदिन होम करणं अपेक्षित आहे. त्यानंतर दर पौर्णिमा आणि अमावास्येला इष्टि करायची असते. अशा व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या प्रेताची समिधा अग्निदेवतेला अर्पण करणं म्हणजे अंत्येष्टी! या अग्निदेवाचं नाव आहे क्रव्यवाहन म्हणजे प्रेत (क्रव्य) वाहून नेणारा किंवा क्रव्याद. गर्भाधानाला 'मारुत', पुंसावनाला 'शोभन', सीमंतोन्नयनाला 'मंगल', जातकर्माला 'प्रबल', नामकरणाला 'पार्थिव', अन्नप्राशनाला 'वैशुचि', चुडाकर्माला 'सभ्य', व्रतबंधाला 'समुद्भव', समावर्तनाला 'सूर्य', विवाहाला 'योजक', स्वयंपाकघरात 'आवसथ्य' आणि अंत्येष्टीला 'क्रव्याद' अशा अग्नींना आवाहन करण्यात येतं.

पान ५ वरून

## क्वांटम एन्टँगलमेंट - वेदान्त...

औपनिषदिक दृष्टी अथवा क्वांटम एन्टँगलमेंट यांच्या दृष्टीने विचार केल्यास कुटुंबातील नूतन जन्मामुळे नातेसंबंधातील रज्जूवर आलेला अधिकचा ताण किंवा मृत्यूमुळे आलेले शैथिल्य याप्रमाणे सोयर-सूतक कल्पनेची कारणमीमांसा करता येईल. किंबहुना तेच अधिक सयुक्तिक असेल. जन्ममृत्यूमुळे नातेसंबंधातीत या रज्जूवर निर्माण झालेली आंदोलने स्थिर होण्यास दोघांतील अंतराप्रमाणे जो काळ आवश्यक, त्यानुसार सोयर-सूतकाचा कालावधी ठरतो. संन्याशाला किंवा संन्याशाचे सुतक नसते. कारण देहाने संन्याशी यातच असला तरी त्याने संन्यास घेण्यापूर्वी स्वत:चेही श्राद्ध करून देहाची ओळख तोडलेली असते. तो जन्म-मृत्यू या जीवनरज्जूच्या गाठीतून बाहेर पडलेला असतो. या घटना त्याच्या चैतन्यावर आंदोलने निर्माण करत नाहीत. सोयर अलिप्त भावामुळे सुतकाच्या जाळ्यात तो एन्टँगल होत नाही. तो प्रवचने ऐकत नाही तर जगतो. 'नायमात्मा प्रवचेन लभ्य:' हे वचन त्याने मनात बिंबवून घेतले असते. तो शोक पाहतो पण भोगत नाही. तो हर्षमर्षाच्या तरंगाचा भाग न होता जीवनप्रवाहाच्या किनाऱ्यावरून प्रवाह अवलोकन करतो. हंस पाण्यातही कोरडाच राहतो म्हणून तर संन्याशाला हंसपरमहंस असे म्हणतात.

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# दुर्गदुर्गेश्वर

किल्ले रायगड, हिंदवी स्वराज्याची अभेद्य राजधानी, सह्याद्रीच्या डोंगररांगेतील अत्यंत देखणा आणि अद्वितीय दुर्ग आहे. मराठी रयतेच्या सर्वोच्च आनंदाचा क्षण, शिवराज्याभिषेक सोहळा रायगडाने भरभरून अनुभवला. अशी ही रायगडाची भूमी हिंदुस्थानातील प्रत्येकाचे तीर्थक्षेत्र आहे. शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण म्हणजे किल्ले रायगड! शिवाजी महाराजांमुळे दुर्लक्षित रायरीच्या डोंगराचा रायगड साकारला गेला आणि हिंदवी स्वराजाची राजधानी म्हणून 'दुर्गदुर्गेश्वर रायगड' झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळीतील सर्व किल्ले चंद्रराव मोरेंकडून जिंकले; रायरीचा डोंगरही स्वराज्यात सामील झाला. स्वराज्याच्या सीमा विस्तारत होत्या.

राजगड आता स्वराज्याची राजधानी म्हणून सुरक्षित नव्हता. महाराजांनी रायरीच्या डोंगराचे चारही बाजूचे तासीव उंच कडे पाहिले. त्यांना सुरक्षेची खात्री वाटली. रायरीच्या डोंगरावर बांधकाम करण्याचे ठरले. हिरोजी इंदुलकरांच्या कुशल मार्गदर्शनात रायरीचा रायगड साकार होऊ लागला. गडाची सुरक्षा अधिक करण्यासाठी तटबंदीची बांधणी सुरू झाली. भव्य दरवाजे बांधले गेले, चोरदरवाजाचे नियोजन झाले. गडावर वाडे, विहिरी, तलाव, देवालये, बाजारपेठ असे नीटनेटके बांधकाम सुरू झाले. रायगड जसजसा आकार घेत होता तसतसे महाराज मनोमन सुखावत होते. रायगड त्यावेळी सर्वार्थाने राजधानीस योग्य होता. रायगड जिल्ह्यात महाडच्या उत्तरेस साधारण २५ कि.मी. वर किल्ले रायगड वसवलेला आहे. समुद्रसपाटीपासून साधारण ८५० मीटर उंच रायगडावर जाण्यासाठी महाडवरून रायगडवाडीकडे निघावे. प्रथम पाचाड येथे राजमाता जिजाऊचे दर्शन घ्यावे. गडपायथा गाठल्यावर पायऱ्या चढत दोन- अडीच तासात रायगडाचा माथा गाठता येतो.

१२ व्या शतकाच्या सुमारास रायरी हे मराठे पाळेगारांचे निवासस्थान होते. बहमनी सत्तेनंतर रायरी निजामाच्या ताब्यात गेला. त्यावेळी आदिलशाहीचा सरदार हैबतखान याने रायरीवर आक्रमण करून रायरी आदिलशहाने जिंकला. पुढे आदिलशाहीचे सरदार मोरेंच्या ताब्यात रायरी असताना जावळीच्या मोहिमेत महाराजांनी जिंकला. १६७४ मध्ये राज्याभिषेक झाल्यापासून १६८९ पर्यंत रायगड स्वराज्यात होता. पुढे किल्ला पेशव्यांच्या ताब्यात होता. रायगड श्रीगोंदे टोक, भवानी टोक, हिरकणी टोक आणि टकमक टोक अशा चार भागात विभागला आहे. रायगडच्या महादरवाज्यातून प्रवेश झाला की, समोरच हत्ती तलाव दिसतो. गडावर जिल्हा परिषदेची निवासस्थाने, पर्यटन महामंडळाचे विश्रामगृह आहे. ते पाहून हिरकणी टोकाकडे निघावे. तेथे हनुमानाचे शिल्प आहे. त्यानंतर गंगासागर तलाव, राणीमहाल, राजवाडा, सदर आणि नगारखाना पाहून झाले की, होळीचा माळ तसेच बाजारपेठ पाहत टकमक टोकाकडे जावे. गडावर श्री जगदीश्वराचे मंदिर आहे, मंदिराच्या गाभाऱ्यात शिवपिंड अन् मंडपात मारुतीची मूर्ती आहे. जगदीश्वर मंदिराच्या नगारखान्यावर दोन शिलालेख आहेत. महाराजांनी गडावर केलेल्या बांधकामाची माहिती यात कोरलेली आहे. गडावर छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी आहे, दर्शन घेऊन भवानी टोक तसेच थोडं पुढे गेलात की वाघदरा आणि खालचा वाघदरवाजा पाहून घ्यावा. गड आरामात फिरून, गड उतरताना चीत दरवाज्यापर्यंत उतरून समोरच्या टेकडीवर चढून वाघबीळ नक्की पाहावे. खडकातील आरपार भोकातून पाचाडचा वाडा आणि जिजामातेचे वृंदावन स्पष्ट दिसते. भवानी टोक, श्रीगोंदे टोक, हिरकणी बुरुज, टकमक टोक, महादरवाजा, नाना दरवाजा, वाघ दरवाजा, मेणा दरवाजा, पालखी दरवाजा आणि मुख्यतः चोर दरवाजा पाहून झाला की गंगासागर तलाव, कुशावर्त तलाव तसेच पाण्याची टाकी पाहून गडावरील जलव्यवस्थापन पाहावे. मेघडंबरी, सिंहासनाची जागा, शिवस्मारक, शिवाजी महाराजांचा होळीच्या माळावरील सिंहासनाधीश्वश्वर पुतळा सुस्थितीत आहे. किल्ल्यावरील नगारखाना, मंदिरे, बुरूज आणि तटबंदी, मनोरे असे काही बांधकाम वगळता बहुतेक बांधकाम नष्ट झाले आहे. बालेकिल्ल्याच्या आत राणीवसा आणि काही खोल्यांचे अवशेष आढळतात. हिंदवी स्वराज्याचे सुवर्णसिंहासन शिवरायांच्या जन्मापासून आकार घेत होते. रायगडावर फक्त त्याचे मूर्त रूप साकार झाले. येथेच ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीला महाराजांची मौंज झाली. पवित्र गायत्रीमंत्राची दीक्षा घेऊन महाराजांनी यज्ञोपवीत धारण केले. मौंजेउपरांत महाराजांचे सोयराबाई आणि इतर राण्यांसोबत पुन्हा विवाह करण्यात आला. रायगडावरच महाराजांची सुवर्णतुला झाली. येथेच राज्याभिषेक सोहळ्यासाठी भव्य शामियाना सजला. ज्येष्ठ शु. १३ आनंद नाम संवत्सरे, शके १५९६ हा मंगल दिवशी शिवराज्याभिषेक सोहळा झाला. रायगडावर जाऊन शिवराज्यभिषेक सोहळा आठवावा, जिजाऊ किती डोळे भरून हा सोहळा पाहत असतील, याची कल्पना करावी.

सुवर्ण चौरंगावर सप्तनद्यांच्या जलाने जेव्हा शिवरायांचा महाभिषेक करण्यात आला, त्यावेळी मंत्रोच्चाराचा मंगल ध्वनी आसमंतात निनादला असेल. भरजरी पोशाख, अंगावर शेला घेऊन, उजव्या हातात श्री विष्णूंची मूर्ती घेतलेले राजे रायगडाच्या भूमीवर चालत, सिंहासनाकडे निघाले तेव्हा रायगडाची भूमी हर्षित झाली असेल. राज्याभिषेकाच्या दिवशी पहाटेच्या सौम्य प्रकाशात दिवट्या आणि मशालींच्या सुवर्णप्रकाशात उजळलेला रायगड किती सुंदर दिसत असेल. भगवे झेंडे, पताका, गुढ्या, तोरणे, रांगोळ्या यांनी रायगड नखशिखांत सजला ते किती देखणे दृश्य असेल. शिवराय सिंहासनावर विराजमान झाल्यावर 'क्षत्रिय कुलावतंस, सिंहासनाधिश्वर महाराजाधिराज श्री शिवछत्रपती की जय' अशी घोषणा राजसभेत होताच रायगडाचा देह नक्कीच रोमांचित झाला असेल. जिजाऊंच्या डोळ्यातील आनंदाश्रूंनी रायगडाची भूमी आनंदली असेल आणि तिनेही लाडक्या शिवबाला आशीर्वाद दिला असेल- 'औक्षवंत व्हा, कीर्तिवंत व्हा, यशस्वी व्हा, रामराज्य करा, धर्मराज्य करा.' शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होणे ही साधारण घटना नव्हती, ही मंगल घटना रायगडाने अनुभवली आहे, आपणही रायगड फिरताना वरील सगळे प्रसंग आठवून फिरावे. रायगडाने शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग अनुभवले म्हणून त्याचे स्थान मानाचे आहे. शिवाय रायगडाच्या भूमीतच जाणत्या राजाने चिरविश्रांती घेतली म्हणून या भूमीला देवभूमी म्हणून मान्यता मिळाली. शिवशाहीचा हा मानबिंदू आता महाराष्ट्राचे प्रमुख पर्यटनस्थळ झाले आहे, सर्वांना गड चढणे शक्य नसते म्हणून गडावर रोपवेची सोय केली आहे. वर्षभर या लेखमालेत आपण अनेक दुर्ग फिरलो. एकट्या महाराष्ट्रात साडेतीनशेहून जास्त किल्ले आहेत, संधी मिळाली तर पुढेही नक्की फिरूया. मात्र, एक विनंती की, कुठल्याही किल्ल्यावर पाऊल ठेवताना ही आपली अभिमानस्थळे आहेत, हे कायम लक्षात ठेवावे. शिवराय हे दुर्गपती होते. त्यांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात त्यांचे आयुष्य गेले आणि राजधानी रायगडावर आपला जाणता राजा नांदला आणि विसावला. त्यामुळे रायगडाची भूमी हे महाराष्ट्राचे तीर्थक्षेत्र आहे म्हणून घाणेकर म्हणतात, 'शिवप्रेमी तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा, रायगड तो सजवावा, नटवावा, सर्वांसी दाखवावा भूमंडळी!'



पान ४ वरून

## नीतीवंत, पुण्यवंत, वरदवंत

मग ती घटना पाच-दहा मिनिटांपूर्वी घडलेली का असेना आणि हेच त्यांच्या थक्क करणाऱ्या निर्णय क्षमतेचं रहस्य आहे. सरकारमध्ये प्रत्येक निर्णय हा कागदावर, फाईलवरच शिक्कामोर्तब होतो.

हे काम चालू असतांना कधीही ते नंतर बघू किंवा चर्चा करा असे ते म्हणत नाहीत. तासाभराच्या अवधीत शेकड्याहून अधिक गुंतागुंतीच्या विषयांवर अचूक निर्णय ते घेवू शकतात कारण, तो विषय विविध मार्गांनी त्यांना अगोदरच माहीत झालेला असतो.

सकाळी ९ ते रात्री ३ ह्या त्यांच्या दिवसात अनेक बैठका, विविध व्यक्तींशी प्रत्यक्ष भेटी, फोन, एसएमएस अशा माध्यमांतून ही माहिती गोळा होते. रोज त्यांना हजार तरी एसएमएस नक्कीच येत असावेत आणि कितीही छोटा माणूस असो, प्रत्येकाला उत्तर जातंच. बहुदा ते रात्री २ किंवा ३ वाजता जातं. मग तो माणूस किती सुखावत असेल. खुद्द मुख्यमंत्री माझ्या कामाची तत्परतेने दखल घेत आहेत. हे Perbetion फार मोलाचं असतं.

उत्तरदायी सरकार म्हणजे ह्याहून अधिक काय? अर्थातच नंतर आमच्या यंत्रणेकडून त्या कामाचा तडफेने पाठपुरावा होतो. माणूस लहान-मोठा, गरीब- श्रीमंत, प्रांत- जात- भाषा- धर्म असा कसलाच भेदभाव सरांच्या विचार विश्वात नसतो. 'हा आपला तो तुपला' अशी कसलीच जाणीव नसते, फक्त तो माणूस सच्चा हवा.! स्वामी विवेकानंदांबद्दल सांगतात की, एखाद्या जाडजूड ग्रंथाची पाने उलटून ते पंधरा वीस मिनिटांत ग्रंथ पालथा घालायचे. एकदा कुणी तरी शंका उपस्थित केली की, असा कसा वाचून संपला लगेच? तेव्हा ते शंकेखोराला म्हणाले, विचार, जे विचारायचंय ते! आणि जे विचारलं ते त्यांनी शब्दश: उद्धृत करुन दाखवलं. तसंच सर जेव्हा एखादा कागदांचा गठ्ठा पाहतात तेव्हा अगदी कॅज्युअल पध्दतीने. मलाही प्रश्न पडतो की, नेमकं काय वाचलं त्यांनी? कधी वाटते की, पुन्हा एकदा सविस्तर सांगावं कां? पण त्या संबंधीचा मंत्री/आमदार इत्यादि नंतर येऊन सांगतो की, साहेबांना खडान् खडा माहीत होतं ते प्रकरण आणि व्यवस्थित समजावून दिलं मला. त्यांचं माहिती घेणं, ती साठवणं, फोलपटं फेकून देणं, मौलिक माहितीवर प्रक्रिया करणं आणि नंतर त्या माहितीचा सामर्थ्यशाली वापर करणं, हे कसब एखाद्या सुपर कॉम्प्युटरला लाजवेल असं आहे.

'वक्ता दशसहस्त्रेशु' हे वचन देवेंद्र फडणवीस यांनी साफ खोटं ठरवलं. कारण ते दहा हजारांत नव्हे तर दहा कोटींत एक असे वक्ते आहेत. सचिन तेंडुलकरला पाहावं तर लीलया शतक झळकावताना, अमिताभ बच्चनला पाहावं तर अँग्री यंग मॅन म्हणून, तसं सरांना पाहावं तर भाषण करताना. भाषणाचा विषय, प्रभावी मुद्दे, भरगच्च तपशील, विरोधकांना गुगल्या, त्यांच्या फुलटॉसवर निर्दय षटकार, कधीकधी मजेत टोप्या उडवणे अशा असंख्य पैलूंसकट सरांनी वक्तृत्व ही कला न ठेवता तिला शास्त्र, विद्या, कसब, कला हयांच्या एका वेगळयाच पातळीवर नेऊन ठेवलं आहे.

एखाद्या कसबी कारागिराने भरजरी पोताची पैठणी विणावी तसे सरांचे भाषण विणले जाते. कधी मंद, शांत सूर तर क्षणार्धात घणाघाती आक्रमक सूर पकडत, सर आपल्या भाषणात विषयाची पूर्ण उकल करतात. विधी मंडळातील भाषण असेल तर, अगोदर उपस्थित झालेल्या मुद्यांचा एक एक करत परामर्श घेऊन नंतर असा काही भन्नाट चकवा मुद्दा मांडतात की, समोरचे दिग्मूढ होऊन जातात. प्रभावी बोलण्यामुळे हा माणूस आम्हाला काहीही पटवून देऊ शकतो आणि काही प्रतिवादही करता येत नाही, असा हतबल भाव समोरच्यांच्या चेहऱ्यावर हमखास असतो.

मराठी नेत्यांना कायम त्रस्त करत आलेली समस्या म्हणजे, मराठी व्यतिरिक्त हिंदी, इंग्रजी या भाषांत बोलता न येणे. ह्या एका कारणामुळे अनेक कर्तबगार मराठी नेते दिल्लीत किंवा राष्ट्रीय स्तरावर छाप पाडू शकले नाहीत, असे काही जाणकारांचे मत आहे. सरांचे मात्र मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांवर कमालीचे प्रभुत्व आहे. अटलजींच्या हिंदीशी बरोबरी करु शकेल अशा त्यांच्या वक्तृत्वामागे, ते नागपूरचे आहेत ह्याचा वाटा आहेच पण त्यांनी ते परिश्रमपूर्वक कमावलेले आहे हेही तितकंच खरं.

कॉलेज जीवनात ते एक पट्टीचे वाद-विवादपटू होते. देशभरातल्या अनेक आंदोलनांमध्ये त्यांनी भाग घेतलेला आहे आणि हया सहभागामुळे त्यांचे वाक्पटुत्व कसदार बनले आहे. अमेरिकेत गुगल, फेसबुकच्या सीईओंशी ज्या सहजपणे आज ते इंग्रजी बोलतात त्याच सहजपणे, ते विदर्भातल्या छोटया कास्तकाराशी खास वर्हाडी शैलीत बोलू शकतात. ऐन मंत्रीमंडळ बैठकीतही, मी तुम्हाला पुन्हा असं सांगून राहिलो की, असं म्हणून ते आपलं वैदर्भीय असणं छान मिरवतात. देहबोली, भाषा, स्वभावाचा पुरेपूर वापर करणारे समर्थ संवाद-नैपुण्य हा त्यांच्या यशामागचा महत्वाचा आधारस्तंभ आहे. सत्तावन्न वर्षांच्या महाराष्ट्राचे नेतृत्व बव्हंशी ग्रामीण महाराष्ट्रातून उभारले. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, सहकार, शेती ह्यात मुरलेले असे हे नेतृत्व होते. त्यामुळे एका बाजूला हे विषय, आणि दुसर्या बाजूला माहिती तंत्रज्ञान, नागरीकरण, मेट्रो, सोशल मिडिया हे एकविसाव्या शतकातले विषय ही दरी कायमच राहिली. कृषी, सिंचन, सहकार हे ग्रामीण महाराष्ट्राशी संलग्न विषय आणि नागरी वाहतूक, आय.टी, 'मेक इन-महाराष्ट्र' असे उच्चभ्रू विषय हयांची सांगड घालणारे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातले विरळाच नेतृत्व. एकीकडे जलयुक्त शिवार, बळीराजा चेतना अभियान या सारख्या योजना त्यांच्या कल्पनेतून साकारल्या.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतून न भूतो न भविष्यती अशी कर्ज-माफी झाली. त्याचवेळी दुसरीकडे नागपूर, मुंबई, पुणे येथील मेट्रो, नागपूर- मुंबई समृध्दी महामार्ग, मुंबईतला कोस्टल रोड, शिवडी ते न्हावाशेव्हा सागरी पूल, नवी मुंबई- पुणे विमानतळ असे पायाभूत सुविधा प्रकल्प त्यांनी प्रगती पथावर नेले. नागरी भागात यशस्वी केलेल्या अनेक प्रकल्पांमुळे नगर परिषदा, महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये घवघवीत यश मिळाले. एक अभ्यासू, सु-स्वभावी नेता ते 'हुकूमी ब्रँड देवेंद्र फडणवीस' असा प्रवास निव्वळ अडीच वर्षांच्या कालावधीत घडला. कोणालाही अचंबा वाटावा असा हा प्रवास आहे. मोठया व्यक्तीच्या सतत आजूबाजूला राहाणाऱ्याना त्या व्यक्तीच्या थोरपणाची सवय होऊन जाते, त्या थोरपणाची महती फार वाटेनाशी होते अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे.

पण मला सरांच्या बाबतीत ती पटत नाही. उलट जितकं त्यांच्या आजूबाजूला असावं तितकी त्यांच्या व्यक्तिमत्वाची संपन्नता जास्त जास्त खुलत जाते आणि एका लेखाच्या मर्यादेत ही संपन्नता व्यक्त करणं हे अशक्यप्रायच! (लेखक मुख्यमंत्री

वेधक

योगिता साळवी

# केरळ, कम्युनिस्ट आणि 'लव्ह जिहाद'

**'द केरळ स्टोरी २' सिनेमा प्रकाशित झाला. यावर केरळच्या कम्युनिस्टांनी गदारोळ काय केला, आक्षेप काय घेतला की, केरळमध्ये हे असे होत नाही. केरळला बदनाम केले जाते. पण, त्याच केरळमध्ये हिंदू मोनालिसा हिने तिच्या कुटुंबाच्या विरोधात जात फरमान खानशी हिंदू मंदिरात विवाह केला. यावर कम्युनिस्ट नेते म्हणाले, हा राज्याचा गौरवाचा क्षण आहे. केरळ, 'लव्ह जिहाद' आणि कम्युनिस्ट या सगळ्यांचे संबंध काय आहेत? मोनालिसा आणि फरमान यांच्या प्रकरणाने हे संबंध उघड झाले आहेत. या प्रकरणात 'द केरळ स्टोरी ३' आहे का, याचा मागोवा घेणारा हा लेख...**





राज्याचा गौरवाचा क्षण आहे, हीच केरळची खरी ओळख आहे. हा सामाजिक सद्भाव आहे, असे केरळच्या वी. शिवनकुट्टी यांनी म्हटले. कशासंदर्भात, तर जन्माने हिंदू असलेल्या मोनालिसाने कुटुंबाशी नाते तोडून, सगळ्यांच्या विरोधात जाऊन, फरमान खान याच्याशी केरळच्या तिरुवनंतपुरममधील अरुमनूर मंदिरात लग्न केले म्हणून. लग्नाला शिक्षणमंत्री वी. शिवनकुट्टी, राज्य सचिव एम.वी गोविंदन आणि राज्यसभा खासदार एए रहीम हे भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे (मार्क्सवादी) नेते हजर होते. जर हीच मुलगी मुस्लीम आणि मुलगा हिंदू असता, तर केरळ सरकार त्या विवाह सोहळ्याला उपस्थित राहिले असते का? त्याला राज्याचा गौरव वगैरे म्हटले असते का? तर, अर्थातच नाही.

बरं मोनालिसा म्हणाली, हा लव्ह जिहाद नाही, मीच फरमानला लग्नाबद्दल विचारले होते. त्याने नकार दिला; पण मी त्याच्याकडून होकार मिळवलाच. पण, जे सामाजिक कार्यकर्ते 'लव्ह जिहाद'मध्ये बळी गेलेल्या मुलींना सोडवण्यासाठी रक्त आटवतात, त्यांना मोनालिसाच्या म्हणण्यातले सत्य चांगलेच माहिती आहे. चांगल्या जीवनाचे आमिष किंवा लैंगिक सुखाची चटक लावून किंवा अतिशय पद्धतशीरपणे ब्लॅकमेल करून, मुलींच्या मनावर ताबा मिळवला जातो.

इतका की, त्या मुलीला वाटते, याच्याशिवाय या जगात दुसरे कोणीच माझे नाही. हाच काय तो माझा तारणहार असून, हा काही केल्या माझ्यापासून दूर जाता कामा नये. त्यामुळे मुलगी तिला जाळ्यात अडकवणाऱ्या पुरुषाचे सत्य माहिती असूनही, त्याला वाचवण्याचे प्रयत्न करते. 'मीच स्वतःहून पळून आले. हा नकोच म्हणत होता, माझे घरचे वाईट आहेत,' असा खोटा आरोपही या मुली करतात. हेतू हाच की, त्या पुरुषाने लावलेली चटक, दिलेले आमिष मिळावे किंवा त्याच्यापासून असलेला धोका टळावा म्हणून.

या प्रकरणात गेल्या दीड वर्षापासून फरमान आणि मोनालिसा समाज माध्यमांद्वारे संपर्कात असल्याचे समजते. म्हणजे तेव्हा मोनालिसा साडेसोळा वर्षांची अर्थात अल्पवयीन असणार; तर फरमान २५ वर्षांचा. गरीब घरची आणि अचानक कुंभमेळ्यात मणी विकताना प्रसिद्ध झालेली मोनालिसा कोण आहे, हे काय फरमानला माहिती नसेल? आपण एका अल्पवयीन मुलीशी चॅटिंग करत आहे. यावर तिच्या पित्याने म्हटले आहे की, मोनालिसाला फसवले आहे. तिला सांगितले गेले की, तुला केरळमध्ये मोठमोठ्या सिनेमात रोल देतो आणि तिथे गेल्यावर तिला जाळ्यात ओढले. असो, मोनालिसा जेव्हा फरमानच्या संपर्कात आली, त्यावेळी ती सनोज मिश्राच्या चित्रपटात काम करत होती. त्याच्यावर नंतर मोनालिसाने विनयभंगाची तक्रार दाखल केली. त्यानंतर लगेचच मोनालिसाला केरळमध्ये सिनेमात काम करण्याची संधीही मिळाली. ही संधी का आणि कशी मिळाली?

अचानक मोनालिसा आणि तो केरळमध्ये एका सिनेमात एकत्र काम करू लागले. हा काय योगायोग आहे का? हिंदूंमध्ये 'लव्ह जिहाद'बद्दल प्रचंड आकस असताना मुस्लीम मुले चांगलीच असतात, हिंदू मुलीच त्यांना भरीस पाडतात, हे सिद्ध व्हावे म्हणून मोनालिसा आणि फरमान यांचा विवाह घडवण्यासाठी

कितीतरी पात्र पडद्याआड काम करत असणार, हे नक्की. या दोघांचा विवाह म्हणजे एक 'फेक नॅरेटिव्ह' जनमानसामध्ये रुजण्यासाठीचा प्रयत्न आहे का? हिंदू पालक मुलींचे लग्न ठरवतील; पण त्यांना न जुमानताच मुस्लीम मुलाशी विवाह केला, तर सरकार दरबारातली मोठी-मोठी माणसे आपली बाजू घेतील, देशभरात प्रसिद्धी मिळेल, हिंदू मुलीने मुस्लीम पुरुषाशी विवाह केला, तर ते चांगले आहे. मुलीला तिचा धर्म सोडावा लागत नाही, असेच हिंदू मुलींना वाटावे, यासाठीच हा लग्नाचा घाट हिंदुद्वेष्ट्यांनी घडवून आणला असेल, असे वाटते.

जसे फरमान म्हणाला की, मोनालिसाचा धर्म बदलला नाही, तर त्याने 'स्पेशल मॅरेज ॲक्ट'द्वारे लग्न केले. मोनालिसाही म्हणाली की, ती सगळ्या धर्माला समान मानते. पण, हे दोघे सगळ्या धर्माला समान मानतात, तर मग त्यांनी देवळात लग्न न करता, मुस्लीम पद्धतीने 'निकाह' का केला नाही? कारण तसे करण्यासाठी, मोनालिसाला उघडपणे धर्मांतरण करावे लागले असते. पण, तिने आताच धर्मांतरण केले असते, तर 'लव्ह जिहाद' असल्याचे पुन्हा सिद्ध झाले असते. हे फरमान आणि त्याला साथ देणार्‍या केरळच्या कम्युनिस्टांना, चांगलेच माहिती आहे. या गदारोळात फरमानचा बाप जाफर अली म्हणाला, उद्या फरमानला पोरे झाली, तर त्यांची ओळख काय सांगायची? कारण मोनालिसाने धर्मांतरण केले नाही, तर मुस्लीम समाज तिच्या मुलांना मुस्लीम मानणार नाही.

पुढे मोनालिसाचे काय होईल? तिचे संस्कार, संस्कृती वगैरे सगळे कालांतराने मुस्लीम पद्धतीचे होईलच, यात काहीही संशय नाही. पण, कागदोपत्री ती हिंदू जरी राहिली, तरी तिला पुढे-मागे जी अपत्ये होतील, त्यांचा धर्म काय असेल? आमिर खान, शाहरूख खान आणि सैफ अली खान ते नसरूद्दीन शहा यांनी, हिंदू अभिनेत्रींशी विवाह केला. त्या अभिनेत्रींनी धर्मांतरण केले नाही मात्र, त्यांची मुले तर धर्माने, संस्काराने आणि कर्माने मुस्लीमच झाली. त्यामुळे फरमान आणि मोनालिसा यांच्या मुलांची ओळख काय असेल? याचे उत्तर उघडच आहे. काय करावे आणि काय म्हणावे?

दररोज अनेक मुली 'लव्ह जिहाद'च्या बळी होऊन मरतात. कोणी फ्रिजमध्ये, कुणी सुटकेसमध्ये सापडतात; तर कुणी आत्महत्या करतात. हे सगळे पाहून वाटते की, कधीपर्यंत समाजाने 'द केरळ स्टोरी' प्रकरणे पाहायची? खरेतर, मोनालिसासारख्या मुलींवर लिहावेसेही वाटत नाही. पण, 'म्हातारी मेली याचे दुःख नाही, तर काळ सोकावतो आहे'. या अशा घटनांमुळे हिंदूंच्या मुली वापरण्यासाठीच असतात, या विकृत मानसिकतेला आणि हिंदू समाजाला अपमानित करणार्‍यांना बळ मिळते. त्यामुळे संघटित होऊन समाजाने 'लव्ह जिहाद'विरोधात उभे राहायलाच हवे.

## निचतेची पातळी...

मूळचा उत्तर प्रदेशचा रहिवासी असलेल्या फरमानने विवाहासाठी केरळच का गाठले? तसेच थातूरमातूर सिनेमात चिल्लर, नगण्य भूमिका करणाऱ्या फरमानच्या लग्नाची व्यवस्था, केरळमध्ये कशी काय झाली असेल? त्याच्या लग्नाला केरळच्या सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षाचे मोठेमोठे मंत्री कसे काय उपस्थित झाले? कम्युनिस्ट पक्षाच्या कारकिर्दीमध्ये, देवभूमी केरळ 'लव्ह जिहाद' आणि 'ड्रग्ज जिहाद'मध्ये बदनाम झाली आहे. केरळच्या मुख्यमंत्र्यांचा जावईही मुस्लीमच आहे.

केरळचे मुख्यमंत्री हे मुस्लीम जावयाच्या मर्जीनुसारच राज्यकारभार चालवतात, हे लपलेले नाही. त्यामुळे केरळच्या मंत्र्यांनी आणि नेत्यांनी काय करावे? कुणाचे समर्थन करावे? यामध्ये कुणाची मर्जी चालेल, हे काय सांगायला हवे. म्हणूनच मोनालिसा आणि फरमानला केरळच्या कम्युनिस्ट नेत्यांकडून समर्थन मिळणे, यात नवीन काहीच नाही. तसेच केरळच्या कट्टरपंथी दहशतवादी संघटना 'लव्ह जिहाद' घडवण्यासाठी उघडपणे काम करतात. मात्र, तिथल्या अनेक मुस्लिमांना वाटते की, या संघटना 'अल्ला'चे राज्य आणि 'शरिया' कायदा आणण्यात मदत करतील.

या कट्टरपंथी संघटनांबद्दल अनेकांना आत्मीयता आहे. त्यामुळेच मुस्लिमांची एकगठ्ठा मते मिळवण्यासाठी, कम्युनिस्ट सरकार फरमानच्या पाठी उभे राहिले. सत्तेसाठी अतिशय खालची पातळी गाठली या कम्युनिस्टांनी!

# जहाजबांधणीचा जागतिक विस्तार

**जागतिक अर्थव्यवस्थेत सागरी वाहतूक हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो आणि या क्षेत्राचा पाया म्हणजे, जहाजबांधणी उद्योग. जगभरातील व्यापार, ऊर्जा वाहतूक, संरक्षण आणि 'ऑफशोअर' उद्योग यांच्या वाढत्या गरजांमुळे जागतिक जहाजबांधणी बाजार झपाट्याने विस्तारत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरणपूरक जहाजांची वाढती मागणी आणि संरक्षण क्षेत्रातील गुंतवणूक यामुळे हा उद्योग नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे.**

वेध

गायत्री श्रीगोंदेकर

जागतिक जहाजबांधणी बाजाराचे मूल्य २०२४ मध्ये सुमारे १४५.६५ अब्ज अमेरिकी डॉलर इतके होते. आगामी काळात या उद्योगाची वाढ कायम राहण्याची अपेक्षा असून, २०३२ पर्यंत हा बाजार सुमारे २१२.७५ अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. २०२५ ते २०३२ या कालावधीत या क्षेत्राचा वार्षिक सरासरी वाढीचा दर सुमारे ४.८५ टक्के राहण्याची शक्यता आहे. जागतिक व्यापारातील सातत्यपूर्ण वाढ, ऊर्जा वाहतुकीची वाढती गरज आणि नवीन पिढीतील जहाजांची मागणी ही वाढीमागील प्रमुख कारणे मानली जात आहेत. जागतिक जहाजबांधणी बाजारात आशिया- पॅसिफिक प्रदेशाचा सर्वाधिक प्रभाव आहे. चीन, दक्षिण कोरिया आणि जपान हे देश जहाजबांधणी क्षेत्रातील प्रमुख नेते मानले जातात. या देशांकडे अत्याधुनिक जहाजबांधणी पायाभूत सुविधा, प्रशिक्षित कामगारवर्ग आणि सरकारचे मजबूत समर्थन आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन क्षमता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे या देशांनी जागतिक बाजारपेठेत आघाडी घेतली आहे.

जागतिक व्यापारातील सुमारे ८० टक्के मालवाहतूक समुद्रमार्गे केली जाते. त्यामुळे कंटेनर जहाजे, बल्क कॅरिअर आणि टँकर जहाजांची मागणी सातत्याने वाढत आहे. मोठ्या प्रमाणात माल वाहून नेणारी आणि इंधन कार्यक्षम जहाजे तयार करण्यावर शिपिंग कंपन्यांचा भर वाढला आहे. जागतिक शिपिंग कंपन्या नवीन तंत्रज्ञानयुक्त जहाजांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. उदाहरणार्थ, काही आंतरराष्ट्रीय शिपिंग कंपन्यांनी 'स्मार्ट लॉजिस्टिस' तंत्रज्ञानासह नवीन पिढीतील कंटेनर जहाजांची ऑर्डर दिली आहे. यामुळे मालाची हाताळणी अधिक कार्यक्षम होते आणि इंधनाचा वापर कमी होतो. पर्यावरण-संरक्षण आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सागरी उद्योगावर जागतिक स्तरावर दबाव वाढत आहे.


आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेने लागू केलेल्या पर्यावरणीय नियमांमुळे जहाजबांधणी उद्योगात मोठे बदल होत आहेत. 'एलएनजी'वर चालणारी जहाजे, 'हायब्रिड प्रोपल्शन' प्रणाली, हायड्रोजन किंवा मिथेनॉलवर चालणारी जहाजे यांचा वापर वाढत आहे. आधुनिक जहाजांमध्ये ऊर्जा कार्यक्षम हुल डिझाईन, वारा साहाय्यीत प्रोपल्शन आणि कमी उत्सर्जन करणारी इंजिन प्रणाली वापरली जाते. यामुळे कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होते आणि सागरी वाहतूक अधिक टिकाऊ बनते.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे जहाजबांधणी उद्योगात मोठा बदल घडत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, 'इंटरनेट ऑफ थिंग्स' आणि 'डिजिटल ट्विन' तंत्रज्ञानाचा वापर करून 'स्मार्ट जहाजे' विकसित केली जात आहेत. या तंत्रज्ञानामुळे जहाजांची कार्यक्षमता वाढते आणि संचालन अधिक सुरक्षित होते. स्मार्ट जहाजांमध्ये 'रिअल-टाईम मॉनिटरिंग' प्रणाली, स्वयंचलित नेव्हिगेशन, पूर्वानुमानाधारित देखभाल आणि इंधन कार्यक्षम व्यवस्थापन प्रणाली असतात. यामुळे 'ऑपरेशन'चा खर्च कमी होतो आणि मानवी त्रुटींची शक्यता घटते. जागतिक स्तरावर वाढत असलेल्या भू-राजकीय तणावामुळे अनेक देश आपल्या नौदल क्षमतेत वाढ करत आहेत. तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक उपाययोजना आणि वाढता जागतिक व्यापार या तिन्ही घटकांमुळे जहाजबांधणी उद्योगाचे भविष्य उज्ज्वल मानले जात आहे.

जागतिक सागरी व्यापार अधिक टिकाऊ, सुरक्षित आणि कार्यक्षम बनवण्यासाठी जहाजबांधणी उद्योग महत्त्वाची भूमिका बजावत राहील. आधुनिक तंत्रज्ञान आणि नवकल्पनांच्या साहाय्याने हा उद्योग जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून पुढेही विकसित होत राहणार आहे.



# गोड पण जीवघेणी विषकन्या




पुस्तक परीक्षण

शरदकुमार एकबोटे

डॉ. अनिल गांधी यांचं एक पुस्तक सहज हाती लागलं आणि मी हादरून गेलो. सॅम पब्लिकेशन्स यांनी नुकतंच 'साखर गोड पण जीवघेणी' हे पुस्तक प्रसिद्ध केलं आहे. यासाठी प्रसिद्ध डॉक्टरांची एक टीम कार्यरत होती. हे संपादन करण्याचे श्रेय डॉ. हेमलता पिसाळ यांना आहे. कोल्हापूरच्या मेहता बुक सेलर्सनं वितरण व्यवस्थेची जबाबदारी घेतली आहे.

सामान्य जनतेला सावध करण्याचे हे प्रयत्न मौलिक ठरावेत असेच आहेत. केवळ चहा आणि मिठाईचं मानवी जीवनाचे शत्रू आहेत, असे नाही- तर अनेक पदार्थातून लपलेली साखर जीवघेणी ठरू शकते. लक्षातही येणार नाही अशा धिम्यागतीने ही विषकन्या आपल्या भोवती विषारी विळखा घालते आहे, याची जाणीव 'साखर गोड पण जीवघेणी' या पुस्तकातून होते.

साखरेचा जन्म अडीच हजार वर्षांपूर्वी भारतात झाला. हीच ती संस्कृतमधली 'शर्करा'. सांगलीचे डॉ. रवींद्र व्होरा या विषकन्येच्या विरोधात जी मोहीम राबवत आहेत त्यात आज अनेक तज्ज्ञ सहभागी झालेले दिसतात. अण्वस्त्रांपेक्षाही विध्वंसक अशीही साखर कथा आहे. या पुस्तकाचे चार भाग पडतात. पहिल्या भागात साखरेचे गुणधर्म आणि दुसऱ्या भागात तिचे शरीरावर होणारे घातक परिणाम या संदर्भातले शास्त्रीय पुरावे दिलेले आहेत.

डायबेटीस, हृदयविकार, मूत्रसंस्था, पचनसंस्था दात, डोळे त्वचा आदी भागावरील साखरेचे हल्ले त्यांचे गंभीर परिणाम हे सारे वाचत असताना मन सुन्न होते. तिसऱ्या भागात गर्भाशयावरील परिणाम आणि बाळांवर होणारे भयावह परिणाम लक्षात येतात.

चौथ्या आणि अखेरच्या भागात साखरेचे अन्य शारीरिक पैलू- साखर उत्पादक आणि सरकार यांचे साटे-लोटे, ऊसतोड कामगारांचे उध्वस्त जीवन, पर्यावरणाची प्रचंड हानी, ऊसाला लागणाऱ्या पाण्याचे पैशात होणारे रूपांतर- हे सारेच भयानक आहे. हे लक्षातही येत नाही. धान्याची जमीन उसाने कशी बाळकावली आहे, या विषयाचा तपशील विलक्षण चीड आणणारा आहे. लहानपणा देगा देवा, मुंगी साखरेचा रवा...ही तुकारामाच्या काळातली साखर वेगळी होती. तिच्यावरील रासायनिक प्रक्रिया विषारी नव्हती, पण आजचा पेढा, बर्फी, केक, कोल्ड्रिंक्स, बनारस, इंदुरी, पंजाबी मिठाई या सार्यातून कोणकोणत्या रोगांची निर्मिती होते हे वाचताना धक्का बसतो. साखरेमुळे ज्या अनेक व्याधींचा जन्म होतो, त्यावरील तज्ज्ञ डॉक्टरांचे लेखही या पुस्तकात आहेत. साखरेचे हे जीवघेणेपण सामान्य वाचकांपर्यंत पोहोचवावे ही या पुस्तकाची भूमिका आहे.

डॉ. आदित्य देशपांडे, डॉ. मंदार गद्रे, डॉ. प्राची जाधव, डॉ. सुचिता केळकर, डॉ. रवींद्र किवळकर, डॉ. सुहास खांबे, डॉ. नितीन पत्की, डॉ. मुकुंद संगमनेकर, डॉ. राधा मुकुंद, डॉ. दिलीप शहा, डॉ. नितांत शहा यांची सडेतोड मते चिंतनीय आहेत. कुमार केतकर, अच्युत गोडबोले, अविनाश धर्माधिकारी यांनी केलेले कौतुक लक्षवेधक ठरावेत असेच आहे. मानवांच्या आहारात साखरेचा शिरकाव, साखरेचे खाणार त्याला विविध व्याधी झपाटणार, साखर लहान मुलांचा गोड, शत्रू ऊस शेती आणि साखर कारखाने म्हणजे निसर्गाची आणि मानवी आरोग्याची हानी, ...आणि लोभाच्या कात्रीत सापडलेले साखर उत्पादन ही प्रकरणे मिठाईवेडे आणि चहाचे चाहते यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालतील. **साखरेविना बालपण देगा देवा, मिळेल उत्तम आरोग्याचा मेवा! साखरेचा गाडा, घालतो दरोडा!** अशा वाक्यांची पेरणी प्रभावी ठरते.

साखर म्हणजे व्याधींची मालिका, साखर म्हणजे दातांची कीड, साखर म्हणजे यकृत आणि पचनसंस्थेची शत्रू, कॅन्सर निर्मितीत साखरेचे योगदान, साखर हीच मधुमेहाची राजधानी, हृदयविकारात साखरेचा वाटा, त्वचा आणि डोळे यांचे विकार, साखरेमुळे मूत्रपिंड आणि रक्तवाहिन्या यांच्यावरील साखरेचे आक्रमण, तारुण्य आणि आयुष्य घटवण्याचे कार्य करणारी साखर- आदी अनेक तपशिलांचे विवरण या पुस्तकात तपशीलवार येते आणि वाचकांना हादरे बसतात. साखर या विषयावर सखोल आणि शास्त्रीय माहिती सोप्या भाषेत मात्र, प्रभावीपणाने या पुस्तकातून मिळते. चमचातील साखरेमध्ये दिसणारी मानवी कवटी असे सूचक मुखपृष्ठ प्रतिभासंपन्न चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी रेखाटले आहे. ती विषयाचा प्रभाव वाढवते.

**पुस्तकाचे नाव-** साखर गोड पण जीवघेणी
**लेखकाचे नाव-** डॉ. अनिल गांधी
**पृष्ठे-** १८३
**मूल्ये-** ३५० रुपये




# हवामान बदलाचे धोके




प्रासंगिक

**प्रा. सुरेश चोपणे**

उद्योग, शेती, शहरे वसविण्यात आली. त्यासाठी मोठ्या प्रमाणात जंगले कमी होऊ लागली. १९ व्या शतकात औद्योगिक शहरे निर्माण झाली. तेल व कोळशाचा वापर आणि घरगुती सांडपाणी यामुळे हवा आणि पाणी प्रदूषण वाढू लागले. यातून कॉलराची महामारी वाढली होती. पुढे २० व्या शतकात लोकसंख्या वाढ, विजेसाठी कोळशाचा वापर, अनेक रसायनांचा वापर सुरू झाला. दुसरीकडे शेतीसाठी, उद्योग आणि विकासाच्या कामासाठी पर्यावरणाचा समतोल राखणारी वने मोठ्या प्रमाणावर तोडली गेली. यामुळे जमिनीचे तापमान वाढले, हरितगृहाचा परिणाम झाला, ओझोनला छिद्र पडले, पृथ्वीचे सरासरी तापमान वाढले, ध्रुवावरील बर्फ, ग्लेशिअर्स वितळू लागले. या सर्वांचा परिणाम देशातील जलस्रोत, शेती, पर्यावरण आणि हवामानावर झाला. प्रचंड हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीला मोठा फटका बसत आहे, उद्योगांना सुद्धा आर्थिक नुकसान सोसावे लागते आहे. आज यामुळे आपली अर्थव्यवस्था ढासळली. पुढेही संकटे वाढणार आहेत म्हणून आजच युद्धपातळीवर हवामान बदल थांबविला पाहिजे. गेले दशक हे अत्याधिक हवामान बदलाचे झाले असून युरोपमध्ये पूर, ऑस्ट्रेलिया, ॲझोनमध्ये आगी, थंडीच्या- उष्णतेच्या लाटा वाढू लागल्या आहेत. २०२० हे वर्ष महामारी सोबतच गेल्या १०० वर्षातील तीव्र हवामान बदलाचे ठरले.

जगभर उष्ण लहरी, जंगलांना आगी, लांबलेला मान्सून, नोव्हेंबरच्या सुरुवातीची थंड लहर आणि दर आठवड्यात बदलणारे हवामान असे कधी पाहिले गेले नाही. हवामान बदल हवामान बदल हा शब्द आज सर्व वैज्ञानिक, राजकीय नेते आणि जनसामान्याच्या तोंडी पडलेला परवलीचा शब्द झाला आहे. जगात कुठलीही नैसर्गिक आपत्ती आली, पाऊस, उन्ह किंवा इतर हवामानात बदल दिसला की 'क्लायमेट चेंज' हा शब्द सर्वांच्या तोंडी सहज येतो. परंतु २५ वर्षांपूर्वी मात्र अनेक बुद्धिवादी लोक सुद्धा यावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. जागतिक हवामान विभाग आणि भारतीय हवामान विभागांचा १०० वर्षांचा हवामानाचा इतिहास पाहता (१८८६-१९८६) काही अपवाद वर्षे वगळता हवामान स्थिर राहिले होते. हवामान खात्याने ३० वर्षांचा काळ हा हवामान बदलाचा काळ ठरविला आहे. त्यानुसार १९०१ ते १९३० हा कोरडा काळ, १९३१ ते १९६० हा ओला काळ, १९६१ ते १९९० हा पुन्हा कोरडा काळ, तर १९९१ ते २०२० हा ओला काळ ठरविला आहे. यात भारताने १९ कोरडे, तर १३ ओले दुष्काळ पाहिले आहेत. परंतु या सर्व काळात अत्याधिक हवामान बदलाच्या घटना क्वचितच घडल्या. परंतु १९८६ नंतर हरित वायूच्या उत्सर्जनामुळे आणि तापमानवाढीमुळे हवामान बदलाला सुरुवात झाल्याचे आकडेवारीवरून कळते. अत्याधिक हवामान बदल खऱ्या अर्थाने २०१० ते २०२० या दशकात मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे दिसते. भारतासह जगातही सर्वाधिक तापमानवाढीचे आणि नैसर्गिक आपातीचे हेच दशक ठरले.

मागील १००० वर्षात प्रथमत:च २०००, २००५, २०१०, २०१३ आणि पुढील प्रत्येक वर्ष अत्याधिक तापमानाची ठरली. २०१९-२०२० हे वर्ष हे गेल्या १०० वर्षांतील सर्वाधिक हवामान बदलाचे आणि नैसर्गिक आपत्तीचे ठरले. अगदी या उलट हीच वर्षे सर्वाधिक थंड वर्षे सुद्धा ठरली, असा अभ्यास नासाच्या गोडार्ट इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस स्टडीजने केला आहे. त्यांच्या मते, १९५० च्या दशकात सरासरी तापमान ५७ डि. फॅरनहिट होते. ते दर दशकाने वाढत जाऊन २०१३ पर्यंत ५८.३ डि. फॅ. झाले. इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चर रीसर्च या संस्थेने भारतीय हवामान विभागाची आकडेवारी अभ्यासून तापमान वाढले असल्यामुळे थंडी, उष्णता, कमी-अधिक पावसाचे प्रमाण वाढल्याचे आणि जीडीपी १५ टक्क्यांनी कमी झाल्याचे म्हटले आहे. हवामान बदलाचे भारताच्या विविध घटकांवर झालेले परिणाम हिमालय हिमालयाचा जगातील सर्वात उंच आणि विस्तृत बर्फाळ प्रदेश म्हणून आपल्याला अभिमान असला तरी अलिकडे जागतिक तापमानवाढीमुळे भारतावरील संकट वाढू लागले आहे. याचे कारण सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. हिमालयातून सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रा नद्या, उपनद्यांचे खोरे तयार झाले आहे. सिंधू नदीच्या खोऱ्यात सर्वात मोठ्या संख्येत म्हणजे ३५०० हिमनग आहेत आणि गंगा, ब्रह्मपुत्रा नद्यांच्या उगमात १६०० हिमनग आहेत. परंतु हवामान बदलामुळे या नद्या कधी महापूर, तर कधी पाण्याचा दुष्काळ आणतात. हिमालयाच्या नद्यांवर संपूर्ण उत्तर भारत अवलंबून आहे, हिमालयामुळेच मौसमी प्रणाली आणि देशाचे हवामान अवलंबून आहे. जनुकीय बदल केलेले बियाणे तयार केले पाहिजे असे सरकारला सुचविले होते. किनारी प्रदेश भारताला ७५१७ किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. त्यात ९ राज्ये, २ केंद्रशासित प्रदेश आणि २ बेटे आहेत. यातील ७० किनारी जिल्ह्यात १७१ दशलक्ष लोक राहतात आणि १४.५ दशलक्ष लोक हे मासेरीवर अवलंबून राहतात. समुद्र किनारे ही एक फार मोठी नैसर्गिक देणगी आणि साधनसंपत्ती आहे. परंतु हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका भारताला बसला असून तो धोका भविष्यात वाढणार आहे. ध्रुवावरील आणि हिमालयाचे बर्फ वितळत असल्याने समुद्राची उंची वाढू लागली आहे.

पाणी, नद्या, जलस्रोत हवामान बदलाचा मोठा फटका भारतातील नद्या, नाले आणि इतर जलस्रोतांवर झाला आहे. गेल्या २०१० पासून भारतात उष्ण लहरींचा प्रकोप वाढल्याचे लक्षात येते. पृथ्वीवरील १० सर्वाधिक तापमानाच्या प्रदेशात भारतातील काही शहरे येतात. या वाढत्या तापामानामुळे भूजल, तलाव, नद्या-नाले आणि इतर सर्व जलस्रोतांच्या पाण्याची वाफ होऊन ती कोरडी पडत आहे. भारताचा मराठवाडा, गुजरात, राजस्थान वगळता देशात सर्वत्र ११७० मिमी. पावसाची सरासरी आहे. म्हणजे प्रत्येक व्यक्ती ६१,००० क्युबिक फूट इतके पाणी वाट्याला येते. परंतु यातील बहुतेक पाणी समुद्रात वाहून जाते. संवेदनशील परिसंस्था ही अतिशय संवेदनशील असते. जैविक आणि अजैविक घटकांपासून आणि शेकडो वर्षांच्या संतुलित हवामानातून ती तयार झालेली असते. या परिसंस्थेवर वृक्ष, प्राणी आणि सर्व जीव अवलंबून असतात, नव्हे तर या परिसंस्थांधून सजीवाचा विकासक्रम झालेला असतो. परंतु वृक्षतोड, प्रदूषण, तापमानवाढ आणि हवामान बदल यामुळे अशा संवेदनशील परिसंस्थांवर विपरीत परिणाम होऊन काही प्रजाती नष्ट झाल्या, तर काही धोकादायक श्रेणीत आल्या आहेत. या नष्ट होत चाललेल्या परिसंस्थांचा विपरीत परिणाम मानव, शेतीवर झाला आहे. हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका कृषी क्षेत्राला बसला आहे. देशातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त शेती कोरडवाहू आहे आणि ती पूर्णतः मौसमी पावसावर अवलंबून आहे. २१ व्या शतकाच्या सुरुवातीपासून तापमानवाढीमुळे हवामान बदलाची प्रक्रिया गतिमान झाल्याने कधी अल नीना तर कधी ला नीना, कधी वादळे तर कधी अतिपाऊस, निसर्गाची हमखास पडणारी नक्षत्रे ही राहिली नाही.

कोरडवाहू शेतीला कधी सिंचनासाठी पाणी नाही, तर कधी अति पावसामुळे सिंचन सोयी असूनही उपयोग नाही अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली. याचा आर्थिक फटका देशाला सहन करावा लागत आहे. हवामान बदलामुळे ४-९ टक्के परिणाम शेतीवर झाला आहे. देशाच्या जीडीपीत शेतीचा १५ टक्क्यांचा वाटा आहे. २०२० हे वर्ष गेल्या १०० वर्षांतील सर्वांत हवामान बदलाचे वर्ष ठरले. मान्सून ऑक्टोबरपर्यंत होता आणि लगेच नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात थंड लहर असे कधी घडले नाही. अर्थव्यवस्था १९८० मध्ये भारताची जीडीपी फक्त १९० बिलियन डॉलर होता आणि जगात १३ वा क्रमांक होता. जीडीपीनुसार २०१९ मध्ये इंग्लंड आणि फ्रान्सला मागे टाकत भारत जगात ५ वी (२.९४ ट्रिलियन डॉलर) अर्थव्यवस्था ठरली. भारताने देशाच्या आर्थिक विकासासाठी उद्योग मॉडेल निवडले आहे. परंतु पर्यावरणवाद्यांच्या मते उद्योग हे चिरंतन विकासाचे मॉडेल नसून ते अल्पकाळाचे मॉडेल आहे आणि ते अलिकडे खरे ठरू लागले आहे. केंब्रिज विद्यापीठात मागील वर्षी १७४ देशांची १९६० पासूनची आकडेवारी वापरून केल्या गेलेल्या अभ्यासानुसार हवामान बदलामुळे भारताची ५ टक्के आर्थिक घट झाली असून, शतकापर्यंत ती घट १० टक्के होईल असे म्हटले आहे. नैसर्गिक आपत्तीत वाढ जागतिक तापमानवाढीमुळे अत्याधिक हवामान बदलाच्या घटनांत वाढ होत आहेत. गेल्या दशकात या घटना वाढल्या हे देश-विदेशातील बातम्या वाचल्यानंतर सहज लक्षात येईल. हिमालयात होत असलेली ढगफुटी, भूस्खलन, बर्फ वितळणे, अतिवृष्टी, मुंबई, केरळ येथील अतिवृष्टी, उष्ण लहरी, थंडीची लाट, वादळे, विजांचा प्रकोप, मध्य भारतातील उष्ण लहरी, गारांचा पाऊस, धुळीची वादळे, वणवा यात सातत्याने वाढ होत आहे.

भारतातील १४८ दशलक्ष नागरिक हे अत्याधिक प्रदूषण, तापमान आणि हवामान बदलाच्या हॉटस्पॉट क्षेत्रात राहतात. त्याचसोबत ४४१ दशलक्ष लोक साधारण हॉटस्पॉट क्षेत्रात राहतात. महाराष्ट्रातील विदर्भाचा या हॉटस्पॉटमध्ये समावेश होतो. आरोग्याच्या समस्या हवामान बदलाचा सर्वाधिक तडाखा मानवाच्या आरोग्यावर झाला आहे. रोगराई प्रचंड वाढल्याचे जागतिक आरोग्य संस्थेच्या आकडेवारीवरून कळते. तापमानवाढीमुळे त्या त्या क्षेत्रातील हवामानात सूक्ष्म बदल झाले असून त्यामुळे रोग आणि विषाणू वाढू लागले आहेत. सध्या जगात दरवर्षी नवनवीन विषाणू स्वत:त बदल करून मानवावर आक्रमण करीत आहेत. कोरोना विषाणू हा त्याचाच एक परिपाक असल्याचे संशोधनाने सिद्ध झाले आहे. जगातील ८ लोकांच्या मृत्यूगे १ व्यक्ती प्रदूषणामुळे होणाऱ्या आजाराने मरतो, एकट्या २०१२ वर्षात ७ दशलक्ष लोक प्रदूषणाने मृत्यू पावल्याचे जागतिक आरोग्य संस्थेने म्हटले आहे आणि दरवर्षी हा आकडा वाढत आहे.

वने- वन्यजीवांवर परिणाम हवामान बदलाचा परिणाम भारतातील वनांवर होत असल्याची अनेक उदाहरणे आज दिसू लागली आहेत. जंगलातील राहिवासी दरवर्षी मोहफुले वेचण्यासाठी, बिडीपत्ता संकलनासाठी आणि क्वचित स्वत:च्या सुरक्षेसाठी गावाशेजारी जंगलात आगी लावतात असा इतिहास आहे. पूर्वी ही आग मर्यादित असायची, परंतु हवामान बदल आणि तापमानवाढीमुळे आता तीच आग उष्ण वाऱ्यामुळे संपूर्ण जंगलात पसरत आहे. त्यामुळे वने आणि वन्यजीवांना मोठे नुकसान होत आहे. वादळ आणि मोठ्या पावसामुळे वृक्ष कोलमडणे आणि भूक्षरण वाढले आहे. जंगलात परकीय आणि आक्रमक वनस्पती वाढू लागल्या आहेत. कर्बवायू आणि इतर प्रदूषणामुळे वृक्षांच्या वाढीवर विपरीत परिणाम होऊ लागला आहे.

आपल्याच दुष्कर्मामुळे निसर्ग आपला सखासोबती आता राहिला नसून तो आता आपले विक्राळ रूप धारण करीत असून आपला नाश करू पाहत आहे. आजच सावध होऊन आपण निसर्ग संरक्षणाचे उपाय केले नाही तर सामूहिक विलुप्ती निश्चित आहे.



# आता ध्येय लॉस एंजेलिसचे...

**गेल्या दोन वर्षांत विश्वस्तरीय स्पर्धांमध्ये भारताच्या प्रत्येक प्रकारातील क्रीडापटूंनी जे यश मिळवले, त्याचीच अखंड परंपरा भारतीय क्रिकेटपटूंनी टी-२० विश्वचषक जिंकून कायम ठेवली. आता 'आयपीएल'चा हंगाम असून, भारतीय क्रिकेटपटूंना स्वप्न पुढील ऑलिम्पिक स्पर्धेत जिंकण्याचे पडू लागले आहे. विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाविषयीचा हा आढावा...**

क्रिडांगण

**श्रीपाद पेंडसे**

क्रिकेटच्या इतिहासातील सर्वांत यशस्वी प्रशिक्षकांपैकी एक असलेले ऑस्ट्रेलियाचे माजी प्रशिक्षक जॉन बुकानन, नुकतेच दोन ते सात वयोगटातील मुलांसाठीच्या 'रेडी स्टेडी गो किड्स' या १३ वेगवेगळ्या क्रीडाप्रकारांसाठी आखलेल्या कार्यक्रमाचे सहसंस्थापक म्हणून भारतात आले होते. 'स्पोर्टस्टार' या प्रसिद्ध क्रीडा मासिकाशी मारलेल्या गप्पांमध्ये ऑस्ट्रेलियाच्या संघाने विश्वचषक स्पर्धेतून इतक्या लवकर बाहेर पडणे, ही ऑस्ट्रेलियाच्या अधिकाऱ्यासाठी धोक्याची घंटा असल्याची जाणीव त्यांनी करुन दिली. त्याचवेळी वेळेवर जागे होण्याची आता वेळ आल्याचेही त्यांनी म्हटले. त्याचवेळी त्यांनी भारतीय क्रिकेटचे मात्र आवर्जून तोंडभरून कौतुक केले. भारताच्या टी-२० विश्वचषक विजयाबद्दल त्यांनी म्हटले की, भारतीय क्रिकेटबद्दल माझे एकंदर मत असे आहे की, ते त्यांना अपेक्षित असलेल्या दिशेने जात आहेत. ते जागतिक क्रिकेटचे एक पॉवरहाऊस झाले आहे. या देशातील तरुणांमध्ये विपूल प्रतिभा असून, राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्याची स्पर्धाही मोठ्या प्रमाणावर आहे. तरीही, गुणवत्तेनुसारच खेळाडू त्या पातळीवर निवडले जातात. आणि असेच खेळाडू विश्वचषकाच्या विजयात वाटा उचलताना तुम्हाला दिसू लागले आहेत.

ऑस्ट्रेलियाच्या प्रशिक्षकाप्रमाणेच पाकिस्तानचा माजी कर्णधार जावेद मियाँदाद यानेही एका मुलाखतीत म्हटले की, जो संघ उपांत्य आणि अंतिम फेरीत २५० पेक्षा जास्त धावा करू शकतो, तोच संघ चॅम्पियन होण्यास पात्र आहे. भारताचा देशांतर्गत क्रिकेटचा पाया अतिशय मजबूत आहे. त्यांनी क्रिकेटची जी मजबूत संरचना उभारली आहे, त्याचेच हे फळ आहे. भारताकडे सध्या आक्रमक फलंदाज, दर्जेदार फिरकीपटू आणि वेगवान गोलंदाजांची कमतरता नाही. या विदेशी क्रिकेट जाणकारांच्या मतांबरोबरच असंख्य भारतीयांनीपण प्रतिक्रिया दिल्या होत्या. पंतप्रधान मोदींची जशी प्रतिक्रिया होती, तशीच सुनील गावस्करची यांचीही होती. त्यात गावसकर म्हणतात, आयसीसी ट्रॉफी' जिंकणे सोपे नसते. हे यश नशिबाने नाही, तर कौशल्यानेच मिळते. खेळाडूंवर प्रचंड दबाव असतो; कारण मैदानात उतरताना ते १०० कोटींहून अधिक लोकांचे प्रतिनिधित्व करतात. हा भारतीय क्रिकेटचा आजवरया इतिहासातील सर्वोत्तम काळ आहे. ८ मार्च रोजीच्या रविवारी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी क्रिकेट मैदानावर, भारताने न्यूझीलंडचा पराभव करत टी२० क्रिकेट विश्वचषक जिंकला. सारे विश्वच दूरचित्रवाणीवर या स्पर्धेचा आनंद लुटत होते. दूरचित्रवाणीवर या स्पर्धा दाखवण्यात, एका बिस्किट कंपनीचाही प्रायोजकांमध्ये सहभाग होता. अशा मोठ्या स्पर्धांचे प्रायोजकत्व घेणार्यांच्या जाहिरातीमध्ये, अनेकदा आकर्षक वाक्य दाखवण्यात येतात. या वेळेसही असेच वाक्य लोकांच्या पसंतीस उतरलं. 'इतिहास बदलणार आणि इतिहास रचणार,' हे वाक्य रोहित शर्माच्या तोंडी दाखवण्यात आले होते. भारतीय क्रिकेटपटूंनी हे वाक्य, विश्वचषक स्पर्धेत प्रत्यक्षात उतरवले. रोहितची २०२६ टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी, 'ब्रॅण्ड म्बेसेडर' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. म्बेसेडर म्हणून नियुक्त होणारा तो पहिलाच सक्रिय क्रिकेटपटू होता.

भाजपचा माजी खासदार आणि भारतीय संघाचा माजी सलामी फलांदाज असलेला गौतम गंभीर पुरुषांच्या भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक असून, त्याच्या मार्गदर्शनामध्ये भारतीय संघाने विश्वचषक मिळवला आहे. सांघिक खेळात कुणीही एकच एक मोठा नसतो. वैयक्तिक विक्रमांच्या दगडांवर नाव कोरण्यापेक्षा, राष्ट्रासाठी चषक पटकावणे आणि विश्वविजयी होणंच जास्त गरजेचं असल्याचं सूत्र घेऊन गौतम गंभीरने प्रशिक्षकपदाची सूत्रे हातात घेतली. गौतम गंभीरने त्याच्या खेळाडूंना एकच मंत्र दिला होता 'बाद झालात तरी चालेल, घाबरून टुकू-टुकू खेळायचं नाही! वैयक्तिक विक्रमासाठी तर बिलकुलच खेळायचं नाही. अनेकदा भोपळाही फोडू न शकणारा अभिषेक शर्मा संघाबाहेर गेला नाही, की कर्णधार सूर्यकुमार यादव वैयक्तिक फॉर्म नाही म्हणून घाबरलाही नाही. संजू सॅमसन, ईशान किशन, शिवम दुबे, रिंकू सिंग या सगळ्यांच्याच पाठीशी, संघव्यवस्थापन कणखरपणे उभे राहिल्याचे जगाने पाहिले. भारतीय संघाने जगाला निक्षून सांगितलं की, भारतीय क्रिकेट ही गरीब, कमनशिबी, झगडत जिंकणार्या देशाची गोष्ट राहिली नसून, आता भारत क्रिकेतवर निर्विवाद सत्ता गाजवत आहे. या विश्वचषकाचं सार एकच आहे, ते म्हणजे संघापेक्षा मोठे कोणीच नाही, अन् त्याने जिंकून मिळालेल्या समाधानापेक्षा अन्य काहीच मोठे नाही. गौतम गंभीर पत्रकार परिषदेत म्हणाला की, मी हा चषक राहुल द्रविड, व्हीव्हीएस लक्ष्मण व अजित आगरकर यांना समर्पित करतो. राहुल द्रविडला, कारण त्यांनी त्यांच्या कार्यकाळात ज्याप्रकारे संघ घडवला आहे. लक्ष्मण यांना, कारण त्यांनी पडद्यामागून भारतीय क्रिकेटसाठी जे निरपेक्ष कष्ट घेतले आहेत. 'बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स' हे टीम इंडियासाठी पाईपलाईन राहिली आहे आणि अजित आगरकर, कारण ज्या प्रामाणिकपणे त्यांनी आपलं काम केलं आहे. महत्त्वाचं म्हणजे जय शाह. जय शाह हे एकमेव व्यक्ती आहेत, ज्यांनी माझ्या कार्यकाळातील पडत्या वेळेत मला कॉल करून माझ्याशी संपर्क साधला होता.

गेल्या २३ महिन्यांत आपण महिला विश्वचषक, दृष्टिबाधित महिलांचा विश्वचषक, १९ वर्षांखालील मुलं व मुली अशा दोघांनीही पटकावलेले विश्वचषक, दोन वेळेस टी-२०चा विश्वचषक आणि एक चॅम्पियन्स करंडक असं सगळं 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळा'च्या काचेच्या कपाटात मांडलं आहे. हे लक्षण आहे, भारताच्या क्रिकेटमधील ताकदीचे. ही कहाणी एवढेच सांगते की, पिढी बदलली, तरी भारतात गुणवान क्रिकेटपटूंची वानवा कधीही नव्हती आणि असणारही नाही. टी-२०च्या क्रिकेटमध्ये भारतीयांचे वर्चस्व निर्माण होण्याचे श्रेय, इंडियन प्रीमियर लीगलाही द्यावे लागेल. या प्रकारच्या क्रिकेटमध्ये शास्त्रशुद्ध खेळाला आता दुय्यम स्थान असते. दोन दशकांपूर्व भारतात 'आयपीएल'चे आगमन झाले, तेव्हा त्याबाबत अनेकांनी नाकं मुरडण्यास पुढाकार घेतला होता. पण, महेंद्रसिंग धोनीच्या भारतीय क्रिकेटने टी-२०चा विश्वचषक जिंकला. त्यापाठोपाठ 'आयपीएल'ने क्रिकेटची प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याची मजा आणण्याची, त्यांना पुन्हा त्या क्रिकेटकडे खेचून आणण्याची क्षमता वाढवली. भारतीय क्रिकेटची आर्थिक घडी मजबूत केली. हळूहळू या क्रिकेटमध्ये असणारी चौकार-षटकारांची आतषबाजी आणि या क्रिकेटच्या नव्या रुपाची गतिमाता लोकांच्या पसंतीस उतरायला लागली. टी-२०चा विश्वचषक पटकवल्यावर, क्रिकेटप्रेमी आता 'आयपीएल'च्या चर्चेत गुंगले आहेत. 'आयपीएल'चे पहिल्या टप्प्यातील वेळापत्रक जाहीर झाले असून तामिळनाडू, आसाम, पश्चिम बंगाल यांच्या निवडणुकांच्या तारखा ठरल्यानंतर, पुढील वेळापत्रक समजेल. एका सकाळी वृत्तपत्रीय लेखात वाचलेले शब्द मला आवडले, जुन्याजाणत्यांच्या अनुपस्थितीत नुकत्याच हाताबुडी आलेल्या पिढीने घराणे, शेतीवाडी आणि वाड्याहुड्यांची निगुतीने जपणूक करावी; नव्हे, त्यावर सोन्याची कौले चढवावीत, हे बघितले की वाडवडिलांना मोठे सौख्य मिळते! हेच कृतकृत्यतेचे सौख्य भारतीय क्रिकेटप्रेमींना, गेल्या २३ महिन्यांत पुरेपूर मिळाले आहे.

आखाती युद्धाचे काय परिणाम क्रिकेटवर होत आहेत, ते लक्षात येऊ लागतीलच. 'आयपीएल'वर त्याचे परिणाम होवो वा न होवो; पण क्रिकेटपटू आता २०२७ एकदिवसीय विश्वचषक, २०२८ ऑलिम्पिक, २०२८ टी-२० विश्वचषक, २०२९ चॅम्पियन्स ट्रॉफी या सगळ्यावर लक्ष केंद्रित करून, आता भारतीय क्रिकेटचा जागतिक स्तरावर मोठा डंका वाजवण्यासाठी सज्ज होत आहेत. ते तिकडे डंका पिटतील आणि भारतीय क्रिकेटप्रेमी ढोल-ताशे वाजवत आनंद व्यक्त करत राहतील. हा आनंद असाच निरंतर साजरा करत राहायला मिळो, ही आपल्या सगळ्यांची इच्छा क्रिकेटदेव सकळ संपन्न करो.